रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ ▌वर्ष ८७ ▌अंक ३१६ ▌पृष्ठे ८ ▌MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

## ‘देशात भारत सरकार हवंय’

**अमरावती:** देशात आपल्याला मोदी सरकार नव्हे तर, भारत सरकार हवं आहे असे म्हणत, खासदार नवनीत राणांचा हिशोब चुकता करा, असे आवाहनही उद्धव ठाकरे यांनी केले. अमरावती लोकसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार बळवंत वानखडे यांच्या प्रचारार्थ सोमवारी (दि. २२) संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन येथे विराट सभेचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी उद्धव ठाकरे सभेला संबोधित करत होते. शेतकऱ्यांना उपाशी ठेवणारे, महिलांचा अपमान करणारे, युवकांना बेरोजगार करणारे, दहा वर्षांत देश लुटून कंगाल करणारे, हुकूमशहा मोदी सरकार आपल्याला हाणून पाडायचे आहे, असेही ठाकरे म्हणाले.


# कृषीवल

रायगड, मंगळवार, दि. २३ एप्रिल २०२४

किंमत ४ ₹



महालक्ष्मी कृषी पर्यटन केंद्र कासू/पेण/रायगड

कासू रेल्वे स्टेशनजवळ चालवायला देणे आहे.

इच्छुकांनी संपर्क साधावा :

मोहन वेखंडे - ९८५००१५२०१/८१४९४८०८४८

सुविधा १५ रुम + स्विमिंग पूल/रेनडान्स, गार्डन एरिया, किचन-२/चुल. कॉन्फरन्स हॉल + ओपन रेस्टॉरंट, टॉप फ्लोअर, रिसेप्शन, कार्यक्रम हॉल + लॉन एरिया, मोठा पार्किंग एरिया + प्लेग्राऊंड सोबत विविध सुविधा उपलब्ध.






उन्हाळ्याची सुट्टी AI शी गट्टी चला करूया MS-CIT!

MS-CIT

आंतरराष्ट्रीय दर्जाचा परिपूर्ण कंप्यूटर कोर्स

mscit.mkcl.org

प्रवेशासाठी आजच MS-CIT केंद्राशी संपर्क साधा.


आजचा अग्रलेख

बाजू कोणी बदलली?

# ‘पॉवर’फुल ‘तुतारी’चा नाद घुमणार

## शरद पवारांच्या उपस्थितीत मोर्ब्यात आज इंडिया आघाडीची सभा

। माणगाव । प्रतिनिधी ।

रायगड लोकसभा मतदारसंघात इंडिया आघाडीचे उमेदवार अनंत गीते यांच्या प्रचारासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार गटाचे अध्यक्ष शरद पवार मंगळवारी (दि. २३) माणगाव तालुक्यातील मोर्बा येथे येणार आहेत. त्यांच्या प्रमुख उपस्थितीत ही जाहीर प्रचार सभा मोर्बा येथील एस.एस. हायस्कूलच्या भव्य पटांगणात सायंकाळी चार वाजता होणार आहे.

या प्रचार सभेत शरद पवार सध्याच्या राजकारणाबाबत काय भाष्य करणार, याकडे संपूर्ण श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघबरोबरच रायगड जिल्ह्याचे लक्ष लागून आहे. या सभेची जोरदार तयारी झाली असल्याचे शेकाप तालुका चिटणीस रमेश मोरे यांनी सांगून हजारोंच्या संख्येने जनसमुदाय उपस्थित राहणार असल्याचे सांगितले.

या सभेला प्रमुख वक्ते म्हणून शिवसेना नेते तथा माजी मंत्री सुभाष देसाई, शेकाप सरचिटणीस आ. जयंत पाटील, शिवसेना नेत्या सुषमा अंधारे, गुहागरचे आ. भास्कर जाधव, दक्षिण रायगड जिल्हा शिवसेना संपर्कप्रमुख संजय कदम, जिल्हाप्रमुख अनिल नवगणे, प्रदेश पान ५ वर

### कार्यकर्त्यांनी उपस्थित राहावे

महाविकास आघाडीचे उमेदवार अनंत गीते यांच्या माणगाव येथील प्रचार सभेला इंडिया आघाडीचे दिग्गज नेते उपस्थित राहणार आहेत. त्यानिमित्ताने संपूर्ण जिल्ह्यातून हजारोंच्या संख्येने शेकाप कार्यकर्त्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा चिटणीस ॲड. आस्वाद पाटील यांनी केले आहे. माणगावला जाण्यासाठी कार्यकर्त्यांची तयारी जोरात सुरु आहे. काही कार्यकर्ते सकाळी दहा वाजता, तर काही कार्यकर्ते दुपारी एक वाजता निघणार असल्याचे पाटील यांनी सांगितले. या सभेत राष्ट्रवादीचे नेते शरद पवार, शेकाप नेते जयंत पाटील व अन्य दिग्गज मंडळी मार्गदर्शन करणार आहेत, असेही ते म्हणाले.



● मोर्बा येथे इंडिया आघाडीच्या प्रचार सभेची जय्यत तयारी.

## रायगड : १३ उमेदवार रिंगणात, ८ जणांची माघार

# आता प्रचाराचं धुमशान

## खरी लढत इंडिया आघाडी विरुद्ध महायुती

। रायगड । खास प्रतिनिधी ।

लोकसभा निवडणुकीच्या आखाड्यातून आठ उमेदवारांनी सोमवारी आपले उमेदवारी अर्ज मागे घेतले आहेत. त्यामुळे आता १३ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उरले आहेत, अशी माहिती जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी किशन जावळे यांनी दिली. त्यामुळे आता रायगड मतदारसंघात निवडणुकीचा धुरळा उडणार असून, उद्यापासून प्रचाराचं धुमशान रंगणार आहे.१३ उमेदवार निवडणूकीच्या रिंगणात असले, तरी खरी लढत ही इंडिया आघाडीचे शिवसेनेचे अनंत गीते आणि महायुतीचे राष्ट्रवादी काँग्रेसचे सुनील तटकरे यांच्यातच खरी लढत होणार आहे. पान ५ वर

### कोणी घेतली माघार?

सोमवारी अर्ज मागे घेण्याच्या दिवशी सुनील दत्ताराम तटकरी (अपक्ष), आस्वाद जयदास पाटील (शेकाप), अभिजित अजित कडवे (अपक्ष), नंदकुमार गोपाळ रघुवीर (लोकराज्य पार्टी), मिलिंद काशिनाथ कांबळे (बहुजन समाज पार्टी आंबेडकर), विजय गोपाळ बना (अपक्ष), गोपाळ यशवंतराव तंतरपाळे (अपक्ष), अस्मिता एकनाथ उंदिरे (अपक्ष) यांनी उमेदवारी अर्ज मागे घेतले.



### निवडणुकीच्या आखाड्यात कोण?

अनंत पद्मा गिते (अपक्ष, निशाणी- गळ्याची टाय), अनंत बाळोजी गिते (अपक्ष, निशाणी- चिमणी), अनंत गंगाराम गिते (शिवसेना - उद्धव बाळासाहेब ठाकरे, निशाणी- मशाल), नतीन जगन्नाथ मयेकर (अपक्ष, निशाणी- पत्रपेटी), मंगेश पद्माकर कोळी (अपक्ष, निशाणी- मनुष्य व शिडी युक्त नाव), प्रकाश बाळकृष्ण चव्हाण (भारतीय जवान किसान पार्टी निशाणी- भेट वस्तू), पांडुरंग दामोदर चौले (अपक्ष, निशाणी- जहाज), सुनिल दत्तात्रेय तटकरे (नॅशनलिस्ट काँग्रेस पार्टी निशाणी- घड्याळ), श्रीनिवास सत्यनारायण मट्टपरती (अपक्ष, निशाणी- हिरा), अजय यशवंत उपाध्ये (अपक्ष, निशाणी- ऑटो रिक्षा), श्रीमती अंजली अश्विन केळकर (अपक्ष, निशाणी- बेल्ट), पान ५ वर

# तळा तालुक्याचा सातबारा कोणाच्या मालकीचा नाही

### अनंत गीतेंचा सुनील तटकरेंना टोला



। तळा । वार्ताहर ।

तळा तालुक्याचा सातबारा कोणाच्या मालकीचा नाही, असा टोला इंडिया आघाडीचे रायगड लोकसभेचे उमेदवार अनंत गीते यांनी सुनील तटकरे यांना लगावला. तळा शहरात आयोजित प्रचारसभेप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर शिवसेना ठाकरे गट जिल्हा प्रमुख अनिल नवगणे, शहर प्रमुख नजीर पठाण, संघटक विलास ठसाळ, शेकाप तालुका चिटणीस ज्ञानेश्वर भोईर यांसह इंडिया आघाडीचे पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी बोलताना अनंत गीते यांनी पान ५ वर

## संजोग वाघेरे पाटील आज अर्ज दाखल करणार



**पनवेल :** मावळ लोकसभा मतदारसंघामध्ये महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार संजोग भिकू वाघेरे पाटील मंगळवारी (दि. २३) उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत. उमेदवारी अर्ज दाखल करण्यापूर्वी महाविकास आघाडी पदयात्रा काढून भव्यशक्ती प्रदर्शन करण्यात येणार आहे.

(सविस्तर वृत्त पान ३ वर)

# ‘अनंत गीतेंच्या पाठीशी भीमशक्ती उभी करणार’

### गोपाळ तंतरपाळे यांची लोकसभेतून माघार

। रायगड । खास प्रतिनिधी ।

लोकसभेचे नेतृत्व करण्यास इंडिया आघाडीचे शिवसेनेचे अनंत गीते हेच एकमेव सक्षम उमेदवार आहेत. सर्व भीमशक्ती त्यांच्या पाठीशी उभी करणार आहे. त्यामुळे विजय हा अनंत गीते यांचाच होणार, असा विश्वास भीमशक्ती महाराष्ट्र राज्याचे सरचिटणीस गोपाळ तंतरपाळे यांनी व्यक्त केला.

उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा सोमवारी अखेरचा दिवस होता. गोपाळ तंतरपाळे यांनी रायगड लोकसभेसाठी दाखल केलेला आपला उमेदवारी अर्ज मागे घेतला. पान ५ वर



## भीषण अपघातात महिला ठार

**पेण :** पेण तालुक्यातील पेण-वाशी रस्त्यावर सोमवारी (दि. २२) सायंकाळी साडेपाचच्या सुमारास रिक्षा आणि कारची समोरासमोर धडक झाली. या अपघातात एक महिला गंभीररित्या जखमी झाल्याने मृत्यू पावली. तर, रिक्षा चालक जखमी झाला. रिक्षा चालकांवर रूग्णालयात उपचार सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली. याबाबत सविस्तर वृत्त असे की, सोमवारी सायंकाळी साडेपाच वाजण्याच्या सुमारास मौजे वाशी गावच्या हद्दीत वाशी नाका ते वाशी असा प्रवास करणाऱ्या भरधाव कारने (एमएच ०६ बीडब्ल्यू २०८६) समोरून येणाऱ्या रिक्षाला (एमएच ०६ झेड २६०८) जोराची धडक दिली. या धडकेत रिक्षातील महिलेचा मृत्यू झाला. याप्रकरणी वडखळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक जाधव करीत आहेत.

## ‘पंतप्रधान मोदींवर कारवाई करा’

**नवी दिल्ली :** : लोकसभा निवडणूक २०२४ च्या दुसऱ्या टप्प्यातील मतदानापूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जाहीर सभेत धार्मिक आणि एका समूहाला उद्देशून केलेल्या विधानावरून देशभरात राजकीय खळबळ उडाली आहे. काँग्रेसने मोदी यांनी केलेल्या विधानाची गंभीर दखल घेत पक्षाच्या शिष्टमंडळाने सोमवारी (दि. २२) निवडणूक आयोगाची भेट घेतली. ज्येष्ठ काँग्रेस नेते डॉ. अभिषेक मनु सिंघवी यांनी निवडणूक आयोग कारवाई करेल अशी आम्हाला आशा असल्याचे म्हटले आहे.

# ट्रॉमा केअर सेंटर कागदावर




। माणगाव । प्रतिनिधी ।

माणगाव उपजिल्हा रुग्णालय हे दिवसेंदिवस ‘अपडेट’ होत असून, महामार्गावरील अपघातग्रस्त रूग्ण उपचार करण्यापासून ते विविध आजारांवरील रुग्णांवर उपचार व शस्त्रक्रिया करण्यासाठी सज्ज आहे. माणगाव उपजिल्हा रुग्णालयाशेजारी ट्रॉमा केअर सेंटर मंजूर झाले होते. मात्र, गेले अनेक दिवस त्याच्या उभारणीकडे शासनाने दुर्लक्ष केल्याने नागरिकांत नाराजी पसरली आहे. मुंबई-गोवा व दिघी-पुणे अशा महत्त्वाच्या राज्य मार्गावर अनेक वेळा अपघाताच्या घटना घडल्या आहेत. या अपघातग्रस्तांवर तातडीने उपचार करण्यासाठी या सेंटरची नितांत गरज आहे. मात्र, त्याच्या उभारणीसाठी पान ५ वर

## दिव्याखाली अंधार...



● स्वच्छ भारत अभियानात अग्रेसर राहणाऱ्या रायगड जिल्हा परिषदेच्या कुंटे बाग येथील कार्यालयासमोर कचऱ्याचा ढीग जमा झाला आहे. (छायाचित्र : समीर मालोदे)

# मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना उशिरा जाग

। पेण । प्रतिनिधी ।




पेण तालुक्यात काविळीच्या साथीने थैमान घातले आहे. परंतु, आरोग्य यंत्रणा ही तोकडी पडत आहेत. गेली दोन वर्षे जिल्हा परिषदेमध्ये प्रशासक असल्याने सर्वसामान्यांचा आवाज अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचत नाही. गेल्याच आठवड्यात वढाव गावची १३ वर्षांची पूर्वा म्हात्रे हिचा या काविळने बळी घेतला. तेव्हा कुठे प्रशासनाचे डोळे उघडले. उशिरा का होईना रविवारी रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. बास्टेवाड यांनी वाशी प्राथमिक आरोग्य केंद्राला भेट दिली.

महत्त्वाची बाब म्हणजे, वाशी आरोग्य केंद्राकडून वरिष्ठांच्या आदेशाची वाट न पाहता उपाययोजनेला सुरूवात केली आहे. कारण, वाशी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी पान ५ वर

## केजरीवालांना दिलासा नाहीच!

**नवी दिल्ली :** अरविंद केजरीवाल यांना जामीन देण्याच्या विनंतीची जनहित याचिका दिल्ली उच्च न्यायालयाने सोमवारी फेटाळून लावली. केजरीवाल यांना असाधारण जामीन दिला जावा, अशी जनहित याचिका दाखल झाली होती. असाधारण जामीन देता येत नाही, असे सांगत न्यायालयाने याचिकाकर्त्याला ७५ हजार रुपयांचा दंड ठोठावला.

## हुकूमशहाची ‘सुरत’ दिसली

### राहुल गांधींचा मोदींवर हल्लाबोल

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

भाजपचे उमेदवार मुकेश दलाल गुजरातच्या सुरत मतदारसंघातून बिनविरोध निवडून आले आहेत. काँग्रेस उमेदवाराचा उमेदवारी अर्ज रद्द झाल्याने त्यांची बिनविरोध निवड झाली. काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी भाजप उमेदवाराच्या विजयावर प्रश्न उपस्थित करत या विजयाची तुलना हुकूमशाहीशी केली आहे.



त्यांनी ट्विटरवर लिहिले की, हुकूमशहाची खरी ‘सुरत’ पुन्हा एकदा देशासमोर आली आहे. जनतेचा नेता निवडण्याचा अधिकार हिरावून घेणे हे बाबासाहेब आंबेडकरांचे संविधान नष्ट करण्याच्या दिशेने आणखी एक पाऊल आहे.

## कर्मचारी, मतदारांच्या सेवेसाठी आरोग्य कर्मचारी तैनात

# मतदान केंद्रांवर होणार प्रथमोपचार

### ■ आपत्कालीन परिस्थितीसाठी १०२ आणि १०८ रुग्णवाहिका सज्ज

। प्रमोद जाधव ।

। अलिबाग ।

रायगड जिल्ह्यात वाढत्या तापमानामुळे उष्माघाताचा धोका निर्माण होण्याची भीती आहे. कामात व्यस्त राहल्याने कर्मचाऱ्यांचे आरोग्य बिघडण्याची भीती अधिक आहे. त्यामुळे मतदानाच्या दिवशी मतदान केंद्रावर कर्मचाऱ्यांसह मतदारांच्या सेवेसाठी आरोग्य कर्मचारी तैनात केले जाणार असून, त्यांच्याकडून प्राथमिक उपचार केले जाणार आहेत. तसेच आपत्कालीन परिस्थितीत शहरी भागात १०८ व ग्रामीण भागात १०२ क्रमांकाची रुग्णवाहिका सज्ज राहणार असल्याची माहिती जिल्हा प्रशासनाकडून देण्यात आली आहे.



रायगड लोकसभा मतदारसंघातील निवडणुकीसाठी १३ उमेदवार रिंगणात असणार आहेत. पाच मे रोजी सायंकाळी साडेपाचनंतर प्रचाराच्या तोफा थंडावणार आहेत. त्यानंतर सात मे रोजी सकाळी साडेसात वाजल्यापासून मतदान केंद्रावर मतदानाला सुरुवात होणार आहे. जिल्ह्यात सुमारे दोन हजारांहून अधिक मतदान केंद्रे आहेत. या मतदान केंद्रांवर सुमारे १२ हजार ५००हून अधिक कर्मचाऱ्यांची नेमणूक केली जाणार आहे. त्यासाठी त्यांना प्रशिक्षण देण्यास सुरुवात केली आहे. पान ५ वर

> मतदान केंद्रामध्ये आरोग्य कर्मचाऱ्यांसह १०२ व १०८ क्रमांकाची रुग्णवाहिका उपलब्ध असणार आहे. वेगवेगळ्या प्रकारची औषधे या ठिकाणी ठेवली जाणार आहेत. प्राथमिक उपचार आरोग्य कर्मचाऱ्यांद्वारे केले जाणार आहे. ग्रामीण व शहरी भागात ही व्यवस्था केली जाणार आहे.
>
> - अंबादास देवमाने, जिल्हा शल्यचिकित्सक

# तळोजात गंभीर पाणीटंचाई

### ऐन आचारसंहितेमध्ये नागरिकांवर आंदोलनाची वेळ

।पनवेल, विशेष प्रतिनिधी

मागील तीन महिन्यांपासून तळोजा वसाहतीमधील नागरिकांना पाण्यासाठी वणवण करावी लागत आहे. तीव्र पाणीटंचाईने तळोजा येथील रहिवासी त्रस्त असून, तळोजा फेज १ आणि २ सीएचएस फेडरेशनमार्फत सोमवारी (दि. २२) घेण्यात आलेल्या बैठकीत पाणीपुरवठासंदर्भात सीडकोवर तीव्र नाराजी व्यक्त केली. याशिवाय पाणी कमी पडते म्हणून टँकरची मागणी सिडको अधिकाऱ्याकडे केली असता सिडको अभियंता राहुल सरोदे यांच्याकडून अपमानास्पद वागणूक आणि अरेरावी सोसायटी रहिवाशांना सहन करावी लागत आहे. त्यामुळे रहिवाशांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे.



सिडकोकडून पाणीपुरवठा होत नाही आणि टँकरनेही पाणीपुरवठा केला जात नाही. अशा परिस्थितीमध्ये खासगी टँकरचा सहारा घ्यावा लागतो आणि त्याचा खर्च प्रचंड आहे. मध्यम आकाराच्या सोसायटीला जवळजवळ दरदिवसा दहा ते पंधरा खासगी टँकर विकत घ्यावे लागतात. त्याचा खर्च दरदिवसा सव्वीस ते तीस हजार इतका आहे. हे सिडको नियोजित शहर आहे.सिडकोने इमारती बांधण्यापूर्वी पाण्याचे पान ५ वर

> तळोजा येथील उपस्थित सर्व सोसायटीच्या सदस्यांनी आजच्या बैठकीत आंदोलनाचा आग्रह धरला असून, त्यासाठी निवडणूक आयोग, पोलीस प्रशासन व इतर शासकीय परवानग्यांसाठी सोमवारी पत्र दिले जाईल आणि प्रशासनाची परवानगी आल्यानंतर पाणीप्रश्नासंदर्भात तीव्र आंदोलन सिडको बेलापूर कार्यालयावर केले जाईल.
>
> - प्रसाद ढगेपाटील, अध्यक्ष, तळोजा फेज १ आणि २ सीएचएस फेडरेशन लि.




# मोदींची जाण्याची वेळ आली

## उद्धव ठाकरेंचा घणाघात



। बुलढाणा । प्रतिनिधी।

२०१९ च्या निवडणुकीत आम्ही भाजपसोबत होतो, तेव्हा नरेंद्र मोदी यांनी महाराष्ट्रात फारतर पाच सहा सभा घेतल्या. मात्र, आता ते राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात फिरत आहेत. याचे कारण त्यांना समजून गेले आहे की, आता आपली जाण्याची वेळ येऊन ठेपली आहे. यामुळे मोदी, 'आम्ही जातो आमच्या गावा, आमचा रामराम घ्यावा,' या धर्तीवर सगळ्यांचा निरोप घेत आहेत, अशा शब्दात शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची खिल्ली उडविली. केंद्रात 'इंडिया' आघाडीचे सरकार येणार, ही काळ्या दगडावरची रेघ असल्याचे त्यांनी बोलून दाखविले.

खामगाव येथील मेहता शाळेच्या मैदानावर महाविकास आघाडीचे उमेदवार नरेंद्र खेडेकर यांच्या प्रचारार्थ आज रात्री उशिरा उद्धव ठाकरेंची सभा पार पडली. यावेळी ते बोलत होते. काँग्रेसचे राष्ट्रीय सचिव मुकुल वासनिक, अंबादास दानवे, आमदार नितीन देशमुख, जिल्हा प्रमुख जालिंदर बुधवत यांच्यासह आघाडीचे प्रमुख नेते यावेळी उपस्थिती होती.

यावेळी बोलताना ठाकरे यांनी मोदींना आपल्या भाषणातून लक्ष्य केले. शेतकरी आत्महत्या करतोय, मालाला भाव नाही, युवकांना रोजगार नाही, माताभगिनी महागाईमुळे बेजार झाल्या, पण यांना त्याचे काही सोयरसुतक नाही. तुम्ही जगा अथवा मरा, पण मला पंतप्रधान करा, असा मोदींचा खाक्या आहे. भाजपला मतदान का करायचे, असा सवाल करून त्यांनी पीएम किसान योजनेची पोलखोल केली. केंद्र सरकार शेतकऱ्यांच्या खात्यात ६ हजार टाकते आणि खतांवर १८ टक्के जीएसटी लावते. सहा हजार टाकायचे अन् जीएसटीच्या रुपाने आलेला पैसा खिशात घालायचा, हा कसला किसान सन्मान?, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. जिजाऊंच्या जिल्ह्यात भगव्याला कलंक लावणाऱ्या गद्दाराला याच मातीत गाडा, असे आवाहनही त्यांनी प्रतापराव जाधव यांचे नाव न घेता उपस्थितांना केले. मुकुल वासनिक यांनी मोदींना हुकूमशहा, असे संबोधित त्यांनी व भाजपने मनमानी चालविली असून घर व पक्ष फोडून लोकशाही तत्वांना तिलांजली दिल्याचे सांगितले. सभा संपल्यानंतर काँग्रेसमधील मतभेद व गटबाजी चव्हाट्यावर आली. या सभेला काँग्रेसचे राष्ट्रीय सचिव मुकुल वासनिक हजर होते.

# महाविकास आघाडीचा मुहूर्त ठरला

। नाशिक । प्रतिनिधी ।

उमेदवारीच्या गोंधळामुळे राज्यभर चर्चेत आलेल्या नाशिक लोकसभा मतदारसंघात महायुतीला अजूनही उमेदवार मिळालेला नाही; तर दुसरीकडे महाविकास आघाडीने उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा मुहूर्त ठरविला आहे. येत्या २९ एप्रिलला नाशिक व दिंडोरी लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार अधिकृतपणे अर्ज दाखल करतील. नाशिक व दिंडोरी लोकसभा मतदारसंघासाठी येत्या शुक्रवार पासून उमेदवारी अर्ज दाखल करण्यास प्रारंभ होणार आहे.

चार दिवसांवर उमेदवारी अर्ज सादरकरण्याचीमुदतयेऊनपोहोचली, तरी अजूनही महायुतीचा उमेदवार निश्चित झालेला नाही. त्यामुळे दिंडोरी लोकसभेच्या महायुतीच्या उमेदवार डॉ. भारती पवार यांनाही उमेदवारी अर्ज भरण्यासाठी 'वेट ॲण्ड वॉच'ची भूमिका घ्यावी लागत आहे. महायुतीचा अर्ज भरण्यासाठी भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, ग्रामविकासमंत्री गिरीश महाजन, 'राष्ट्रवादी'चे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह स्थानिक नेत्यांची वेळ घेऊन एकत्रितपणे अर्ज सादर करण्याचे नियोजन आहे.

परंतु, नाशिकचा उमेदवारच अद्याप निश्चित न झाल्याने महायुतीचा प्रचारही थंडावला. नेत्यांमध्ये मरगळ आली असून, कोणालाही उमेदवारी द्या; पण उमेदवार ठरवा, असे आवाहन स्थानिक पदाधिकारी करीत आहेत. याउलट परिस्थिती महाविकास आघाडीत दिसून येते. नाशिकमध्ये राजाभाऊ वाजे व दिंडोरीत भास्कर भगरे यांची उमेदवारी अंतिम केल्याने प्रचारही सुरू आहे.

दोन्ही उमेदवार २९ एप्रिलला शालिमार येथील शिवसेना कार्यालयापासून जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत प्रचारफेरी काढतील. त्यानंतर एकत्रितपणे अर्ज सादर करणार आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, शिवसेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची वेळ घेण्यासाठी स्थानिक पदाधिकारी प्रयत्नशील आहेत.

# मतदारांना आवश्यक सुविधा पुरवा

## ■ मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांच्या सूचना

। पुणे । प्रतिनिधी ।

जिल्ह्यातील चारही मतदारसंघांत मतदानाचे प्रमाण वाढावे आणि सुलभपणे मतदान करता यावे, यासाठी मतदान केंद्रावर आवश्यक सुविधा पुरविण्यात याव्यात, तसेच त्याची माहिती मतदारांना देण्यात यावी, अशा सूचना राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी दिले.

ते म्हणाले, एकापेक्षा अधिक मतदान केंद्र असलेल्या ठिकाणी मतदार मदत कक्ष ठेवण्यात यावा. मतदारांना रांगेत उभे राहावे लागू नये, यासाठी शक्य असल्यास शहरी भागात प्रतीक्षा कक्षाची सुविधा करावी. मतदानाच्या दिवशी काम गारांना मतदानासाठी पगारी रजा देण्याच्या सूचना उद्योग संस्थांच्या प्रतिनिधींना द्याव्यात.फ्फ

निवडणूकप्रक्रियासुरूअसताना कोणताही कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही, यावर विशेष लक्ष ठेवावे. कुठेही अशी घटना लक्षात आल्यास वेळीच उपाययोजना करा. मतदानांसंबंधी सर्व अहवाल वेळेत सादर करावेत. वेबकास्टिंगद्वारे नियंत्रण कक्षाच्या माध्यमातून मतदान प्रक्रियेवर लक्ष ठेवावे. सी-व्हिजिलवर प्राप्त तक्रारींचे १०० मिनिटांत निराकरण करावे. मतदानाच्या वेळी येणाऱ्या अडचणी टाळण्यासाठी मतदान केंद्र पथकाला मतदान आणि ईव्हीएम विषयक सूक्ष्म बाबींचे प्रशिक्षण द्यावे.

पोलिस विभागाने केलेल्या तयारीची माहिती या वेळी देण्यात आली. जिल्हाधिकारी डॉ. दिवसे यांनी जिल्ह्यातील निवडणूक तयारीची माहिती दिली.

## सोलापुरातून वंचितची माघार

**सोलापूर :** सोलापूर लोकसभा मतदारसंघातून वंचित बहुजन आघाडीच्या वतीने राहुल गायकवाड यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला होता. त्यांचा अर्ज देखील पात्र ठरला होता, पण त्यांनी अर्ज माघार घेण्याच्या दिवशी निवडणुकीतून माघार घेतली आहे. त्यामुळे आता महायुतीचे उमेदवार राम सातपुते व महाविकास आघाडीच्या उमेदवार प्रणिती शिंदे यांच्यात थेट सामना पहायला मिळणार आहे. सोलापूर लोकसभा मतदारसंघातून एमआयएमने देखील उमेदवार न देण्याचा निर्णय यापूर्वीच घेतला आहे.

# उदय सामंतांच्या ताफ्यावर दगडफेक

। यवतमाळ । प्रतिनिधी ।

यवतमाळमध्ये शिंदे गटाचे मंत्री उदय सामंत यांच्या ताफ्यावर दगडफेक झाली आहे. यवतमाळच्या राळेगावमध्ये उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सभेदरम्यान हा प्रकार घडला आहे. एका अज्ञाताने ही दगडफेक केली आहे.



यवतमाळ-वाशिम महायुतीच्या उमेदवार राजश्री पाटील यांच्या प्रचारार्थ देवेंद्र फडणवीस यांची सभा आयोजीत करण्यात आली होती. या सभेला उदय सामंत देखील हजर होते. यावेळी एका अज्ञाताने त्यांच्या ताफ्यावर दगड भिरकावला, सुदैवाने यात कुणी जखमी झाले नाही. पोलिसांनी अद्यापही कुणाला अटक केली नाही. पण पोलीस आरोपींचा शोध घेत आहेत.

यवतमाळ-वाशिम येथील शेतकरीबहुल मतदारसंघातून एकनाथ शिंदे यांना पक्षाच्या पाचवेळा खासदार भावना गवळी यांना हटवून त्यांच्या जागी राजश्री पाटील यांना उमेदवारी दिली. त्यामुळे यवतमाळ-वाशिमची लढत चांगलीच तापली आहे. त्या कुणबी समाजाच्या असून हिंगोलीचे शिवसेनेचे विद्यमान खासदार हेमंत पाटील यांच्या पत्नी आहेत. यवतमाळ-वाशिममध्ये शिवसेनेच्या दोन गटांमध्ये थेट लढत आहे. संजय देशमुख हे शिवसेनेचे उमेदवार आहेत. काँग्रेस आपली पारंपारिक मुस्लिम, दलित व्होटबँक आपल्या मित्रपक्ष शिवसेनेच्या उमेदवाराकडे हस्तांतरित करू शकते की नाही यावरही निकाल अवलंबून असेल.या मतदारसंघाने तेव्हापासून झालेल्या तिन्ही सार्वत्रिक निवडणुकांमध्ये शिवसेना-भाजप उमेदवारांना मतदान केले आहे. यवतमाळ-वाशीममधील सहा विधानसभा मतदारसंघांपैकी शिवसेनेकडे संजय राठोड हा एकच आमदार आहे. भाजपकडे चार तर अजित पवारांच्या राष्ट्रवादीकडे एक आमदार आहे.

## मुकेश दलाल बिनविरोध खासदार

**सुरत :** सुरतमधील उमेदवार मुकेश दलाल हे एकही मत न मिळवता विजयी ठरले आहेत. २२ एप्रिल ही अर्ज मागे घेण्याची शेवटची तारीख होती. दलाल यांच्याविरोधात काँग्रेसकडून कुंभाणी यांना उमेदवारी देण्यात आली होती. मात्र, त्यांच्या अर्जामध्ये पुरस्कर्ते म्हणून देण्यात आलेल्या तीन नावांमध्ये गडबड असल्याचा आरोप करण्यात आला होता. त्यानुसार, निवडणूक अधिकारी सौरभ पारधी यांनी अर्जाची छाननी करून संबंधित व्यक्तींना सादर करण्याचे निर्देश कुंभाणी यांना दिले. मात्र, कुंभाणी यांना एकाही व्यक्तीला सादर करण्यात अपयश आले.

## वे|ध|क

### 'मोदींच्या रुपाने नवा पुतीन नको'

**अमरावती :** देशाचे आजचे पंतप्रधान कुठेही गेल्यानंतर जवाहरलाल नेहरु यांच्यावर टीका करतात. संसदेमध्ये जेव्हा नरेंद्र मोदी जातात तेव्हा सत्ताधारी पक्षाचे खासदार मान खाली घालून बसतात. त्याठिकाणी एकप्रकारची दहशत त्या ठिकाणी दिसून येते. या देशात मोदींच्या रुपाने नवीन पुतीन तयार होत आहे का, अशी परिस्थिती निर्माण झाल्याचे वक्तव्य शरद पवार यांनी केले. ते सोमवारी अमरावतीमध्ये महाविकास आघाडीचे उमेदवार बळवंत वानखेडे यांच्या प्रचारासाठी आयोजित करण्यात आलेल्या सभेत बोलत होते.

### वंचितचे बळ नवख्या पक्षाच्या उमेदवारास

**यवतमाळ :** यवतमाळ-वाशिम लोकसभा मतदारसंघात वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवाराचा अर्ज बाद झाल्याने या पक्षाला निवडणुकीपासून वंचित राहायची वेळ आली. वंचितची भूमिका काय राहते, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष होते. अखेर वंचित बहुजन आघाडी समनक जनता पार्टीचे उमेदवार डॉ. अनिल जयराम राठोड यांना पाठींबा देत असल्याचे वंचितचे जिल्हाध्यक्ष डॉ. नीरज वाघमारे यांनी जाहीर केले. वंचित बहुजन आघाडीने यवतमाळ-वाशिम लोकसभा मतदारसंघात सुभाष पवार यांना उमेदवारी जाहीर केली होती.

### विकासात्मक चर्चेवर उमेदवाराचे मौन

**कळंब :** निवडणुकीत खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर आणि राणाजगजितसिंह कुटुंबियांकडून शिळ्या कढीला ऊत आणून प्रचार करण्यात येत असल्याने यांच्या प्रचारला मतदार वैतागले आहेत. विकासात्मक, पाणी टंचाई यावर उमेदवाराचे मौन कधी सुटणार असा प्रश्न जनता विचारत आहे.कळंब तालुक्याचा विकासाचा अनुशेष अजूनही कायम असून, जनप्रतिनिधी विकासासाठी कोणत्याही योजना आणत नसल्याचे चित्र आहे. तालुक्याचा सिंचनाचा व उद्योगाचा अनुशेष शून्यवत आहे.

# राज्यात सात जागांवर एमआयएमचा फोकस

। मुंबई । प्रतिनिधी ।

हैदराबादेत जन्मलेल्या आणि महाराष्ट्राच्या मराठवाड्यात मूळ धरलेल्या एमआयएम पक्षाची वाढ इतर मुस्लिम पक्षांच्या तुलनेत अल्पकाळात अधिक वेगाने होत आहे. एमआयएम हा पक्ष आता पाय पसरू लागला आहे. मुंबईसह राज्यात मुस्लिम समाजाचे प्राबल्य असलेल्या मतदारसंघात पक्षाच्या वतीने चाचपणी सुरू आहे.मुंबईसह राज्यात लोकसभेच्या सहा ते सात जागांवर एमआयएम पक्ष निवडणूक लढणार आणि त्या जागा जिंकणार, असा ठाम विश्वास एमआयएमचे प्रवक्ते ॲड. वारिस पठाण यांनी व्यक्त केला आहे.



राज्यात लक्षवेधी ठरलेल्या एमआयएम पक्षानेही लोकसभा निवडणुकीत सहा ते सात उमेदवार रिंगणात उतरवण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.निवडून येणाऱ्या जागांवरच उमेदवार उभे करण्याचा एमआयएमचा विचार आहे. त्यादृष्टीने पक्षाने चाचपणी सुरू असून लवकरच एमआयएम उमेदवार जाहीर करणार आहे. ईशान्य मुंबई आणि दक्षिण मुंबई या मुंबईतील दोन मतदारसंघांवर एमआयएमने लक्ष केंद्रीत केले आहे. त्याची चाचपणी एमआयएम पक्षाने सुरू केली आहेत. मुंबईतील हे दोन मतदारसंघ पक्षासाठी अनुकूल आहेत की नाही, याबाबतचा पक्षांतर्गत अहवाल आल्यानंतर तेथे उमेदवारी देण्याबाबतचा निर्णय होणार आहे.

अकबरुद्दीन ओवेसी यांना गेल्या विधानसभा निवडणुकीपूर्वी मुंबईसह महाराष्ट्रातील अनेक शहरांत मोठा प्रतिसाद मिळाला. राज्यातील मुस्लिमांचे राजकीय प्रतिनिधित्व करणारा पक्ष म्हणून एमआयएमची ओळख आहे. ओवेसी १९८४ पासून लोकसभेवर निवडून गेले आहेत. आंध्र आणि महाराष्ट्राशिवाय उत्तर कर्नाटकातही त्यांनी हातपाय पसरवायला सुरुवात केली आहे. महाराष्ट्रात विधानसभेच्या २० जागा लढविणाऱ्या एमआयएमने ११ ठिकाणी दुसऱ्या किंवा तिसऱ्या क्रमांकाची मते मिळविली होती. अमरावती लोकसभा मतदारसंघात प्रकाश आंबेडकर यांच्या वंचितच्या उमेदवाराला एमआयएमने पाठिंबा जाहीर केला आहे. आम्ही दुसऱ्या कोणत्याही पक्षाला पाठिंबा जाहीर केलेला नाही. आम्ही स्वबळावर निवडणूक लढवून जिंकू, असा विश्वास एमआयएमचे प्रवक्ते ॲड. वारीस पठाण यांनी व्यक्त केला आहे. येत्या काळात मुंबई, मराठवाडा आणि आंध्रात महानगरपालिका आणि पंचायत निवडणुका लढवण्याचे एमआयएम ने ठरवले आहे.

## विशाल पाटलांची माघार नाहीच

**सांगली :** सांगली लोकसभा मतदारसंघात तिरंगी लढत पाहायला मिळू शकते. विशाल पाटील यांनी अपक्ष निवडणूक अर्ज दाखल केला. निवडणुकीतून माघार घेण्यासाठी निवडणूक अर्जमाघारी घेण्याचा आज शेवटचा दिवस होता. मात्र विशाल पाटील यांनी माघार घेतलेली नाही. निवडणूक लढण्यावर ते ठाम आहेत. काही वेळा आधी अपक्ष उमेदवारांना निवडणूक चिन्हांचं वाटप करण्यात आलं. यात विशाल पाटलांनाही निवडणूक चिन्ह देण्यात आलंय. अपक्ष उमेदवार विशाल पाटील हे लिफाफा या चिन्हावर निवडणूक लढणार आहेत. विशाल पाटील यांना लिफाफा चिन्ह मिळालं आहे. तर महेश खराडे यांना शिट्टी चिन्ह मिळालं आहे.

# इंडिया आघाडीत येणाऱ्यांना दरवाजे खुले

## शरद पवार यांची ऑफर

। मुंबई। प्रतिनिधी ।

भाजपसोबत जायचं नाही ही आपली भूमिका या आधीही होती, आणि यापुढेही राहिल असं सांगत जर कुणाला परत यायचं असेल तर इंडिया आघाडीत यावं असं शरद पवार म्हणाले. जे सहकारी सोडून गेलेत त्यांना परत यायचं असेल तर यावं, फक्त भाजप नको अशी ठाम भूमिका शरद पवारांनी घेतली. देशाची सत्ता भाजपकडे गेल्यास देशहिताची ठरणार नाही या निष्कर्षापर्यंत आम्ही आलो असून लोक आम्हाला संधी देतील असा विश्वास शरद पवारांनी व्यक्त केला.

शरद पवार म्हणाले की, २०१४ साली भाजपला पाठिंबा द्यायचं जाहीर केलं, पण तो दिला नाही, तो स्ट्रॅटेजीचा भाग होता. मात्र २०१७ साली शिवसेनेला भाजपपासून दूर करून उद्धव ठाकरेंसोबत जायचा आमचा प्लॅन होता, आणि नंतर तो यशस्वी ठरला. जे लोक आता म्हणतात की त्यावेळी भाजपसोबत जायचं ठरलं होतं, त्यांना भाजपसोबत जायचं नव्हतं तर सत्तेसोबत जायचं होतं. निवडणुकीमध्ये सून आपल्या विरोधात उभी राहिली, त्याचा काही त्रास नाही, लोकशाहीत तो प्रत्येकाचा अधिकार असल्याचं शरद पवारांनी स्पष्ट केलं.

# अकोल्यात जाहीर सभांमधून प्रचाराचा धुरळा!

। अकोला । प्रतिनिधी ।

लोकसभा निवडणुकीच्या प्रचाराचा ज्वर चढला आहे. जाहीर सभांमधून प्रचाराचा धुरळा उडण्यास सुरुवात झाली आहे. काँग्रेस व वंचितचादेखील सभांमधून मतदारांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न सुरू आहे. अकोला लोकसभा मतदारसंघात २६ एप्रिलला दुसऱ्या टप्प्यात मतदान होणार आहे.



मतदारसंघात परंपरेनुसार पुन्हा एकदा तिरंगी लढत आहे. भाजपचे धोत्रे, काँग्रेसचे डॉ. अभय पाटील व वंचितचे ॲड. प्रकाश आंबेडकर यांच्यात अटीतटीचा सामना असल्याचे दिसून येते. तिन्ही उमेदवारांकडून जोरदार प्रचार मोहीम राबवली जात आहे. प्रमुख उमेदवारांकडून मतदारांच्या भेटीगाठी, मेळावे, कॉर्नर सभा, बैठकांसह जेवणावळी उठवण्यात आल्या. पहिल्या टप्प्यातील मतदान १९ एप्रिलला पार पडल्यानंतर आता दुसऱ्या टप्प्यात मतदान होणाऱ्या मतदारसंघांकडे राष्ट्रीय व राज्य स्तरावरील वरिष्ठ नेत्यांनी मोर्चा वळवला आहे. काँग्रेस उमेदवार डॉ. पाटील यांच्या प्रचारासाठी काँग्रेसचे राष्ट्रीय नेते मुकुल वासनिक, प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी प्रचारसभा घेतल्या आहेत. वंचित आघाडीचे प्रकाश आंबेडकर निवडणूक रिंगणात असल्याने ते स्वत:च प्रचार सभा घेत आहेत.

# काळ्या पैशांवर कारवाई का नाही

## पृथ्वीराज चव्हाण यांचा सवाल

### केंद्र सरकारकडून शेतकऱ्यांवर अन्याय

**शेतकऱ्यांच्या जीवनात मोदी सरकारने विष कालवले असून, कुणाशी चर्चा न करता मोदी सरकारने शेतीविषयक कायदे केले. मात्र हे कायदे शेतकऱ्यांच्या रेट्यामुळे मागे घ्यावे लागले. त्यामुळे मोदी सरकारचा अपमान झाला आहे. कांदा, गहू, तांदुळ निर्यातबंदी करून मोदी सरकार त्याचा सूड शेतकऱ्यांवर उगवत आहे,असा आरोपही चव्हाण यांनी केला.**

। पुणे । प्रतिनिधी ।

पनामा गैरव्यवहारात देशातील अनेक प्रसिद्ध उद्योगपतींची नावे समोर आली होती. काळ्या पैशांच्या प्रकरणातील सर्व कागदपत्रे मोदी सरकारकडे उपलब्ध आहेत. कागदपत्रे उपलब्ध असताना कोणतीही कारवाई का केली गेली नाही, असा सवाल करत कारवाई करण्याऐवजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यामध्येही तोडपाणी केली, असा हल्लाबोल माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी रविवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर केला.



महाविकास आघाडीचे पुणे लोकसभेचे उमेदवार आमदार रवींद्र धंगेकर यांच्या प्रचारार्थ आयोजित पत्रकार परिषदेत चव्हाण यांनी हा आरोप केला. यावेळी माजी महसूलमंत्री बाळासाहेब थोरात यांच्यासह काँग्रेस पदाधिकारी उपस्थित होते.

चव्हाण यांनी या वेळी गेल्या दहा वर्षांतील मोदी सरकारच्या काळातील कामकाजावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. ते म्हणाले, मोदींच्या १० वर्षांत किती विकास झाला आणि किती अधोगती झाली, २०१४ च्या निवडणुकीत त्यांनी दिलेली आश्वासने किती पूर्ण झाली, याची तुलना झाली पाहिजे. मागे दिलेली आश्वासने का पूर्ण झाली नाही, यावर मोदींनी खुलासा केला पाहिजे. मागील आश्वासने पूर्ण झाली नाहीत, मग आता दिलेली आश्वासने कशी पूर्ण करणार. अर्थव्यवस्थेचा विकास मंदावलेला असून, आर्थिक, नैतिक गैरव्यवहार सुरू आहेत.

# कपिल पाटलांना मतदारांनी रस्त्यावर आणले

## सुरेश म्हात्रे यांची टीका

। भिवंडी । प्रतिनिधी ।

भाजपचे खासदार कपिल पाटील विजयाची हॅट्रिक करत जास्तीत जास्त मताधिक्य मिळविण्यासाठी गल्लोगल्ली प्रचार करत आहेत. मनसेचे राजू पाटील यांची देखील त्यांनी भेट घेतली आहे.

यावरून राष्ट्रवादीचे उमेदवार सुरेश म्हात्रे यांनी २०१४, २०१९ च्या निवडणुकीत पाटील कोणता मोहल्ला, बिल्डिंग मध्ये गेलेले दिसले का आज प्रत्येक बिल्डिंगमध्ये, प्रत्येक रस्त्यावरती कपिल पाटील दिसतात. याचे श्रेय सर्व मतदारांचे आहे. ज्यांनी कपिल पाटील यांना दोन वेळा संधी दिली, आणि तिसऱ्यावेळी रस्त्यावर आणले आहे असे म्हणत म्हात्रे यांनी थेट पाटलांवर निशाणा साधला आहे.



भिवंडी, कल्याण लोकसभेतील महाविकास आघाडीच्या उमेदवारांची एकत्रित पत्रकार परिषद कल्याण येथे आयोजित केली होती. यावेळी सुरेश म्हात्रे यांनी केंद्रीय पंचायत राज्य मंत्री आणि महायुतीचे उमेदवार कपिल पाटील यांच्यावर जोरदार टीका केली.

विकासाच्या मुद्द्यावर मी ही निवडणूक लढविणार आहे. भिवंडी लोकसभा मतदारसंघात केंद्रीय मंत्री आणि या भागाचे खासदार कपील पाटील यांनी मागील दहा वर्षात विकासाची कोणतीही कामे केली नाहीत.

मी विजयी झाल्यावर या भागातील विकास कामावर फोकस करणार असून प्रत्येक वर्षात काय काम केली व पुढे काय काम करणार याचा लेखाजोखा मांडणार. जो पाटलांनी आतापर्यंत कधी मांडला नाही.

कोणाला बोलण्याची संधी मिळणार नाही असे ही म्हात्रे म्हणाले. भिवंडी परिसरात एकही चांगला रस्ता नाही. सर्वो पचारी रुग्णालय नाही. लोकांना उपचारासाठी ठाणे, मुंबईत जावे लागते. निवडणुका जवळ आल्या की कपील पाटील फक्त कल्याण-मुरबाड-नगर रेल्वेचा विषय उकरून काढून त्या विषयी चर्चा घडवून आणतात. त्यांच्याकडून या विषयीचा पाठपुरावा होत नसल्याने हा रेल्वे मार्ग रखडला आहे, अशी टीका त्यांनी केली.

### पाटलांना तिसऱ्या वेळी रस्त्यावर आणले

**पाटील यांनी प्रचाराचा धुमधडाका लावला आहे. मनसेचे प्रमुख राज ठाकरे यांचे देखील त्यांनी भेट घेतली आहे यावर बोलताना म्हात्रे म्हणाले, २०१४ निवडणूक, २०१९ निवडणूक कपिल पाटील कुठल्या बिल्डिंगमध्ये, मोहल्ला मध्ये गेले होते का प्रचाराला? हे मला सांगा. नाही गेले, आज प्रत्येक बिल्डिंगमध्ये, प्रत्येक रस्त्यावरती कपिल पाटील दिसतात. याचे श्रेय सर्व मतदारांचे आहे. ज्यांनी कपिल पाटील यांना दोन वेळा संधी दिली आणि तिसऱ्यावेळी रस्त्यावर आणले आहे.**

# निवडणूक खर्चाच्या नोंदी काटेकोर ठेवा

## जिल्हाधिकाऱ्यांचा खर्च निरीक्षकांना आदेश

। पुणे । प्रतिनिधी ।

जिल्ह्यातील चारही लोकसभा निवडणुकांसाठी विविध राजकीय पक्षांच्या उमेदवारांकडून निवडणूक प्रचारासाठी केल्या जाणाऱ्या खर्चाच्या नोंदी कक्ष अधिकारी व कर्मचाऱ्यांनी काटेकोरपणे अद्ययावत ठेवाव्यात, असा आदेश जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी दिला आहे.

लोकसभा निवडणूक खर्चाबाबतच्या विहित नमुन्यातील नोंदीवउमेदवारांनीदिलेल्याखर्चाच्या माहितीच्या नोंदींची पडताळणी करावी. या खर्चाच्या नोंदवह्या अद्ययावत ठेवाव्यात, अशी सूचना विविध लोकसभा मतदारसंघासाठी नियुक्त करण्यात आलेल्या निवडणूक खर्च निरीक्षकांना दिल्या आहेत.

या वेळी निवडणूक निर्णय अधिकारी दीपक सिंगला यांनी मावळ लोकसभा मतदारसंघामध्ये स्थापित केलेल्या विविध कक्षांची माहिती दिली.

यावेळी सहायक निवडणूक निर्णय अधिकारी सुरेंद्र नवले, समन्वय अधिकारी प्रवीण ठाकरे, हिम्मत खराडे आदी उपस्थित होते. निवडणूक खर्चाची नोंद योग्य पद्धतीने घ्यावी, अशा सूचना निरीक्षकांना केल्या.

## वे|ध|क

# अनंत गीतेंचा विजय निश्चित

## तालुका चिटणीस रमेश मोरे यांचा विश्वास

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

रायगड लोकसभा मतदार संघाच्या अनेक निवडणुका झाल्या. शेतकरी कामगार पक्ष ज्या उमेदवाराच्या सोबत असतो. त्या उमेदवारांना निवडून देण्याची प्रचंड मेहनत शेतकरी कामगार पक्ष घेता, हा एक मोठा इतिहास आहे. यावेळीदेखील अनंत गीते यांना शेकापने पाठींबा दिला आहे. कुणबी समाजदेखील त्यांच्यासोबत आहे. त्यांना मतदारांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे. त्यामुळे अनंत गीते यांचा विजय निश्चित आहे, असा विश्वास शेकाप माणगाव तालुका चिटणीस रमेश मोरे यांनी व्यक्त केला आहे.



रायगड लोकसभा मतदार संघातील मतदान येत्या ७ मे रोजी होणार आहे. त्या निमित्ताने महाविकास आघाडीचे उमेदवार अनंत गीते यांनी संवाद प्रचाराच्या माध्यमातून मतदारांपर्यंत पोहचण्याचा प्रयत्न केला आहे. वेगवेगळ्या तालुक्यातील गावे, वाड्यांमधील मतदारांसह कार्यकर्त्यांकडून गीते यांचे जल्लोषात स्वागत केले जात आहे. गीते यांच्या उमेदवारीमुळे तरुणांमध्येदेखील प्रचंड उत्साह निर्माण झाला आहे.

रायगड लोकसभा मतदार संघात गेल्या महिन्या भरापासून अनंत गीते यांचा संवाद सभा सुरु आहे. अलिबागपासून अनेक तालुक्यात या बैठका होत आहेत. या बैठकांना कार्यकर्ते प्रचंड संख्येने उपस्थितीत राहून गीतेंना पाठींबा देत आहेत. गावागावात त्यांचे आगमन होताच अनंत गीते यांचे जल्लोषात स्वागत केले जात आहे. ज्येष्ठ कार्यकर्त्यांसह तरुण कार्यकर्ते स्वयंस्फुर्तीने या बैठकांमध्ये सामील होऊन गीतेंना निवडून देण्यासाठी आवाहन करीत आहेत. या लोकसभा निवडणूकीत आघाडीचे उमेदवार अनंत गीते यांना निवडून आणण्याचा विडा शेकापचे नेते आ. जयंत पाटील यांनी उचलला आहे. त्यांच्या आदेशाचे पालन जिल्ह्यातील कार्यकर्ते करीत आहेत. गावोगावी जाऊन गाव बैठका घेऊन गीतेंना निवडून देण्याचे आवाहन कार्यकर्ते करीत आहेत. या आवाहनालादेखील उत्स्फुर्त प्रतिसाद मिळत आहे. त्यामुळे या निवडणूकीत अनंत गीते यांचा विजय निश्चितच होईल असा विश्वास आहे, असे शेकाप माणगाव तालुका चिटणीस रमेश मोरे यांनी व्यक्त केला आहे.

# उरणमध्ये दुचाकी रॅली

**। उरण । वार्ताहर ।**

लोकसभेची निवडणूक जाहीर झाली असल्याने मतदारांनी जास्तीत जास्त संख्येने मतदान करावे, यासाठी उरण येथे बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

मतदान जागृती अभियान स्वीप कार्यक्रमाअंतर्गत उरणचे तहसीलदार उद्धव कदम यांच्या आदेशानुसार पंचायत समिती शिक्षण विभागाच्या वतीने गटशिक्षणाधिकारी प्रियांका म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली उरण तालुक्यात विविध कार्यक्रम राबविले जात आहेत. चाणजे ग्रामपंचायत हद्दीतून सुरू झालेल्या दुचाकी रॅलीची सांगता मोरा जेट्टी परिसरात झाली. शेवे केंद्राचे केंद्रप्रमुख संतोष पवार यांनी या दुचाकी रॅलीचे नेतृत्व केले. रॅलीत शेवे केंद्रातील शिक्षक व मुख्यध्यापक सहभागी झाले होते. यावेळी मतदारांनी आपला मतदानाचा हक्क न चुकता बजावला पाहिजे, असे संतोष पवार यांनी सांगितले.

# बारणेंना धोबीपछाड देणारा उमेदवार रिंगणात

**उमेदवारी अर्ज दाखल करण्यापूर्वी संजोग वाघेरे पाटील व उपस्थित तमाम कार्यकर्ते पिंपरी गाव येथील श्री काळभैरव मंदिर, छत्रपती शिवाजी महाराज स्मारक, साई चौक, भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर स्मारक, शगुन चौक, काळेवाडी,चिंचवड गाव, मोरया गोसावी मंदिर, वीर चाफेकर बंधू यांचे स्मारक,आकुर्डी येथील खंडोबा मंदिर असे ठिकाणी वंदन अभिवादन करत पदयात्रेस प्रारंभ करणार आहेत.**



**। पनवेल । वार्ताहर ।**

अठराव्या लोकसभा निवडणुकीसाठी महाराष्ट्रातील ३३ मावळ लोकसभा मतदारसंघांमध्ये महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार संजोग भिकू वाघेरे पाटील मंगळवार दिनांक २३ एप्रिल रोजी उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत. पुणे महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण - आकुर्डी (पीएमआरडीए) येथे उमेदवारी अर्ज दाखल करण्यापूर्वी महाविकास आघाडी पदयात्रा काढून भव्यशक्ती प्रदर्शन करणार आहे. दोन वेळा लोकसभेचे सदस्य राहून लक्षवेधी विकास कामे करण्यात सपशेल अपयशी ठरलेले विद्यमान खासदार महोदयांना धोबीपछाड देणारा एक खमका उमेदवार महाविकास आघाडीने रिंगणात उतरवल्यामुळे मावळ लोकसभा निवडणुकीकडे लक्ष लागून राहिले आहे.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे संजोग वाघेरे पाटील यांची निशाणी धगधगती मशाल असून शिवसेनेसह तमाम मित्र पक्षांचे नेते, कार्यकर्ते आणि विशेष महत्त्वाचे म्हणजे सामान्य जनता हा अर्ज दाखल करण्यासाठी मोठ्या संख्येने रस्त्यावर उतरणार असल्याचे खात्रीलायक सूत्रांकडून समजते. युवा सेना प्रमुख तथा माजी पर्यटन मंत्री आदित्य ठाकरे, माजी मंत्री तथा महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे माजी अध्यक्ष माणिकराव ठाकरे, शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस आमदार भाई जयंत पाटील, कर्जत जामखेड विधानसभेचे लोकप्रिय आमदार रोहित दादा पवार, संसदरत्न खासदार डॉक्टर अमोल कोल्हे, शिवसेनेचे पुणे जिल्हा संपर्क प्रमुख आमदार सचिन भाऊ आहीर, रायगड जिल्हा संपर्कप्रमुख बबन दादा पाटील, जिल्हाप्रमुख शिरीष घरत, माजी आमदार बाळाराम पाटील, माजी आमदार मनोहर भोईर, रायगड जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष तथा कामगार नेते महेंद्र घरत, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष सतीश पाटील, रायगड जिल्हा काँग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष सुदाम पाटील, युवा नेते प्रीतम म्हात्रे आदी प्रमुख मान्यवरांच्या समवेत सर्व महानगरपालिकांतील महाविकास आघाडीचे नगरसेवक, पंचायत समिती, जिल्हा परिषद सदस्य, सर्व मित्र पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते यावेळी उपस्थित राहणार आहेत.

आकुर्डी येथील खंडोबाचा माळ ते म्हाळसाकांत चौक ते छत्रपती संभाजी महाराज चौक मार्गे आकुर्डी रेल्वे स्टेशन इथपर्यंत पदयात्रा काढण्यात येणार आहे. या ठिकाणी पदयात्रेचे भव्य जाहीर सभेत रूपांतर होणार असल्याचे आयोजकांकडून सांगण्यात आले. दोन टर्म खासदारकी उपभोगणारे महोदयांच्या निष्क्रियतेमुळे मावळ लोकसभा मतदारसंघांमध्ये असमाधनाचे वातावरण पाहायला मिळत आहे. संजोग वाघेरे पाटील यांच्या रूपाने महाविकास आघाडीने जनमानसाशी नाळ जुळलेला आणि विकास कामांप्रती सजग असलेला खमका उमेदवार दिल्यामुळे येथे विद्यमान खासदारांना धोबीपछाड देण्याची दाट शक्यता नागरिकांच्यातून वर्तवली जाते.

मावळ लोकसभा मतदारसंघांमध्ये शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गट, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार साहेब गट, काँग्रेस, शेतकरी कामगार पक्ष, समाजवादी पार्टी व मित्र पक्षांच्या कार्यकर्त्यांच्यात सुंदर समन्वय असल्याने महाविकास आघाडीच्या उमेदवाराचा विजय अटळ असल्याचे राजकीय विश्लेषकांचे म्हणणे आहे.

# जिल्हा परिषदेत मिळालेल्या मतदानाचा रेकॉर्ड या निवडणुकीत ब्रेक करा : किशोर जैन

**। नागोठणे । वार्ताहर ।**

रायगड जिल्हा परिषदेच्या मागील निवडणुकीत शहर व विभागात मला प्रचंड मताधिक्य देत निवडून दिले होते. यामागे शिवसेनेचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांची मेहनत, शहर व विभागातील जनतेचे माझ्यावर असलेले प्रेम होते. त्यामुळे रायगड लोकसभेच्या या निवडणुकीतही रायगड जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत मला मिळालेल्या मतदानाचा रेकॉर्ड या लोकसभा निवडणुकीत ब्रेक करा असे आवाहन शिवसेना (उबाठा) जिल्हा सहसंपर्क प्रमुख व कोकण पदवीधर मतदार संघ यंत्रणा प्रमुख किशोरभाई जैन यांनी केले.



रायगड लोकसभेचे इडिया आघाडीचे अधिकृत उमेदवार अनंत गिते यांच्या प्रचारार्थ लोकसभा निवडणूक यंत्रणा लावण्याकरिता इंडिया आघाडीच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची एक सभा भारतीय एज्युकेशन सोसायटीच्या वेलशेत येथील शैक्षणिक संकुलातील सभागृहात रविवारी (दि.२१) सायंकाळी संपन्न झाली. त्यावेळी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना किशोरभाई जैन बोलत होते.

किशोरभाई जैन यांच्यासह शिवसेना दक्षिण रायगडचे संपर्क प्रमुख व रायगड लोकसभा मतदार संघाचे समन्वयक संजय कदम, राज्य विस्तारक सुधीर ढाणे, विभाग प्रमुख संजय भोसले, उपविभाग प्रमुख बळीराम बडे, उपविभाग प्रमुख ज्ञानेश्वर शिर्के, गंगाराम मिणमिणे, काँग्रेसचे शहर अध्यक्ष अशपाक पानसरे, नागोठण्याचे माजी सरपंच डॉ. मिलिंद धात्रक, विद्यमान उपसरपंच अखलाक पानसरे, शेकापचे डॉ. अनवर हाफिज, शिवसेना नागोठणे शहर प्रमुख धनंजय जगताप, शहर संपर्क प्रमुख अनिल महाडिक, सगिर अधिकारी, असगर मुल्ला, विजय गोळे आदींसह इंडिया आघाडीचे पदाधिकारी उपस्थित होते.

# लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शस्त्रे जमा

**। पनवेल । वार्ताहर ।**

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर परिमंडळ २ हद्दीतील नागरिकांनी, व्यापाऱ्यांनी, राजकीय पक्षाच्या व्यक्तींनी त्यांच्याकडे असलेली परवाना शस्त्रे संबंधित पोलीस ठाण्यात जमा करण्याचे आवाहन करण्यात आले होते. त्यानुसार ९९ टक्के शस्त्रे पोलीस ठाण्यात जमा झाल्याची माहिती देण्यात येत आहे. भयमुक्त वातावरणात निवडणुका संपन्न व्हाव्यात यासाठी नेहमीप्रमाणे पोलीस खाक्याकडून परवाना शस्त्रे जमा करण्याचे आदेश निघाले होते. पनवेल परिसरातील सर्वच पोलीस ठाण्यातून अशा प्रकारे परवानाधारक शस्त्रे असलेल्या व्यक्तींना कळविण्यात आले होते. त्यानुसार संबंधित व्यक्तींनी आता आपली शस्त्रे आपल्या नजिकच्या पोलीस ठाण्यात जमा केली आहेत. त्याचे प्रमाण ९९ टक्के असून काही बँका, व्यापारी, पोलीस खाते आदींची शस्त्रे फक्त शासकीय नियमाप्रमाणे जमा करण्यात आली नाहीत. त्यामुळे पोलिसांच्या आवाहनाला चांगला प्रतिसाद मिळत असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले आहे.

# अनंत गीते यांना बहुमतांनी निवडून द्या

## सुरेंद्र म्हात्रे यांचे आवाहन



**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

लोकसभा निवडणुकीसाठी इंडिया आघाडीच्या सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी कामाला लागा. ही निवडणूक निष्ठावंत विरुध्द गद्दार अशी आहे. त्यामुळे प्रत्येकाने रात्रीचा दिवस करून अनंत गीते यांना बहूमतांनी निवडून द्या असे आवाहन उध्दव ठाकरे गटाचे जिल्हा प्रमुख सुरेंद्र म्हात्रे यांनी केले.

लोकसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर इंडिया आघाडीच्या पदाधिकाऱ्यांची आढावा बैठक शिवसेना जिल्हाप्रमुख संपर्क कार्यालय येथे घेण्यात आली. यावेळी ते बोलत होते.

यावेळी शेकापचे संदिप घरत, शरद वरसोलकर, भाई मळेकर, काँग्रेसचे नितीन नाईक, चौल विभाग प्रमुख मारुती भगत, शिवसैनिक राजेंद्र वर्तक व इंडिया आघाडीचे सर्व कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी सुरेंद्र म्हात्रे म्हणाले, महाविकास आघाडीचे उमेदवार अनंत गीते यांनी खासदारपासून केंद्रीय मंत्री म्हणून केंद्रात काम केले आहे. निष्ठावंत नेते म्हणून त्यांची वेगळी ओळख आहे. विकासाच्या नावाखाली स्वतःच्या स्वार्थासाठी काही मंडळींनी शिवसेनेशी गद्दारी केली. या गद्दारांना जागा दाखविण्याची वेळ आता आली आहे. त्यांना या निवडणुकीत पराभूत करून एक वेगळा इतिहास आपल्या सर्वांना घडवायचा आहे. जिल्ह्यात इंडिया आघाडीचे कार्यकर्ते चांगल्या पध्दतीने काम करीत आहेत. जनतेचे कौल हे निष्ठावंतानाच मिळणार आहे अशा विश्वास व्यक्त करीत अनंत गीतें यांना चौल विभागातून पाच हजारहून अधिक मताधिक्यांची आघाडी देऊ अशी ग्वाही जिल्हाप्रमुख सुरेंद्र म्हात्रे यांनी दिली.

# म्हसळ्यात मतदार जनजागृती

**। म्हसळा । वार्ताहर ।**

तहसीलदार समीर घारे यांच्या मार्गदर्शनाखाली तहसील कार्यालय व पंचायत समिती शिक्षण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने न्यू इंग्लिश स्कूल म्हसळा येथे तालुक्यातील नवनियुक्त शिक्षकांची सभा घेण्यात आली. त्यावेळी मतदार जनजागृती अंतर्गत राबविण्यात आलेले व येणाऱ्या उपक्रमाबाबत मार्गदर्शन गटशिक्षणाधिकारी संतोष दौंड यांनी दिली.

यावेळी त्यांनी आपल्या तालुक्यातील सर्व मतदार केंद्रांवर अधिकाधीक मतदान होण्यासाठी आपण वेगवेगळे उपक्रम आयोजित करावे. मंडळ अधिकारी सलिम शहा यांनी सर्व उपस्थितांकडून निर्भयपणे व नि:पक्षपातीपणे मतदान करण्याची प्रतिज्ञा घेण्यात आली.

यावेळी अव्वल कारकून विशाल भालेकर, तलाठी गोरखनाथ माने, अजिंक्य पाटील, प्रणाली बेडसे, केंद्र प्रमुख किशोर मोहिते, अरविंद मोरे, नरेश सावंत, बशीर उल्डे, प्रविण कांबळे, विजय निमजे, सलाम कौचाली, विषय साधन व्यक्ती संदीप भोनकर, नंदकुमार जाधव, किशोर पैलकर, दुर्रानी खान व तालुक्यातील ८५ नवनियुक्त शिक्षणसेवक उपस्थित होते. शेवटी सर्कल सलिम शहा यांनी उपस्थितांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता झाली.



# स्वाभिमानी युथ रिपब्लिकनचा संजोग वाघेरे यांना पाठिंबा



**। पनवेल । प्रतिनिधी ।**

स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पक्षाचे रायगड जिल्हा अध्यक्ष महेश साळुंखे यांनी आज आपल्या पक्षाच्या प्रमुख कार्यकर्त्यांच्या साथीने शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे जिल्हाप्रमुख शिरीष घरत यांची भेट घेऊन मावळ लोकसभा मतदार संघाचे महाविकास आघाडीचे उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांना पाठिंबा जाहीर केला.

स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्ष सागर संसारे यांनी राज्य पातळीवर महाविकास आघाडीशी युती केलेली आहे. परंतु रायगड जिल्ह्यातील असलेल्या मावळ व रायगड रत्नागिरी लोकसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांनी अजून पर्यंत स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पक्षाच्या रायगड जिल्हाध्यक्षांची संपर्क साधलेला नाही त्यामुळे सर्व कार्यकर्ते संभ्रमात होते. त्यानुसार आज स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पक्षाचे रायगड जिल्हा अध्यक्ष महेश साळुंखे यांनी आपल्या पक्षाच्या प्रमुख कार्यकर्त्यांच्या साथीने शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे जिल्हाप्रमुख शिरीष घरत यांची भेट घेऊन मावळ लोकसभा मतदार संघाचे उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांना पाठिंबा जाहीर केला. त्यासंदर्भातील पाठिंब्याचे पत्र जिल्हाप्रमुख शिरीष घरत यांना दिले. यावेळी त्यांच्या समवेत महानगर समनव्यक दीपक घरत यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

# पोलिसांनी केली हत्यारे हस्तगत

**पनवेल** : लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर परिमंडळ २ पनवेलचे पोलीस उप आयुक्त विवेक पानसरे यांच्या मार्गदर्शनाखाली कळंबोली पोलीस ठाणे हददीत सायन पनवेल महामार्गा लगत असलेल्या जाधववाडी येथे कोबिंग व ऑल आऊट ऑपरेशन राबविण्यात आले. त्यामध्ये कळंबोली पोलिसांनी या ठिकाणाहून दोन प्रकरणात एक तलवार, एक सत्तूर व हजारो रूपये किमतीच्या चालू वाहनांच्या बॅटऱ्या हस्तगत करून सदर आरोपी विरोधात गुन्हा दाखल केला . कळंबोली पोलीस ठाण्याचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र कदम, पोलीस निरीक्षक गजानन घाडगे यांच्यासह ७ अधिकारी व २३ अंमलदार यांनी एकत्रितपणे कळंबोली परिसरातील हद्दीमध्ये कारवाई केली.

# श्रीरंग बारणेंवर तीन गुन्हे; प्रतिज्ञापत्रात माहिती सादर

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

मावळ लोकसभा मतदारसंघातून सलग तिसऱ्यांदा उमेदवारी अर्ज दाखल करणारे श्रीरंग बारणे यांच्यावर ८५ लाखांचे कर्ज आहे. स्वतः १९५ कोटींचे मालक असलेले खासदार बारणे यांच्या तीन गुन्हे दाखल असून खासदारांचे पत्नी सरिता यांच्याकडे ४९ कोटींची मालमत्ता आहे.

खासदार बारणे त्यांच्याकडे २६ लाखाची रोकड असून तर त्यांच्या पत्नी सरिता यांच्याकडे १२ लाखाची रोकड आहे.तर खासदार बारणे यांची बँकेत कॅश क्रेडिट तीन कोटींची आहे. दरम्यान,खासदार हे ३६ लाख तर ३१ लाख आयकर परतावा करतात.मावळ लोकसभा मतदारसंघात आज विद्यमान खासदार शिवसेनेचे श्रीरंग बारणे यांनी तिसऱ्यांदा लोकसभा उमेदवार म्हणून नामांकन अर्ज दाखल केला.

खासदार बारणे हे शेती, बांधकाम आणि विट उत्पादक असून त्यांच्या पत्नी यांचा शेती उद्योग आणि वाहतूक व्यवसाय आहे. खासदार बारणे यांच्याकडे वारस हक्काने आलेली स्थावर, जंगम आणि स्व खरेदी केलेली आणि बांधकाम व्यवसाय मधील अशी एकूण तब्बल १८९ कोटींची मालमत्ता आहे. त्यात वारस हक्काने आलेली मालमत्ता ३१ कोटींची स्वखरेदी केलेली मालमत्ता ही ५९ कोटींची असून ही बांधकाम क्षेत्रातील सर्व मालमत्ता ही साधताना ९० कोटींची आहे. खासदार बारणे यांच्यावर ८५ लाखांचे कर्ज आहे. त्यांच्या पत्नी सरिता श्रीरंग बारणे यांच्याकडे स्थावर,जंगम, स्वखरेदी अशी ४९ कोटींची मालमत्ता आहे. खासदार बारणे यांनी आपल्या प्रतिज्ञापत्रात आपल्यावर तीन गुन्हे दाखल असल्याचे नमूद केले आहे.

# गीतेंनी केला संभ्रम दूर

**। आंबेत । वार्ताहर ।**

महाविकास आघाडीचे उमेदवार अनंत गीते यांनी आंबेतमधील अल्पसंख्यांक समाजाला भेट दिली. माजी मुख्यमंत्री अंतुले यांचे जावई मुश्ताक अंतुले यांनी आज राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला त्यांनतर अंतुले यांच्या मूळ गाव आंबेतमधील नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण झाला. यासंदर्भात गीते यांनी अल्पसंख्यांक समाजाला भेट देत त्यांचे विचार ऐकून मार्गदर्शन केले. मात्र त्यांना मुश्ताक अंतुले यांच्या पक्ष प्रवेशावर विचारणा करण्यात आल्यानंतर त्यांनी गावकऱ्यांसमवेत पूर्वनियोजित भेट आहे. त्यामुळे कोणी कुठे प्रवेश घ्यायचा, हा ज्याचा त्याचा अधिकारी म्हणत आम्ही लोकशाहीचा आदर करणारे आहोत, असे वक्तव्यं केले.

# निवडणूक ड्युटी टाळणाऱ्यांवर कारवाईचे संकेत

**। रायगड । प्रतिनिधी ।**

रायगड लोकसभा मतदार संघाच्या निवडणुकीसाठी जिल्हा प्रशासन जोरदार तयारी करीत आहे. यात निवडणूक कर्मचाऱ्यांची भूमिका महत्त्वाची असल्याने सध्या कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण सुरू आहे. मतदान होत असताना यंत्र बंद पडणे, केंद्रावर वाद होणे अशा घटनांवर नियंत्रण मिळवून मतदार सुरळीत होईपर्यंत कर्मचाऱ्यांची सुटका होत नसते. त्यामुळे अनेक कर्मचाऱ्यांना हे काम किचकट, कटकटीचे वाटते. जिल्ह्यातील ३२३ कर्मचाऱ्यांनी निवडणूक कर्मचारी म्हणून काम करण्यास नकार व्यक्त केला आहे. निवडणूक कर्मचारी म्हणून काम करण्यास असमर्थ असल्याचे दाखवण्यासाठी काही कर्मचाऱ्यांनी लग्न पत्रिकेसारखी खोटी कागदपत्रे जोडल्याने त्यांच्यावर कारवाई होण्याची शक्यता आहे.

रायगड लोकसभेसाठी २ हजार १८७ मतदान केंद्रांवर ७ मे रोजी मतदान होणार आहे. मतदानासाठी शासकीय कर्मचारी, शिक्षक, अधिकाऱ्यांच्या नेमणुका करण्यात आल्या आहेत. आदेश निघताच नियुक्ती रद्द करण्यासाठी कर्मचाऱ्यांकडून जिल्हा प्रशासनाकडे वेगवेगळी कारणे पुढे केली जात आहेत. खोट्या लग्नपत्रिका, आई-वडिलांचे आजारपण, वाढते तापमान, वयोमानामुळे होणारी दगदग असह्य यासाठी वैद्यकीय फायलींसह शारीरिक व्याधींचे पुरावे अर्जांसोबत जोडले जात आहेत. असे ३२३ अर्ज जिल्हाधिकाऱ्यांकडे आले आहेत.

मतदानासाठी नियुक्ती झाल्यानंतर त्यासंबंधी प्रशिक्षण दिले जाते, हे प्रशिक्षण सद्या सुरू आहे. प्रशिक्षणादरम्यान काही कर्मचाऱ्यांनी निवडणूक ड्युटीस नकार दिला आहे. जिल्ह्यातील काही मतदान केंद्र दुर्गम भागात आहेत. फारशा नागरी सुविधा नसलेल्या गावपाड्यांवरील मतदान केंद्रावर आदल्या दिवशी मतपेट्या घेऊन हजेरी लावणे कर्मचाऱ्यांना गरजेचे असते. हे काम कर्मचाऱ्यांच्या जिवावर येत असल्याची स्थिती आहे. यातून वाचण्यासाठी नियुक्ती रद्द करण्यासाठी निवडणूक निर्णय अधिकारी, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी आणि संबंधित अधिकाऱ्यांकडे अर्जांचा पाऊस पडत आहे.

दरम्यान, वैद्यकीय अडचणींचे पुरावे दिल्याने पडताळणी करत काही जणांच्या नियुक्त्या रद्द करण्यात आल्या आहेत. कोणत्याही कारणाशिवाय काही कर्मचारी बहाणे करून नियुक्ती रद्द करण्याचा प्रयत्न करीत आहेत. यासाठी दबाव, वशिला आणि खोटे पुरावे आदींचा फंडा उपयोगात आणला जात आहे. मात्र निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के यांनी येणाऱ्या प्रत्येक अर्जाची पडताळणी करून खोटे अर्ज फेटाळून लावले आहेत.

लोकसभा निवडणूक ड्युटी रद्द करण्यासंदर्भात एक दोन कर्मचाऱ्यांनी तर लग्नाची खोटी पत्रिका बनवून आपल्या अर्जासोबत नोडल अधिकारींकडे सादर केली आहे. मात्र त्यावर तारीख टाकताना मराठी तिथी चुकीच्या पडल्याचे चाणाक्ष नोडल अधिकाऱ्यांच्या लक्षात येताच त्यांनी यासंदर्भात कारवाई करण्यास सुरुवात केली आहे. निवडणूक ड्युटी रद्द करण्यासाठी खोटी लग्न पत्रिका बनवत अधिकाऱ्यांची दिशाभूल करण्याऱ्या या कर्मचाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात येणार असल्याचे संकेत जिल्हा प्रशासनाने दिले आहेत.

खरोखरच एखाद्या कर्मचाऱ्याची अडचण असेल तर त्यावर अन्याय होऊ नये, हा आमचा प्रयत्न आहे. यासाठी ड्युटी रद्द करण्यासंदर्भात आलेल्या प्रत्येक अर्जाची छानन करण्यात येत आहे. आजारी असल्याचे कारण दिलेल्या कर्मचाऱ्यांना काही व्यक्तीच्या नावे फोन करून त्याची पडताळणी करण्यात येत आहे. तर दुसरीकडे खोटी कारण देणाऱ्यांवर कारवाईचा बडगा उगारण्यात येत आहे.

तृतीय स्मृतीदिन
भावपूर्ण श्रद्धांजली



कै.बेबी एकनाथ विशे
जन्म ०५-०६-१९६० मृत्यू २३-०४-२०२१
मु.पो.मुगांव, ता. शहापूर, जि. ठाणे
शोकाकुल
श्री. एकनाथ आण्णा विशे (पती), श्री. प्रशांत विशे (मुलगा), श्री. विकास विशे (मुलगा), सौ. उज्ज्वला शिवाजी शिंदे (मुलगी) व जावई परिवार.

आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ ▌MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)


# बाजू कोणी बदलली?

फाटाफुटीमुळे राज्यातील राजकीय चित्र उलटेपालटे झाले आहे. गेल्या वेळी एकमेकांचे विरोधक असणारे आता एकमेकांच्या खांद्याला खांदा लावून उभे आहेत. यामुळे सर्वच राजकीय पक्ष एकाच माळेचे मणी असल्याची टीका होते. त्यातून निराशा पसरवण्याचा प्रयत्न केला जातो. पण बारकाईने पाहिल्यास ते खरे नाही हे लक्षात येईल. बाजू नेमकी कोणी बदलली हे समजून घ्यायला हवे. २०१४ नंतर भारतीय जनता पक्ष प्रबळ झाला व दोनदा केंद्रात सत्ता आली. अनेक राज्यांमध्येही तो एकहाती राज्य करू लागला. हा पक्ष एकेकाळी तत्वाच्या गप्पा मारत असे. अजूनही ते लोकांना संस्कृती वगैरेंवर व्याख्याने देत असतात. अशा स्थितीत न्याय व धर्माचे पालन करण्याची त्यांच्याकडून सर्वाधिक अपेक्षा होती. प्रत्यक्षात काय झाले? सर्व सत्ता आपल्यालाच मिळाली पाहिजे अशी राक्षसी वृत्ती त्याच्यात शिरली. मध्य प्रदेश, गोवा, कर्नाटक अशा राज्यांमध्ये विधानसभांमध्ये काँग्रेसला बहुमत होते. पण त्यांचे आमदार दिवसाढवळ्या फोडण्यात आले. त्यावर वाटेल तसा पैसा खर्च करण्यात आला. इडी वगैरेंची भीती दाखवण्यात आली. महाराष्ट्रात तर कहर करण्यात आला. शिवसेना त्यांच्या सोबत होती. तरीही तिला खलास करण्याचे कारस्थान रचले गेले. राष्ट्रवादीतील अजितदादांना दोनदा गळाला लावण्यात आले. सत्तेसाठी सर्व काही हा भाजपचा एककलमी कार्यक्रम झाला. पूर्वी काँग्रेस या देशात बलाढ्य होती. तिच्या विरोधातील पक्षांची सरकारे अनेक राज्यात सत्तेत येत होती. पण या रीतीने ती उलथवली जात नव्हती. या सर्वभक्षक राक्षसाला रोखण्याची गरज निर्माण झाली. त्यातूनच शिवसेना, काँग्रेस व राष्ट्रवादी हे पक्ष एकत्र आले. त्याला विरोध करण्यासाठी हे पक्ष एकत्र आले. त्यांनी बाजू बदललेली नाही. त्यांचा आग्रह आहे तो तत्वाचा. लोकशाही प्रस्थापित करण्याचा. भाजपने त्यालाच चूड लावण्याचा प्रयत्न केला. अजूनही करीत आहे. त्याला रोखणे हेच अत्यावश्यक बनले आहे.

### शेकाप तत्वावर ठाम

शेतकरी कामगार पक्ष, डावे तसेच समाजवादी यांनीदेखील या बाजूला साथ दिली ती त्याच भूमिकेतून. त्यामुळे कालचे विरोधक आज एकत्र दिसत असले तरी ते लोकशाहीच्या बाजूने कालही होते व आजही आहेत. भाजपने मात्र सत्ता मिळताच आपला खरा चेहरा समोर आणला आहे. शेकाप व डाव्यांचे राजकारण हे कष्टकऱ्यांच्या हिताचे राहिले आहे. भाजपच्या धोरणांना त्यांनी कायमच विरोध केला. विकासाच्या नावाखाली शेतकऱ्यांच्या जमिनी हडपण्याची कारस्थाने असोत की, उद्योगपतींना मोकळे रान देण्याची धोरणे असोत शेकापने याविरुध्द तीव्र आंदोलने केली आहेत. नैनासारखे प्रकल्प असोत की शहापूर-धेरंडमधील तथाकथित विकास यातील जनताद्रोही धोरणांना शेकापने नेहमी विरोध केला आहे. त्यामुळे घाबरलेल्या भाजपने शेकापची ताकदही खच्ची करण्याचा प्रयत्न केला. काही जणांना फोडण्याचे उपद्व्याप केले. या कारस्थानांना व त्यामागच्या राक्षसी सत्तेला भीमटोला देण्याची आज वेळ आली आहे. जनतेलाही हे सर्व असह्य झाले आहे. त्यासाठीच शेकाप आज महाविकास आघाडीमध्ये आहे. येत्या निवडणुकीत त्याचे प्रत्यंतर येणार हे नक्की आहे. भाजपच्या राक्षसी सत्तेला काही जण बळी पडले. तर राष्ट्रवादी काँग्रेसमधील अजितदादा, सुनील तटकरे, छगन भुजबळ ही मंडळी चोरावर मोर होण्याच्या आवेशात तिकडे गेले. प्रत्यक्षात आज त्यांची हालत काय आहे हे जनतेसमोर आहे. अजितदादांना जेमतेम चार जागा पदरात पडल्या आहेत. त्यापैकी माढ्याच्या उमेदवार त्यांच्या स्वतःच्या पक्षातील नाहीत. भुजबळांसमोर नाशिकचे गाजर दाखवून त्यांचा गंडवण्यात आले. त्यामुळे ओबीसी समाजात प्रचंड नाराजी आहे. बारामतीसह सर्वच उमेदवार अडचणीत आहेत. विधानसभेला प्रामाणिकपणे काम करावे लागेल असा इशारा शिंदे गटाचे भरत गोगावले व इतर आमदारांनी तटकरेंना दिला आहे. इतके करूनही हे सर्व जण मनापासून काम करतील की नाही याची खात्री नाही.

### पवारांबद्दल वस्तुस्थिती

दुसरीकडे मनसे संपवण्याचा ज्यांनी प्रयत्न केला त्यांना (म्हणजे तटकरेंना) पाठिंबा कसा देणार असा थेट सवाल वैभव खेडेकर यांनी केला आहे. आता त्यांना समजावण्याचा प्रयत्न होईल. पण खालचे कार्यकर्ते कितपत ऐकतील याबाबत शंकाच आहे. मुद्दा असा की, भाजप आणि त्यांच्या नादाने शिंदे व अजितदादांनी वाटेल तशा उड्या मारल्या म्हणून कार्यकर्ते वाटेल तशी भूमिका फिरवू शकत नाहीत. सामान्य जनता बोलत नसली तरी सर्व काही पाहत असते. आपल्या रीतीने न्याय करीत असते. शेकाप व महाविकास आघाडी याच जनतेचा आवाज म्हणून आज उभे आहेत. सध्या निवडणुकीच्या हंगामात पुन्हा एकवार भाजपच्या गोटातून शरद पवार व उद्धव ठाकरे यांच्यावर टीका सुरू झाली आहे. पवारांना भाजपसोबत यायचे होतेच, अदानीकडे त्याबाबत बैठकाही झाल्या होत्या, पण नंतर त्यांनी पाऊल मागे घेतले असा प्रचार होतो आहे. पवारांनी याचा अनेकवार इन्कार केला आहे. सर्वात महत्वाची गोष्ट अशी की, भाजपसोबत जाणे हे शरद पवारांसाठी अधिक सोपे होते. राज्यात तर त्यांचा पक्ष सत्तेत असताच. केंद्रातही एखादे पद मिळाले असते. मोदींनी त्यांना देशभर मिरवले असते. पण ते गेलेले नाहीत ही वस्तुस्थिती आहे. आज महत्वाचे नेते पक्ष सोडून गेले आहेत आणि इडीच्या चौकशा मागे लागण्याचा धोका आहे अशा स्थितीत ते भक्कमपणे उभे आहेत. रणरणत्या उन्हात प्रकृतीची तमा न बाळगता प्रचार करीत आहेत. याउलट विकासाच्या नावाखाली अजितदादा व त्यांचे सहकारी मोदींच्या ताटाखालचे मांजर होऊन बसले आहेत. विधानसभेला आपले भवितव्य काय राहील या काळजीने त्यांची झोप उडाली आहे. पवारांप्रमाणेच उद्धव यांच्यावरची टीकाही वाढली आहे. त्यांनी भाजपला दगा दिला वगैरे बोलले जात आहे. पण शिवसेनेला खतम करणे हाच भाजपचा अजेंडा होता हे आता पूर्ण स्पष्ट झाले आहे. एकेक जागा सोडवताना शिंदे गटाला किती मुश्किल जाते आहे ते दिसते आहेच. गजानन कीर्तीकर उघड बोलले. बाकीचे ओठ चावताहेत इतकेच.

---

**विचार**

# स्वामीनिष्ठ हनुमान

**हनुमानाने पावलापावलावर श्री रामांची मदत केली आहे. त्याच्या शरीराचा कण नि कण त्याने श्री रामांना अर्पण केलेला आहे. सीतामाईच्या शोधकार्यात हनुमानाची भूमिका महत्त्वाची राहिलेली आहे. रामांचे कार्य करीत असता रामनाम उच्चारल्याशिवाय एकही क्षण त्याने वाया जाऊ दिला नाही. अशी अतुलनीय नामनिष्ठा त्याच्या प्रती होती.**

**राजाराम भगत**



त्रिभुवन वंदनीय, प्रभू रामचंद्रांचे उच्च कोटीचे भक्त, स्वामीनिष्ठ, महावीर हनुमान यांचा जन्म चैत्र पौर्णिमेला सूर्योदयासमयी झाला. भारतीय समाजाच्या मनावर अधिराज्य करणाऱ्या शौर्य, धैर्य, पराक्रम व स्वामीनिष्ठा या अनेक गुणांनी मंतरलेल्या हनुमानाचे जीवन पराक्रम व स्वामीनिष्ठा या प्रधान गुणांनी विकसित झालेले दिसून येते. त्या गुणांबरोबर राजनीतीचे बारकावे जाणणारा हनुमान होय. शंकराचे अकरावे रूप म्हणजे हनुमान होय. हनुमानाला रूद्राचा अवतार मानतात. शक्ती, भक्ती आणि युक्ती यांचा संयोग हनुमानाच्या जीवनात प्रकर्षाने दिसून येतो.

केसरी आणि अंजना यांच्या विवाहानंतर ते दोघे संतान सुखापासून वंचित होते. तेव्हा अंजनी मांग ऋषींजवळ जाऊन तिने आपले दुःख ऋषींना सांगितले. तेव्हा मांग ऋषीने तिला पप्पा सरोवराच्या पूर्वेस नरसिंह आश्रम आहे त्याच्या दक्षिण दिशेला नारायण पर्वतावर स्वामीतीर्थ आहे. तेथे जाऊन स्नान करून १२ वर्षे तपस्या कर. उपवास केल्यानंतर तुला पुत्रप्राप्ती होईल. अंजना, केसरी व ऋषी यांची आज्ञा घेऊन १२ वर्षे केवल वायूवर जीवित राहिली. तेव्हा वायूदेव अंजनीच्या तपस्येने प्रसन्न होऊन तिच्या कानात प्रवेश करून तिला वरदान दिले की तुला सूर्य, अग्नि आणि सुवर्णा समान तेजस्वी जो वेदवेदांत आणि विश्ववंद्य महाबली पुत्र होईल. वायूदेवाच्या कृपेने पुत्र हनुमान झाला म्हणून त्यास पवनपुत्रही म्हटले जाते तसेच मारूतीही.

मारूती लहान असताना, पहाटे उठून बाहेर पाहिले असता त्यास पूर्वेकडे सूर्य लालबुंद रूपात हळूहळू वर येताना त्याने पाहिले त्यास वाटले की ते एक लाल फळ आहे म्हणून ते घेण्यासाठी त्यांनी आकाशात झेप घेतली. सूर्य पुढे हनुमान मागे दोघेही वायूच्या वेगाने पळत होते. तेवढ्यात राहू सूर्याला ग्रामस्थांसाठी येताना हनुमानाने पाहिला त्याला वाटलेच लाल फळ व दुसरे काळे फळ हे दृश्य इंद्रदेवाने पाहिले त्यांना वाटले हा कोण? त्यांनी वज्र त्यावर फेकले, ते वज्र नेम चुकून हनुवटीवर बसला. त्यामुळे हनुवटी चेपली. वायूदेवाने त्यास समजावले आहे ते खाण्याचे फळ नसून सूर्यदेव आहेत. तू त्यांना पकडून खाण्याचा वेडगळ विचार सोडून दे. इंद्रदेवाच्या व्रजावरचा आघात तुझ्या हनुवटीवर झालेला आहे. त्याची आठवण म्हणून लोक तुला 'हनुमान' या नावाने ओळखतील.

हनुमानाची वीर मारूती व दास मारूती अशी दोन रूपे आहेत. राममंदिरात प्रभू रामांच्या पुढे विनम्रतेने हात जोडून उभा असतो. वीर मारूती युद्धाच्या पावित्र्यात असतो. वीर मारूतीची मंदिरे स्वतंत्र असतात. हनुमान भुतांचा स्वामी आहे. भुतेखेते हनुमानाची आज्ञा पाळतात अशी समाजात समजूत आहे. त्यामुळे भूतबाधा झालेल्या व्यक्तीस हनुमान मंदिरात नेतात. त्यामुळे भूतबाधा तात्काळ दूर होते अशी लोकांची धारणा आहे. हनुमानाला शेंदूर नी तेल प्रिय आहे. एक दिवस सीतामाईने स्नानानंतर शेंदूराचा टीळा कपाळी लावला. हनुमानाने ते पाहिले व सीतामाईस उत्सुकतेने त्याचे कारण विचारले असता सीतामाई म्हणाल्या, यामुळे तुझ्या स्वामींचे आयुष्य वाढते. त्या दिवसापासून हनुमानाने आपल्या सर्वांग अंगाला शेंदूर फासला. लक्ष्मणास मूर्च्छा आली तेव्हा दिव्य वनस्पतीसह द्रोणागिरी पर्वत उचलून नेत असता भारताने बाण मारून हनुमानाच्या पायाला जखम केली. ती जखम शेंदूर व तेलाने बरी झाली. म्हणून भक्तगण त्यास शेंदूर व तेल लावतात.

हनुमानाने पावलापावलावर श्री रामांची मदत केली आहे. त्याच्या शरीराचा कण नि कण त्याने श्री रामांना अर्पण केलेला आहे. सीतामाईच्या शोधकार्यात हनुमानाची भूमिका महत्त्वाची राहिलेली आहे. रामांचे कार्य करीत असता रामनाम उच्चारल्याशिवाय एकही क्षण त्याने वाया जाऊ दिला नाही. अशी अतुलनीय नामनिष्ठा त्याच्या प्रती होती. संकटकाळी हनुमानाची सर्वजण प्रार्थना करतात. म्हणून त्यास 'संकटमोचक' हनुमान असे म्हटले आहे. प्रभूरामांच्या ही आगाध विश्वास हनुमानावर होता. त्यांचा हनुमान सर्वात प्रिय भक्त होय. शेंदूर लावण्याचे शास्त्रीय कारण आपण पाहिले तर शेंदूर एक उर्जेचे प्रतिक आहे. हनुमानाचे बल अधिक वाढते. हनुमानाच्या पावलांचा शेंदूर आपल्या कपाळी लावला तर मानसिक शांती मिळते, सकारात्मक विचार येतात. मन शांतीपूर्ण होते.

हनुमान हे रामदासांचे एक मुख्य दैवत आहे. रामराज्याचा महान आदर्श म्हणून रामदासांनी त्याची उपासना सुरू केली. गावोगावी हनुमान मंदिरांची स्थापना केली. जिथे हनुमान मंदिरे आहेत तेथे बलोपासना करण्यासाठी व्यायामशाळा कुस्तीचे आखाडे निर्माण केले. स्वामींनी हनुमान उपासनेच्या प्रचार प्रसाराचे कार्य केले.

संयम, शौर्य, औदार्य हे सारं सारंच कसं अगदी वंदनीय आणि आचरणीय आहे. प्रभू रामचंद्र हे भारतीयांच्या मनामनात आणि कणाकणात विनम्रता, आदर, प्रेम, उत्साह आणि चैतन्य निर्माण करणारे युगपुरूष आहेत. राम ही केवळ व्यक्ती नसून दिव्यशक्ती, विभूती आहे. या शक्तीचे तेज प्रत्येकाच्या मनामनात, कणाकणात रोमांचित झाले आहे. आपली भारतभूमी विभिन्न भाषिक परंतू रामरूपाने एकरूप झाली आहे. हेच पहा महाराष्ट्रीयन माणसाचे नाव रामचंद्र, रामदास असते तर पंजाबात रामसिंग, उत्तरप्रदेशात रामलखन, रामभूषण तर तामिळनाडूत रामण्णा दैनंदिन दिवस सुद्धा राम-राम म्हणून सुरू होतो. स्मशानभूमीत शव नेत असता 'रामनाम सत्य है' असे म्हणत अंत्ययात्रा जाते. एवढे रामनाम आमच्या कणाकणात रूजले आहे.

माता, पिता, बंधू, सेवक, प्रजा या सर्वांविषयी रामाने मर्यादा पाळल्या. आपली सर्व कर्तव्ये पार पाडली. पित्याने दिलेल्या वचनासाठी राज्यत्याग करून चौदा वर्षे खडतर वनवास भोगला. अनेक अडीअडचणींना व संकटांना मौठ्या धैर्याने तोंड दिले. म्हणूनच राम हे आदर्श पूत्र झाले. राम हे आदर्श पतीही होते. सीतेवर त्यांचे नितांत प्रेम होते. वनवासात ते तिची सर्व प्रकारे काळजी घेत असत. वनवासात असताना सीता वियोगाने त्यांची किती दयनीय अवस्था झाली होती. झाडेवेलींना कवटाळून माझी सीता पाहिलीत का? असे काकुळतीने विचारत होते. देहभान विसरून ते सीतेचा शोध घेत राहिले. हा प्रसंग त्यांच्या सीतेवरील प्रेमाची साक्ष देते. श्री रामाने प्रजेवर आणि प्रजेने रामावर केलेले प्रेम अद्वितीय असे होते. प्रजेसाठी कोणत्याही त्याग करावयास श्रीराम कचरले नाहीत. प्रजेच्या कल्याणासाठी वेळ आली तर मी माझा बंधू, पत्नी आणि स्वतःच्या प्राणाचाही त्याग करीत असे त्यांचे वचन होते. प्रजेच्या मनात सीतेच्या चारित्र्याबद्दल किंतू उत्पन्न झालेला आहे हे समजताच क्षणाचाही विलंब न लावता आपल्या प्राणप्रिय पत्नीचा त्यांनी त्याग केला. यावरून प्रजावात्सल्य हनुमानासारखी स्वामीनिष्ठा व राजनिष्ठा असणारी व्यक्ती रामायण महाभारत काळात अपवादानेच आढळते. प्रभू रामचंद्रांनी त्यांना देवतांनी दिलेला अद्भूत दिव्य हार हनुमानास दिला. तेव्हा त्यांनी त्यातील प्रत्येक दिव्यमणी फोडत असता कोणीतरी विचारले हे तू काय करतो आहेस तेव्हा हनुमान म्हणाला, मी माझे स्वामी राम आणि सीता दिसतो काय हे पाहत आहे. तेव्हा एकाने विचारले, अरे तुझ्यात तरी आहेत काय? तेव्हा स्वामी निष्ठेपायी हनुमानाने आपली छाती फोडून प्रभू राम व सीता यांचे दर्शन घडविले. हनुमानाच्या हृदयात अपार करूणा होती. असाच एक प्रसंग. पर्वतामधील दगडामध्ये हनुमानाने आपल्या नखाने 'रामायण' लिहिले. हे वाल्मिकींना समजले. त्यांनी हनुमानाकडे रामायण पाहण्याचा आग्रह धरला. तेव्हा हनुमान वाल्मिकींना घेऊन पर्वतावर आले. वाल्मिकी ऋषींनी दगडात लिहिलेले रामायण वाचले. ते खुष झाले. परंतु त्यांच्या डोळ्यांतून अश्रू वाहू लागले. हनुमानाने त्यांना विचारले की, ऋषीवर आपणास रामायण आवडले नाही का? तेव्हा वाल्मिकी म्हणाले हेच खुप आवडते फारच सुंदर लिहिले आहेत. परंतु मला चिंता वाटते की, हे मी लिहिलेले रामायण कोण वाचील? मला लौकिक कसा मिळेल. तेव्हा हनुमानाने विचार केला की माझ्यामुळे जर एखाद्याच्या डोळ्यात अश्रू येत असतील तर मीच काय तो विचार करावयास हवा. हनुमानाने दगडावर लिहिलेले सर्व दगड काढून समुद्रात बुडविले व ऋषीवरांना म्हणाला, ऋषीवर तुम्हाला चिंता करण्याचे कारण नाही. आता तुमचाच नावलौकिक होईल. तुम्ही लिहिलेले रामायण वाचले जाईल. यश हे सर्वांना मिळाले पाहिजे असे तत्व हनुमानाने होते. करूणेचे सागर हनुमान होते.

हनुमानाचा आदर्श डोळ्यासमोर ठेवला पाहिजे. रामाची आज्ञा पालन म्हणून भव्य सागरही उल्लंघन करून लंकेस गेला. कर्तव्य निष्ठेचे पालन करणे. आपले जीवन थोर ध्येयासाठी वेचणे म्हणजे मारूतीची उपासना होय.

---

**आजकाल**

# नितीशकुमारांचे राजकारण संपणार

लोकसभा निवडणुकीच्या दृष्टीने एक महत्त्वाचे राज्य म्हणजे बिहार होय. लोकसभेचे ४० मतदारसंघ असलेल्या बिहारचे राजकारण हा नेहमीच चर्चेचा विषय राहिलेला आहे. यंदाच्या निवडणुकीमध्येही अनेकांचे बिहारकडे लक्ष आहे. याचे कारण असे आहे की, यावेळी कोणत्याही एका पक्षाच्या बाजूने बिहारची राजकीय हवा वाहताना दिसत नाही. त्यामुळे या निवडणुकीत ४० पैकी सर्वाधिक जागा कुणाला मिळतील आणि त्या किती मिळतील याचा अंदाज बांधणे कठीण आहे. केंद्रात सत्ता येण्यासाठी उत्तर प्रदेश आणि महाराष्ट्र अशा मोठ्या राज्यांनंतर बिहारमधून सर्वाधिक खासदार निवडून येणे गरजेचे ठरते. उत्तर भारतातील राजकारणामध्ये वरचष्मा टिकवून ठेवण्यासाठीही केंद्रातील सत्तेची ती गरज ठरते.

काही जणांना असे वाटते की, स्थानिक पातळीवरची जातीची गणिते मांडून एनडीएला अधिक जागा मिळतील; तर काही ठिकाणी त्यांना टक्कर द्यावी लागेल. दुसरीकडे, काही जणांना असे वाटते की, यंदा नितीश आणि भाजपा दोघेही बिहारच्या राजकारणामध्ये अस्ताला जातील. किमान नितीश कुमार यांच्याबाबत तरी ही भावना सार्वत्रिक झालेली पाहायला मिळते आहे.

एका व्यक्तीबाबत बिहारच्या जनतेच्या मनात कसल्याही प्रकारची द्विधा मनस्थिती नाही आणि ती व्यक्ती म्हणजे नितीश कुमार! नितीश कुमार यांच्या राजकीय कारकिर्दीला उतरती कळा लागल्याचे सगळेच मान्य करताना दिसतात. एकेकाळी 'सुशासन बाबू' म्हणून प्रसिद्ध असलेल्या नितीश कुमार यांची सगळी राजकीय नैतिकता संपुष्टात आल्याची भावना सार्वत्रिक आहे. नितीश कुमार कुर्मी समाजाचे प्रतिनिधित्व करतात. बिहारच्या एकूण लोकसंख्येच्या फक्त तीन टक्के हा समाज आहे. तरीही जवळपास दोन दशके नितीश कुमार सत्तेमध्ये टिकून राहिले आहेत. मात्र, सत्तेतून पायउतार होण्यापासून स्वतःचा बचाव करताना त्यांना आपली राजकीय विचारधारा सतत गुंडाळून ठेवावी लागली आहे. म्हणूनच आता त्यांच्या राजकीय अस्ताचा हा काळ असल्याचे मानले जात आहे. एनडीए आणि इंडिया अशा दोन्ही आघाड्यांमधील कार्यकर्त्यांमध्ये याबाबत एकमत आहे. नितीश कुमार यांनी पुन्हा एकदा राजकीय भूमिका बदलत एनडीएसोबत जाणे पसंत केल्याने यादव समाज त्यांच्यावर नाराज आहे. त्यासोबतच खुद्द एनडीएचे समर्थकही त्यांची खिल्ली उडविताना दिसतात. नितीश कुमार 'पलटूराम' असल्याचे ते विनोदाने म्हणतात. त्यांच्या सध्याच्या राजकारणाबाबत बोलताना एका स्थानिक चहावाल्याने म्हटले, ''सुशासन बाबू सुशासनातच मिसळून गेले आहेत. ते पलटूबाबा आहेत.'' बिहारमधील कुशवाह जातीचे लोक त्यांच्यावर अधिक चिडलेले आहेत. नितीश कुमार हे बिहारवर लागलेला कलंक आहेत. त्यांना कसलीही विचारधारा नाही, असे त्यांचे मत आहे. मात्र, बिहारमध्ये काहीच कृष्णधवल स्वरूपात पाहता येत नाही. त्यामुळे निवडणुकीचे निकाल नक्की काय असतील, हे सांगणे कठीण आहे. नितीश कुमार यांच्याबाबत बोलताना एका स्थानिक कार्यकर्त्याने म्हटले, ''नितीश कुमारांची कारकीर्द लयाला गेली आहे हे खरे आहे. मात्र, त्यांचा राजकीय प्रभाव नष्ट व्हायला वेळ लागेल. त्यांनी पुन्हा बाजू बदलल्यामुळे त्यांच्या 'सुशासन बाबू' या प्रतिमेला तडा गेला आहे. मात्र, तरीही कुर्मी समाजाचे लोक त्यांचे समर्थक आहेत. तसेच दारूबंदी केल्यामुळे आणि मुलींना शाळेला जायला सायकल दिल्यामुळे बिहारमधील महिलांची मते नितीश कुमारांच्या बाजूने असू शकतात. नाही तर नितीश कुमार यांना आपल्या बाजूने घेण्याची मोदींना काय गरज आहे? तशीही प्रत्येक निवडणुकीत नितीश कुमार यांची मतांची टक्केवारी कमी होत चालली आहे, परंतु, तरीही त्यांना अंदाजे १४ टक्के मते मिळतात. ही मते दोन्ही आघाडींच्या जय-पराजयासाठी पुरेशी आहेत. त्यामुळेच नितीश कुमार आमच्या बाजूने असणे कधीही फायद्याचेच आहे.''

दुसऱ्या एका कार्यकर्त्याने सांगितले, ''आता राज्यात संयुक्त जनता दलाचे राजकारण संपुष्टात आले आहे. आता भाजपा आणि राजद हे दोनच पक्ष बिहारच्या राजकारणात मुख्य असतील.'' बिहारच्या निवडणुकीमध्ये नितीश-तेजस्वी यांच्यासोबतच लोकांच्या तोंडी नरेंद्र मोदींचे नाव अधिक आहे. बिहारमधील काही उच्च जातींचे मतदार कोणत्याही अटीशिवाय त्यांना समर्थन देतात; तर दुसरीकडे वंचित जातींतील लोक सरकारी योजनांचे 'लाभार्थी' असल्याने समर्थन देताना दिसतात. मुझफ्फरपूरजवळील भिकनपूर गावातील राम स्वरूप सहानी म्हणतात, ''जो आम्हाला पाच किलो धान्य मोफत देतो आहे त्यालाच आम्ही मत देणार ना; अन्यथा कुणाला देणार?''

बिहारच्या या निवडणुकीमध्ये 'मोदी फॅक्टर' आजही लागू आहे का, यावर मत-मतांतरे आहेत. पंतप्रधान मोदींच्या राजकारणाला विरोध करणारे जितके आहेत, तितकेच त्यांचे हिरिरीने समर्थन करणारेही आहेत. त्यांचे समर्थक 'मोदी नाही, तर मग कोण?' असा सवाल करताना दिसतात. गेल्या निवडणुकीमध्ये ४० पैकी ३९ जागांवर एनडीएला बहुमत मिळाले होते; मात्र यंदा ती आकडेवारी घसरेल, असे तेही मान्य करताना दिसतात. आणखी एका गोष्टीवर अगदी विरोधकांचेही एकमत असलेले दिसून येते आहे. राष्ट्रीय जनता दलाचे नेते तेजस्वी यादव यांचे राजकारणातील भवितव्य उज्ज्वल आहे, असे त्यांचे मत आहे. लालू प्रसाद यादव यांच्यानंतर राष्ट्रीय जनता दलाची धुरा समर्थपणे आपल्या खांद्यावर घेण्यात तेजस्वी यशस्वी ठरले असल्याचे अनेकांचे मत आहे.

याबाबत बोलताना मुझफ्फरपूरमधील एका स्थानिक रहिवाशाने सांगितले, ''मी मोदींचा समर्थक आहे आणि तेच पुन्हा पंतप्रधान होतील. मात्र, लालू प्रसाद यादव तुरुंगात असताना वा आजारी असताना आपल्या पक्षाला जिवंत ठेवण्यासाठी तेजस्वी यादव यांनीच जिवाचे रान केले आहे. ते या निवडणुकीमध्ये आघाडीवर लढत आहेत. एक ना एक दिवस ते नक्की बिहारचे मुख्यमंत्री होतील.''

लोक जनशक्ती पार्टी (लोजपा) हा स्थानिक पक्षही भाजपासोबत आहे. समस्तीपूरमध्ये लोजपाच्या एका समर्थकानेही, ''तेजस्वी यादव राजयोगासाठी जन्माला आले आहेत. लालू यादव तुरुंगात असताना वा आजारी असताना ते राज्यभर फिरत राहिले. त्यामुळे ते राजकारणात नक्की पुढे जातील'', असे सांगितले. लालू प्रसाद यादव यांचे उत्तराधिकारी म्हणून बिहारमधील यादव समाजाचे लोक तेजस्वी यादव यांना पाठिंबा देत आहेत. इतर काही जण तेजस्वी यादव यांचे कर्तृत्व मान्य करतात. मात्र, पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वाखालील एनडीएचेच बिहारमध्ये वर्चस्व राहील, असेही ते सांगताना दिसतात. नरेंद्र मोदी पुन्हा एकदा बहुमताने पंतप्रधान होतील, असा विश्वास त्यांना वाटतो.

---

## मराठी साहित्यिक दिनविशेष

### तेवीस एप्रिल

**१८५८:-** 'स्त्रीधर्मनीती' हे पुस्तक वयाच्या अवघ्या २४व्या वर्षी लिहून स्त्रीदास्यवादी धर्मकल्पनांचा समाचार घेणाऱ्या पंडिता रमाबाई यांचा जन्म. त्या मुळच्या रमा अनंतशास्त्री डोंगरे. कोलकात्यात 'पंडिता' व 'सरस्वती' ठरल्यावर विनोदबिहारी मेधावीशी आंतरजातीय विवाह, पतीचे अल्पकाळात निधन अशा घटनांनंतर त्यांनी ब्रिटनला प्रयाण केले. तेथे बायबलसह अन्य धर्मशास्त्रे त्या शिकल्या आणि पुढे ख्रिस्ती धर्म स्वीकारुनही 'बिशप वा अन्य धर्मगुरुंचे सल्ले मी मानणार नाही' असे म्हणण्याची हिंमत दाखवून त्यांनी मुक्तीचा मार्ग कायम ठेवला. त्यांनी अन्य पाचही मराठी पुस्तके ख्रिस्ती धर्मविषयक आ-हेत, त्यात बायबलच्या मूळ हिंब्रू व ग्रीकमधून मराठीत केलेल्या भाषांतराचा समावेश आहे. **१८५८:-** रामदासी संप्रदाय व साहित्य यांचे लेखक, संशोधक, प्रकाशक, राजकीय व सामाजिक कार्यकर्ते असण-ारे शंकर श्रीकृष्ण देव यांचे निधन. महाविद्यालयात असताना रामदासांच्या शिकवणीने प्रभावित झालेल्या देवांनी रामदासांची काव्ये, कागदपत्रे, चरित्र, त्यांचे लेखन आदींचा शोध घेऊन त्यावर संशोधन करुन ते प्रकाशित करण्यासाठी धुळयात 'सत्कार्योत्तेजक सभा' या संस्थेची स्थापना केली. या संस्थेद्वारे रामदास आणि रामदासी नावाची संतमाला आणि मासिक सुरु केले. तसेच 'इतिहास आणि ऐतिहासिक' हे मासिक सुरु केले. याशिवाय त्यांनी लिहिलेले तीन खंडाचे 'श्रीसमर्थ चरित्र' (श्रीसमर्थावतार, श्रीसमर्थहृदय, श्रीसमर्थ संप्रदाय) प्रसिध्द आहे. **१८७३:-** अस्पृश्यता उद्धारक, 'डिप्रेस्ट कलास मिशन'चे संस्थापक आणि निरनिराळ्या धर्मातील तत्वांचे अभ्यासक महर्षी विठ्ठल रामजी शिंदे याचा जन्म. ऑक्सफर्ड येथील मॅचेस्टर कॉलेजातून तुलनात्मक धर्मशास्त्राचा अभ्यास करणाऱ्या महर्षींनी हॉलंड येथे लिबरल रिलिजन इंडिया या निबंधाचे वाचन केले. त्यांचे लेख, व्याख्याने, उपदेश, आठवणी पुस्तक रुपात प्रसिध्द. **१८९३:-** लेखक, कवी दात्रेय बापूजी पद्माकर यांचा जन्म. मासिक, मनोरंजन, विविध ज्ञानविस्तार, राजहंस, काव्यरत्नावली इत्यादी नियतकालिकांतून त्यांचे लेखन प्रसिध्द. त्यांच्या स्फुट कवितांचा संग्रह प्रफुल्ल पद्माकर या नावाने प्रसिध्द. सृष्टी, प्रीती कवी व काव्य आणि ईश्वर हे त्यांच्या कवितेचे विषय. **१९०८:-** 'राष्ट्रसंदेश'या वर्तमानपत्राचे संस्थापक, देशबंधूचे संपादक कादंबरीकार, नाटककार विनायक रामचंद्र हंबर्डे यांचा जन्म. ८ कादंबऱ्या आणि २७ नाटके त्यांच्या नावावर आहेत. **१९१३:-** डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि स्वा. विनायक दामोदर सावरकर यांचे साधार, साकल्याने तयार केलेले चरित्रग्रंथ इंग्रजीत लिहिणारे थोर चरित्रकार धनंजय कीर यांचा जन्म. मुंबई महापालिकेच्या शिक्षण खात्यातील नोकरी सांभाळून त्यांनी चरित्रसंशोधनाचे मोठे काम केले. पुढे सर्व वेळ याच कामासाठी देऊन एकंदर १२ थोरांची विश्वासार्ह चरित्रे लिहिली. 'कृतज्ञ मी, कृतार्थ मी' हे आत्मचरित्रही कीर यांनी लिहिले. **१९४३:-** लेखक, बालसाहित्यिक अरविंद गोपाळ पाटोळे यांचा जन्म. 'निखळलेली तारका' ही कादंबरी, 'पांढरे गुलाब' हा बालकथासंग्रह, 'साद' या प्रातिनिधिक काव्यसंग्रहासह काही कथासंग्रह आणि 'पावा' या साहित्य मंडळाचे ते संस्थापक. **१९४७:-** कवी पांडुरंग बिसन नंदागवळी यांचा जन्म. 'झाडीची झेप' हा काव्यसंग्रह त्यांचा प्रकाशित झाला आहे. **१९५४:-** कवी धनंजय सालंकर यांचा जन्म. 'उजेडाचे गाव', 'तीन पानाचा पळस', 'पदर आदी काव्यसंग्रह प्रसिध्द. **१९५८ :** रामदासी संप्रदाय साहित्यक, संशोधक, सकीय व सामाजिक कार्यकर्ते असण-ारे शंकर श्रीकृष्णदेव सीता बी.ए.एल.एल.बी पदवी संपादन प्रारंभ केला. टिळक आणि महात्मा प्रभाव असणाऱ्या देवांनी राजकीय चळवळीतही सहभाग घेतला पालिकेत सदस्य, मुंबई कायदे सदस्य या नात्याने कामे केली. तथापि, त्यांचे सर्वात मोठे कार्य म् रामांचे साहित्य सर्वसामान्यपर्यंत पोहोचवण्याचे काम त्यांनी केले महाविद्यालयात असताना रामदासांच्या शिकवणीने प्रभावित रामदासांची चरित्र, त्यांचे लेखन आदी संशोधन से प्रकाशित करण्यासाठी सभा या संस्थेची स्थापना केली. या संस्थेद्वारे रामदास अिा आणि मासिक सुरू केले. समर्थ वाग्देवता मंदिराची हस्तलिखित, ऐतिहासिक कागदपत्रे अभ्यासकांन दिले. तसेच मइतिहास आणि ऐतिहासिकफ हे मासिक सुरू केले यानि तत्कालिन उपलब्ध झालेल्या ऐतिहासिक कागद इतिहासविषयक संशोधन लेखनास प्रसिद्धी दिली जात असे. तीन खंडाचे श्रीसमर्थ चरित्र, श्री समर्थावतार, श्रीमद, श्रीसमर्थ संप्रदाय प्रसिद्ध आहे. तसेच समयांच्या जांब गावी म मंदिर त्यांनी उभारले असे हे मोर निष्ठावान समर्थ भक्त राजकीय-सामाजिक कार्यकर्त रामदासी संप्रदाय आणि साहित्य याचे अभ्यासक शंकर श्रीकृष्णदेव यांना २३ एप्रिल १९५८ यांनी देव-ाज्ञा झाली. **१९७३:-** लेखिका प्रज्ञा करडखेडकर यांचा जन्म. भारतीय शास्त्रीय संगीताच्या जाणकार असणाऱ्या प्रज्ञा करडखेडकर यांचा 'सानुकल्या' हा काव्यसंग्रह प्रसिध्द. 'ग्रीक लोककथा', 'म्हणीच्या लोककथा' ह्या कथासंग्रहासह 'राग अनुराग' हे संगीतावरील ललित स्वरुपाचे पुस्तके त्यांचे प्रसिध्द झाले आहे. **१९७९:-** बेळगाव तरुण भारतचे संपादक बाबुराव ठाकूर यांचे निधन. **१९८६:-** कवी रामरतन गोपाळा चांदेवार यांचा जन्म. त्यांचा 'पुढाऱ्यांचा पुढारी-नितिन गडकरी' हा काव्यग्रंथ प्रकाशित झाला आहे. **२००१:-** पत्रकार, केसरीचे संपादक, महाराष्ट्र विधिमंडळाचे अध्यक्ष आणि लो. टिळकांचे नातू जयंतराव श्रीधर टिळक यांचे निधन.

**संजय वझरेकर**
९९७५५७६६७५

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे



२३ एप्रिल
१) श्रीम. अनुप्रिता अनंत खैरे
अलिबाग, २३-४-१९५३
२) श्री. प्रमोद दत्तात्रेय पाथरे
कुरूळ, अलिबाग, २३-४-१९५४

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)**
**९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**



**कै. विनोदकुमार वल्लभदास जागाणी, स्मरणार्थ अलिबाग**

## उष्म्यामुळे शेतीची कामं खोळंबळी

**सुतारवाडी :** यावर्षी मार्च महिन्यापासून प्रचंड उन्हाळा जाणवत आहे. या उष्म्यामुळे नागरिकांना महत्त्वाच्या कामासाठी तसेच बळीराजाला आपल्या शेतीची मशागत करायला खोळंबा होत आहे. वाळंजवाडी, पहुर, ढोकलेवाडी, गौळवाडी, सुतारवाडी, पाथरशेत, जामगाव तसेच अन्य वरकस भागांतील शेती ही पावसाच्या पाण्यावर अवलंबून आहे. येथील शेतीच्या मशागतीची कामं एप्रिल महिन्यापासून शेतकरी वर्ग सुरू करतो. मात्र, यावर्षी प्रचंड प्रमाणावर उन्हाळा जाणवत असल्यामुळे बळीराजाला रखरखत्या उन्हात काम करणं अशक्य होत आहे.

# जलजीवन योजनेचे तीनतेरा

## पाण्याच्या टाकीचे बांधकाम निकृष्ट; ग्रामस्थांचा आरोप

**। नेरळ । वार्ताहर ।**

जलजीवन मिशन ही योजना नागरिकांना सुखावह वाटण्यापेक्षा त्रासदायक ठरत आहे. तर दुसरीकडे कर्जत तालुक्यातील डामसेवाडीमध्ये ही योजना ग्रामस्थांसाठी भीतीदायक ठरत आहे. या योजनेच्या अंतर्गत वाडीत बांधण्यात आलेल्या जल साठवण टाकीचे काम निकृष्ट झाल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. तसेच ती टाकी पडली तर मोठी दुर्घटना घडेल, अशी भीती ग्रामस्थ व्यक्त करत आहेत. तर या योजनेचादेखील बोऱ्या वाजल्याने वाडीतील ग्रामस्थांना एकत्र पाण्यासाठी पायपीट किंवा बाजूच्या विहिरीतील हिरवे पाणी पिण्याची वेळ आली आहे. त्यामुळे या योजनेची वरिष्ठ पातळीवरून चौकशी व्हावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

केंद्र शासनाची महत्त्वाकांक्षी असलेली हर घर नल से जल ही योजना महाराष्ट्रात जलजीवन मिशन म्हणून ओळखली जाते. मात्र, मोठा गाजावाजा असलेल्या या योजनेचा बोजवारा कर्जत तालुक्यात उडाला असल्याचे चित्र आहे. त्यामुळे तालुक्यातील ग्रामीण भाग पुन्हा टँकरवर आला आहे. २०२१ मध्ये सुरु झालेल्या जलजीवन मिशनच्या कामानंतर तालुका टँकरमुक्त होईल अशी असलेली आशा फोल ठरत आहे.



कारण, जलजीवन मिशनच्या माध्यमातून पूर्ण झालेल्या योजना भर उन्हाळ्यात आटल्या आहेत. तेव्हा या योजना कोणासाठी, असा प्रश्न निर्माण झाला आहे. तर कर्जत तालुक्यात दुर्गम भाग असलेल्या नांदगाव ग्रामपंचायत हद्दीतील डामसेवाडी येथे सुमारे ७२ लाख रुपये खर्चून शासनाने जलजीवन मिशन योजना राबवली. एप्रिल २०२२ मध्ये कार्यारंभ आदेश मिळाले असताना दोन वर्षांत ही योजना ठेकेदाराला पूर्ण करता आलेली नाही. तर योजना राबवताना त्याचे पाईप अनेक ठिकाणी खोलवर न टाकता वरच्यावर टाकण्यात आले आहेत. तर टाकीचे काम करताना पाण्याचा वापर नगण्य असल्याने हे काम निकृष्ट झाले असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. तर नव्या उद्भव विहिरीचा पत्ताच नाही. अशात वाडीत पाणीबाणी उद्भवली असल्याने महिलांना पाण्यासाठी वणवण करावी लागते. तर काही अंतरावर असलेल्या विहिरीत असलेले हिरवे दूषित पाण्यावर गुजराण करावी लागते, त्यामुळे आमचा अंत किती दिवस पाहणार, असा जळजळीत सवाल ग्रामस्थ करीत आहेत. तर पुढील तीन दिवसांत जर ग्रामस्थांना पाणी मिळालं नाही, तर योजना गुंडाळून घेऊन जा, असा आक्रमक पवित्रा ग्रामस्थांनी घेतला आहे.

दरम्यान, तालुक्यात काही अपवाद सोडले तर जलजीवन मिशनच्या कामात अनेक त्रुटी असल्याने योजना अडचणीत सापडल्या आहेत. तर, तालुक्यात पुन्हा एकदा १८ गावं आणि ६० वाड्यांमध्ये पाणीटंचाई कृती आराखडा तयार करण्यात आला आहे. त्यामुळे या योजना ग्रामस्थांसाठी की ठेकेदारासाठी असा प्रश्न निर्माण झाला असून, या योजनांचा पाझर फुटणार तरी केव्हा याकडे ग्रामस्थ डोळे लावून बसले आहेत.

> **डामसेवाडी येथे जल साठवण टाकीचे काम करताना पाण्याचा वापर ठेकेदाराने खूप कमी केल्याने या टाकीचे सिमेंट निघत आहे. तर उद्या यामुळे एखादी दुर्घटना घडू शकते. तेव्हा ही टाकी आहे का मृत्यूचा सापळा असा प्रश्न आम्हाला ग्रामस्थांना पडला आहे. ही टाकी नव्याने बांधावी आणि आमची योजना सुरळीत व लवकर सुरु करावी अन्यथा या टाकीसकट ही पाईपलाईन अधिकाऱ्यांनी त्यांच्याकडे घेऊन जावी, बिल काढण्यासाठी नुसते फोटो काढायला येऊ नये.**
> **- देविदास केवारी, ग्रामस्थ, डामसेवाडी**

> **महिलांना पाण्यासाठी खूप त्रास होतो आहे. लांब जाऊन पाणी आणावं लागतं किंवा गावाच्या काही अंतरावर असलेल्या एका खासगी विहिरीतून पाणी आणावं लागतं. मात्र, ते पाणी हिरवं आहे. या पाण्याने काही आजार झाला तर त्याला जबाबदार कोण?**
> **- शेवंता केवारी, ग्रामस्थ**

# रेल्वे पूल सहा महिन्यांपासून बंद

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

पनवेल, मुंबई, नवी मुंबई व ठाण्यासह इतर मार्गांकडे जाणारा आणि उरण पूर्व विभागाला जोडणाऱ्या गव्हाण फाटा-चिरनेर मार्गावरील रेल्वे पूल मार्ग मागील सहा महिन्यांपासून नव्याने बांधण्यासाठी मार्ग बंद करण्यात आल्याने उरणच्या पूर्व विभागातील दैनंदिन प्रवासी वाहतुकीसह सर्वच वाहनांची गैरसोय होत आहे. त्यामुळे प्रवासी आणि वाहन चालकांमध्ये संताप व्यक्त करण्यात येत आहे.

गव्हाण फाटा महामार्ग सर्कलवर वाहतूक कोंडीची समस्या संपुष्टात आणण्यासाठी एनएचआयने उरण, जेएनपीए, पनवेल व नवी मुंबईकडे जाण्याचे मार्ग सुरळीत करण्यासाठी कोट्यवधींचा निधी खर्च करून सुयोग्य असे मार्गिक उड्डाण पूल उभारले आहेत. त्यामुळे हे महामार्ग मागील एक-दीड वर्षांपासून अत्यंत सुरळीतपणे सुरु झाले आहेत.

मात्र, नवी मुंबई व पनवेलसह अन्य



मार्गांवरून उरण तालुक्यातील पूर्व विभागात मार्गक्रमण करण्यासाठी गव्हाण फाटा-चिरनेर मार्गांवरील रेल्वे पुलाच्या अडथळ्यामुळे उरण तालुक्यातील जांभुळपाडा, वेश्वी, दिघोडे या गावाची एसटी बससेवा बंद झाली आहे. त्याचप्रमाणे उरण तालुक्यातील जासई, चिरनेर व आवरे जिल्हा परिषद मतदारसंघासह पनवेल तालुक्यातील केळवणे विभागातील प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांना गव्हाण फाटा सर्कलवरून सुमारे दीड किलोमीटरचा वळसा घालून प्रवास करावा लागत आहे.

तर चिरनेर मार्गांवरून येणाऱ्या वाहनांना पनवेलकडून येणाऱ्या महामार्गाच्या उलट्या धोकादायक मार्गातून वळसा घेऊन गव्हाणफाटा मार्ग गाठावा लागत आहे. त्यामुळे या मार्गांवर अपघाताचे प्रमाण अधिक असल्याने प्रवासी रिक्षा, मॅजिक रिक्षा आणि अन्य वाहनांना धोका निर्माण होत आहे. त्याचप्रमाणे शहराच्या बाजापेठेसाठी व अन्य विविध कामांसाठी पनवेल, नवी मुंबई मार्गाकडे जाण्यासाठी गैरसोय होत असल्याने प्रवासी आणि वाहनचालकांमध्ये मोठ्या प्रमाणात संताप व्यक्त करण्यात येत आहे.

> **गव्हाण फाटा-चिरनेर महामार्ग सार्वजनिक बांधकाम उपविभाग उरणच्या अखत्यारित आहे. या मार्गावरील प्रवासी आणि वाहनचालकांची सध्या गैरसोय होत आहे. मात्र, गव्हाण फाटा-चिरनेर मार्गाला जोडणाऱ्या पुलाचे काम मध्य रेल्वेकडे आहे. त्यांनी या रेल्वे पुलाचे काम पावसाआधी पूर्ण केल्यास या मार्गावरील प्रवाशांचा मार्ग मोकळा होईल.**
> **- नरेश पवार, उपविभागीय अधिकारी, सार्वजनिक बांधकाम उपविभाग-उरण**

## रेवदंड्यात पेट्रोल चोरट्यांचा हैदोस

**रेवदंडा :** शहरात ठिकठिकाणी आळी-आळीत, भरवस्तीत घराच्या बाहेर लावलेल्या मोटारसायकलमधून पेट्रोल चोरी होत आहे. दिवसेंदिवस पेट्रोल चोरीचे प्रकार वाढत जात असल्याने रेवदंडा ग्रामस्थ चिंताग्रस्त झाले आहे.

घराबाहेर उभ्या असलेल्या मोटारसायकलमधून बिनधोकपणे रात्रीच्या सुमारास पेट्रोल काढले जाते. अनेक रेवदंडकर ग्रामस्थांची मोटारसायकलमधून पेट्रोल चोरीस जात असल्याची तक्रार आहे. रात्रीच्या सुमारास बाहेर ठेवलेल्या मोटारसायकलमधून पेट्रोल चोरी होत असल्याने अनेकांनी लॉक बसवून घेतले; परंतु लॉक तोडून तसेच टाकी उघडून पेट्रोल चोरी अज्ञात चोरटे करत असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

# अवैध धंद्यांना ऊत

**। रेवदंडा । वार्ताहर ।**

रेवदंडा पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध धंद्यांना ऊत आला असल्याने स्थानिक महिलांमधून तीव्र संताप व्यक्त केला आहे. दरम्यान, बेकायदेशीर मटका खुलेआम सुरू असनू, गुटखा विक्रीसुद्धा बिनधास्त असल्याचे स्पष्ट चित्र आहे.

रेवदंडा व परिसरात बेकायदेशीर मटका सुरू असून, भ्रमणध्वनीच्या माध्यमातून भररस्त्यात मटका एजंट व्यवसाय साधून आडमार्गाला उभे राहून घेतलेल्या मटक्याचे आकडे भ्रमणध्वनीद्वारेच मटका मालकांना पाठवित आहेत. एकदंरीत, भ्रमणध्वनीने मटका व्यवसायपूर्वीपेक्षा तेजीत आला असून, खुलेआमपणे रस्त्यात उभे राहून एजंट मटका व्यवसाय चालवीत आहेत, असे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. मटका खेळून झटपट श्रीमंत होण्याच्या नादाने अनेक युवावर्ग वाममार्गाला लागले असल्याचे चित्र आहे. महिना व दिवसभरातील आर्थिक उत्पन्नाचा भाग मटका खेळून घालवीत असल्याने महिलावर्ग संप्तत प्रतिक्रिया व्यक्त करत आहेत. सदर मटका व्यवसाय पूर्णतः बंद करावेत, अशी मागणी सर्व स्तरातून होत आहे.

### मटका खुलेआम, तर गुटखा विक्रीसुद्धा बिनधास्त

गुटखा विक्रीस पूर्णतः बंदी असतानासुद्धा रेवदंडा व परिसरात बेकायदेशीपणे गुटखा विक्री केली जात आहे. गुटखाच्या मागणीसाठी गुटखा खाणारे गुटखा विक्रेत्याच्या घरी सुध्दा रात्रीचे समयी खरेदी करत असतात. रेवदंडा व परिसरात खुलेआम मटका तसेच सर्रास गुटखा विक्री बिनधास्त सुरू आहे, अशी माहिती स्थाकि महिलांनी दिली. दरम्यान, या बेकायदेशीर धंद्यांवर पोलिसांचा वचक केव्हा बसेल, असा प्रश्न महिला उपस्थित करत आहेत.


### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहिर नोटिसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे भायमळा, ता.अलिबाग, जि.रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकत व त्या मिळकतीचे मालक / कब्जेदाराकडून आमचे अशिल कायम स्वरूपी खरेदी करण्याच्या विचारात आहे. तशा प्रकारची बोलणी विदयमान मालकांबरोबर चालू आहेत. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग क्र. | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रू. पैसे.) |
|---|---|---|---|
| भायमळा, ता. अलिबाग | ७१ | क्षेत्र ०-९९-७० पो. ख. ०-१५-७० एकूण १-१५-४० | १७.५७ |

टिप : वरील मिळकतीपैकी शुभांगी नरेश पाटील, वैभव नरेश पाटील, सुयोग नरेश पाटील, संजना संजय गुरव यांच्या मालकीचे क्षेत्र ०-४५-०० हे. आर. एवढे क्षेत्र हे या जाहीर नोटीसीचा विषय आहे.

वर नमुद केलेल्या सदर मिळकतीवर कोणाचाही, कसलाही हक्क हितसंबंध, बोजा, गहाण, दान, बक्षिस, लिज, वहिवाट, वारसा, इजमेंट, अदलाबदल, भाडेकरार, पोटगी, अन्नवस्त्र, कोर्ट जप्ती, करार-मदार, दावा, खरेदीखत, साठेकरार, अखत्यारपत्र अगर कुठल्याही प्रकारचा हक्क अगर हितसंबंध अगर अधिकार असल्यास अशा व्यक्तिने आपला हक्क लेखी पुराव्यासहित ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १४ (चौदा) दिवसांचे आत खालील पत्त्यावर सर्व संबंधीत कागदोपत्री पुरावा घेऊन खात्री पटवून द्यावी. अन्यथा सदरची मिळकत ही पूर्णपणे निर्वेध, निर्जोखमी आहे, असे समजून अथवा कोणाचाही हक्क अगर हितसंबंध असल्यास तो त्यांनी जाणीपूर्वक सोडून दिलेला आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मागाहून कुणाचीही कसलीही तक्रार आल्यास आमच्या अशिलांवर ती बंधन कारक राहणार नाही.
कळावे.

अलिबाग,
तारीख : /०४/२०२४

**ॲड. सचिन दिनकर पाटील**
बी.ए.एल.एल.बी मुंबई
२१ पारिजात सोसायटी चेंढरे,
ता. अलिबाग, जि. रायगड
मो.नं. ९२२६८७२६९०


**पान १ वरुन**

## आता प्रचाराचं धुमशान

उमेदवारी अर्जाच्या छाननीमध्ये सात उमेदवारांचे अर्ज जिल्हाधिकारी जावळे यांनी बाद ठरवले होते. त्यामुळे २१ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात होते. सोमवारी अर्ज मागे घेण्याच्या अखेरच्या दिवशी आठ उमेदवारांनी माघार घेतली आहे. त्यामुळे आता १३ उमेदवारांमध्येच लढत होणार असली, तरी खरी लढत इंडिया आघाडीचे शिवसेनेचे अनंत गीते आणि महायुतीचे राष्ट्रवादी काँग्रेसचे सुनील तटकरे यांच्यामध्येच खरी लढत पहायला मिळणार आहे.

१६९१ शस्त्रपरवानाधारकांपैकी १४२८ जणांनी शस्त्र जमा केली आहेत. १६२ जण हे बँक सुरक्षा रक्षक, संस्थांचे सुरक्षा रक्षक यांच्यासह अन्य अशा १६२ जणांना वगळ्यात आले आहे. ७९ जणांनी शस्त्र बाळगण्याबाबत विनंती केली आहे. त्यावर लवकरच समिती निर्णय घेणार आहे, अशी माहिती जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी दिली.

रायगड पोलिसांनी १६ मार्च २०२४ ते २२ एप्रिल २०२४ या कालावधीत सहा लाख २१ हजार ७५० रुपयांची रोख रक्कम जप्त केली आहे. २२ हजार ५७.२२ लीटर दारु जप्त केली असून, त्याची किंमत १२ लाख ८९ हजार ५८५ आहे. ५१ हजार ४१२ रुपयांचा पाच किलो ६२९ ग्रॅम गांजा जप्त केला आहे. १९ लाख ८० हजार ३१० रुपयांचे मोफत वाटण्यात येणारे साहित्य जप्त केले आहे. जिल्ह्यात केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या तीन कंपनी नियुक्त करण्यात आल्या आहेत, त्यापैकी एक कंपनी अलिबाग येथे दाखल झाली आहे. अन्य कर्जत आणि माणगाव येथे लवकरच रवाना होणार आहेत. निवडणुका शांततामय आणि निर्भय वातावरणात पार पडण्यासाठी पोलिसांनी मोहीम हाती घेतली असली तरी, ६५५ आरोपी अद्यापही मोकाट आहेत. त्यामुळे त्यांच्यावर कारवाई करणे पोलिसांसमोर आव्हान आहे. २७० पैकी २३ जणांना वॉरंट बजावणे बाकी आहे. लवकरच ही प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल, असेही घार्गे यांनी स्पष्ट केले. सीआरपीसी १०७ नुसार २१०९ जणांकडून बॉण्ड घेतले आहेत. १०९ नुसार ६५, ११० नुसार ८५ जणांनकडून बॉण्ड घेतले आहेत.

**जिल्ह्यातील मतदार संख्येत वाढ, एकूण २३ लाख ६६ हजार ५८ मतदार**

जिल्ह्यातील मतदार संख्येत वाढ होऊन ९ एप्रिल अखेरपर्यंत जिल्ह्यातील एकूण २३ लाख ६६ हजार ५८ मतदार नोंदणी झाली आहे. २३ जानेवारीनुसार, जिल्ह्यात २३ लाख १६ हजार ५१५ मतदार होते. एकूण मतदार संख्येत जिल्ह्यात एकूण ४९ हजार ५४३ इतकी वाढ झाली आहे. यापैकी ३२ रायगड लोकसभा मतदारसंघात ९ एप्रिलअखेर एकूण १६ लाख ६८ हजार ३७२ मतदार असून, पुरुष मतदार ८ लाख २० हजार ६०५; महिला मतदार ८ लक्ष ४७ हजार ७६३ व तृतीयपंथी चार मतदार आहेत, तर मतदारसंघात १४ हजार ४३७ वाढ झाली आहे. २३ जानेवारीनुसार मतदारसंघात १६ लाख ५३ हजार ९३५ मतदार आहेत. यामध्ये पुरुष ८ लाख १३ हजार ५१, तर स्त्री ८ लाख ४० हजार ४१६ आहेत. मतदारसंघात पुरुष मतदारांमध्ये ७ हजार ९०, तर स्त्री मतदारांमध्ये ७ हजार ३४७ वाढ झाली आहे. वयोवृद्ध ८५ वर्षांवरील मतदार व दिव्यांग मतदार धरून मतदान करणार असून, ३ हजार ६३ मतदारांनी यासाठी निवडणूक प्रशासनाकडे मागणी नोंदवली आहे.

## निवडणुकीच्या आखाड्यात कोण

**अमित श्रीपाल कवाडे (अपक्ष, निशाणी- फुलकोबी), श्रीमती कुमोदिनी रविंद्र चव्हाण (वंचित बहुजन आघाडी निशाणी- प्रेशर कुकर).**

## ट्रॉमा केअर सेंटर कागदावर

शासनाला मुहूर्त सापडत नसल्याने ते फक्त कागदावर उरले आहे. त्यामुळे रुग्ण व नागरिकांतून संताप व्यक्त होत आहे. माणगाव तालुक्यासह अन्य तालुक्यातून नागरिक उपचारासाठी मोठ्या संख्येने येतात. सामान्य नागरिकांना खासगी-महागडी रुग्णसेवा परवडत नसल्याने दक्षिण रायगडसह नजीकच्या रत्नागिरी जिल्ह्यातील विविध तालुक्यातून अनेक रुग्ण माणगाव उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी येत आहेत. नवनवीन उपचारासाठी लागणाऱ्या यंत्रसामुग्री, पुरेसा ऑक्सिजन साठा, डायलेसिस विभाग, यामुळे हे रुग्णालय कात टाकत आहे. माणगाव ट्रॉमा केअर सेंटरला मंजुरी मिळाल्यामुळे रुग्णालयाच्या आधुनिकीकरणाच्या वाटचालीत आणखी एक भर पडणार असून, माणगावची आरोग्य यंत्रणा ट्रॉमा केअर सेंटरमुळे अधिक बळकट होणार आहे. मात्र, हे सेंटर गेले अनेक दिवस कागदवरच राहिले आहे. त्याच्या उभारणीसाठी शासन एक पाऊल पुढे कधी टाकणार, असा सवाल नागरिकांतून उपस्थित होत आहे. या सेंटरमध्ये रस्त्यावरील अपघातग्रस्त रुग्णांवर तातडीने उपचार होऊन त्यांचे प्राण वाचणार आहेत. या सेंटरला दोन वर्षांपूर्वी मंजुरी मिळाली असून, ते आजही कागदावरच राहिले आहे. या ट्रॉमा केअर सेंटर उभारणीला मुहूर्त कधी सापडणार, असा सवाल नागरिकांमधून उपस्थित होत आहे.

माणगाव पंचायत समितीची स्वतंत्र इमारत गेली १६ वर्षांपूर्वी माणगाव प्रशासकीय भवन लगत भव्य स्वरुपात शासनाने बांधली आहे. त्याठिकाणी जि.प.च्या विविध विभागांचे काम सुरू आहे. मात्र, राजिपच्या तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय, उपअभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग यांची कार्यालय आजही या जुन्या इमारतीत सुरू आहेत. या इमारतीलगत माणगाव उपजिल्हा रुग्णालय असल्याने या ठिकाणी शासनाने ट्रॉमा केअर सेंटर दोन वर्षांपूर्वी मंजूर केले असून, ही जागा उपजिल्हा रुग्णालयाकडे वर्ग केली आहे. त्या जागेवर ट्रॉमा केअर सेंटर उभारले जाणार आहे. या सेंटरच्या इमारतीचा आराखडा सार्वजनिक बांधकाम खात्याकडे आल्याचे समजते. मात्र, हे काम कधी सुरू होणार, हा संशोधनाचा भाग आहे. याकडे सर्वांचेच लक्ष लागले आहे.

**तटकरेंचे अपयश**

ट्रॉमा केअर सेंटरला दोन वर्षांपूर्वीच मंजुरी मिळाली आहे. परंतु, शासनाच्या दुर्लक्षामुळे अद्याप ते कागदावरच राहिले आहे. विकासाच्या बाता मारणाऱ्या खा. सुनील तटकरे यांनाही या गंभीर प्रश्नाकडे आपल्या खासदारकीच्या कार्यकाळात लक्ष द्यायला वेळ मिळालेला नाही. सत्तेत असूनही काहीच करता न आल्याने खा. तटकरेंचे हे अपयश आहे, अशी चर्चा सध्या माणगावातून केली जात आहे.

## मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना उशिरा जाग

डॉ. मनिषा म्हात्रे या स्थानिक असल्याने त्यांना या काविळच्या साथीची तीव्रता लगेच लक्षात आली. त्यामुळे त्यांनी उपाययोजनाही सुरू केली. काविळची साथ येण्यामागचे महत्त्वाचे कारण म्हणजे ग्रामीण भागात होणारा पाणीपुरवठा. हा पाणीपुरवठा पूर्णतः दूषित असल्याने हा साथीचा आजार उद्भवल्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. खारेपाटाला पाणीपुरवठा हा शहापाडा धरणातून होतो. या धरणाच्या जलशुद्धीकरण केंद्राची स्थिती काय आहे, याबाबत कुणाला काहीही घेणेदेणे नाही. मुख्य कार्यकारी अधिकारी यांना आपली वातानुकूलित खोली सोडता येत नसल्याने ग्रामीण भागात कशा प्रकारे पाणीपुरवठा सुरू आहे याची माहितीच नाही, असा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे. उशिरा का होईना डॉ. बास्टेवाडांना पेण वाशी प्राथमिक आरोग्य केंद्राला भेट देण्याची तरी इच्छा झाली, असे बोलले जात आहे. यावेळी तालुका आरोग्य अधिकारी अपर्णा खेडेकर, गटविकास अधिकारी भाऊसाहेब पोल, वाशी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या डॉ. मनिषा म्हात्रे, वाशी सरपंच संदेश ठाकूर, वढाव सरपंच पूजा म्हात्रे यांच्यासह वाशी विभागातील ग्रामस्थ हजर होते.

## मतदान केंद्रांवर होणार प्रथमोपचार

जिल्ह्यामध्ये गेल्या पंधरा दिवसांपासून तापमानात वाढ होत आहे. सकाळी दहा वाजल्यापासून उन्हाचे चटके प्रचंड जाणवत आहेत. घरातून बाहेर पडणे नकोसे होत आहे. त्यात लोकसभा मतदारसंघातील निवडणुकीची कामे जोरात सुरु झाली आहेत. प्रशासकीय कामकाजासह जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी जिल्हा प्रशासनासह पोलीस प्रशासनाने कंबर कसली आहे.

मतदानाच्या दिवशी कर्मचाऱ्यांसह मतदारांच्या आरोग्याची काळजीदेखील आरोग्य विभागामार्फत घेतली जाणार आहे. जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या मार्गदर्शनानुसार शल्यचिकित्सक डॉ. अंबादास देवमाने आणि जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. मनिषा विखे यांच्या नेतृत्वाखाली शहरी व ग्रामीण भागात आरोग्य कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे. जिल्ह्यात दोन हजारांहून अधिक मतदान केंद्रांमध्ये प्रत्येकी आरोग्य कर्मचारी नियुक्त केले जाणार आहेत. त्यांच्यासोबत औषधांचा साठा उपलब्ध असणार आहे. मतदानासाठी रांगेत उभे राहणाऱ्या मतदारांसह मतदान केंद्रातील कर्मचाऱ्यांना आरोग्य सेवा दिली जाणार आहे. तसेच आपत्कालीन परिस्थिती रुग्णांना रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यासाठी जिल्ह्यातील ५४ प्राथमिक आरोग्य केंद्रात १०२ क्रमांकाची व शहरी भागात जिल्हा रुग्णालयासह उपजिल्हा रुग्णालयात १०८ क्रमांकाची रुग्णवाहिका ठेवली जाणार आहे. जेणेकरून रुग्णांना तातडीने उपचार मिळावा यासाठी हा एक वेगळा उपक्रम जिल्हाधिकारी यांच्या सूचनेनुसार राबविण्यात आला आहे.

**अशी दिली जाणार सेवा**

जिल्हा शल्यचिकित्सक व जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्यामार्फत मतदान केंद्रात आरोग्य कर्मचारी ठेवले जाणार आहेत. प्राथमिक उपचारासाठी औषधांचा बॉक्स असणार आहे. त्यामध्ये इलेक्ट्रोलाईट पावडर, ओआरएस पावडर, दुखापत झाली असल्यास मलमपट्टी लावली जाणार आहे. तसेच ज्या रुग्णांना रक्तदाबाचा त्रास आहे, त्यांचा रक्तदाब तपासून आरोग्यविषयक मार्गदर्शनदेखील यावेळी केले जाणार आहे.

## 'पॉवर'फुल 'तुतारी'चा नाद घुमणार

राष्ट्रवादी काँग्रेसचे सचिव अनिल तटकरे, राष्ट्रवादी काँग्रेस रायगड प्रभारी प्रशांत पाटील, राष्ट्रीय काँग्रेस नेते ॲड. प्रवीण ठाकूर, महाडच्या माजी नागराध्यक्ष स्नेहल जगताप, मुंबई काँग्रेसचे सेक्रेटरी मुफ्ती सुफियान वाणू, मराठा मुस्लिम सेवा संघाचे महम्मद फकीर ठाकूर, सामाजिक नेते इकबालशेठ धनसे, शेकाप नेते नानासाहेब सावंत आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या सभेला इंडिया आघाडीच्या कार्यकर्त्यांनी व जनतेने मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन मोर्बा येथील शेकाप ज्येष्ठ नेते अस्लम राऊत, तालुका चिटणीस रमेश मोरे, ज्येष्ठ नेते सदानंद येलवे, अल्पसंख्याक सेल रायगड अध्यक्ष अमीन अधिकारी, शिवसेना माणगाव संघटक सीताराम मेस्त्री, शिवसेना मोर्बा विभाग प्रमुख मौलाना असिफभाई मनेर, शिवसेना रायगड संपर्क प्रमुख संजय साखळे, युवासेना माणगाव तालुका प्रमुख रणजित मालोरे, रायगड जिल्हा अल्पसंख्याक सेल सदस्य आसिफ हर्णेकर यांच्यासह इंडिया आघाडीचे कार्यकर्ते यांनी केले आहे. या सभेचे आयोजक म्हणून इंडिया आघाडी मोर्बाचे कार्यकर्ते काम पाहात आहेत.

## तळा तालुक्याचा सातबारा कोणाच्या मालकीचा नाही

सांगितले की, या निवडणुकीबाबत मला जराही चिंता नाही. रायगडच्या मतदारांवर माझा विश्वास आहे. माझी ही लढाई भ्रष्टाचाराविरुद्ध सदाचार अशी असून, विरोधकांनाही माहिती आहे की, त्यांचा पराभव अटळ आहे. प्रत्येक ठिकाणी मतदारांचा मला भरभरून प्रतिसाद मिळत असून, जिल्ह्यातील मुस्लिम समाज पूर्णपणे माझ्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे. यावेळी रायगडची जनता चित्र पालटविण्यासाठी सज्ज झालेली असून, येत्या सात मे रोजी रायगडची जनता सुनील तटकरेंना हद्दपार केल्याशिवाय राहणार नाही, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. याप्रसंगी तळा तालुक्यातील इंडिया आघाडीचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## 'अनंत गीतेंच्या पाठीशी भीमशक्ती उभी करणार'

इंडिया आघाडीचे सर्व नेते विशेष करुन शेकापचे आमदार जयंत पाटील यांच्या विनंतीला मान देऊन उमेदवारी अर्ज मागे घेतला. शिवसेनेचे स्थानिक नेते रुपेश जामकर, पेण येथील सबलीकरणाचे नेते उमेश लांगी, पिंपरी शहरचे संजय ताठे यांनीदेखील मला विनंती केली होती. राज्यभरात एसी, एसटी समाजाच्या सबलीकरणासाठी आमचे नेते भीमशक्ती परिवाराचे संस्थापक अध्यक्ष खासदार चंद्राकांत हंडोरे यांच्या नेतृत्वात काम करत आहे. केंद्रातील आणि राज्यातील सरकारने सबलीकरणाचे प्रश्न सोडवले नाहीत. राष्ट्रवादीचे सुनील तटकरे यांच्याकडे हा प्रश्न घेऊन गेलो होतो. मात्र, त्यांनी या प्रश्नाकडे लक्ष दिले नाही. शिवसेनेचे उमेदवार अनंत गीते यांनी आमचा प्रश्न सोडवावा यासाठी त्यांना पाठिंबा देत असल्याचे तंतरपाळे यांनी स्पष्ट केले. इंडिया आघाडीच्या ४८ उमेदवारांच्या विजयासाठी राज्यभरातील आमचे नेटवर्क वापरुन महायुतीच्या उमेदवारांचा पराभव करु, तसचे रायगड लोकसभेत गीते यांना तब्बल दोन लाखांच्या मताधिक्याने विजयी करु, असेदेखील त्यांनी स्पष्ट केले. गीतेंसारख्या स्वच्छ चारित्र्य आणि निष्कलंक उमेदवारांचा पराभव करणे तटकरे यांना कठीण आहे. देशात इंडिया आघाडीचेच सरकार येणार असून, आगामी विधानसभेच्या निवडणुकीतदेखील आमचाच विजय होणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**आ. जयंत पाटील यांचे आभार**

शेकापचे सरचिटणीस आमदार जयंत पाटील यांनी एस, एसटी समाजाच्या सबलीकरण योजनेबाबत नागपूर अधिवेशनात लक्षवेधी मांडली होती. त्याबद्दल आमदार जयंत पाटील यांचे सर्व समाजाच्यानतीने आभार व्यक्त करतो. नजीकच्या कालावधीत सरकार स्थापन झाल्यावर हा प्रश्न निश्चितच मार्गी लागणार आहे.

## तळोजात गंभीर पाणीटंचाई

पूर्वनियोजन करायला हवे होते. परंतु, तसे न करता आधीच पाण्याची टंचाई, त्यात नवनवीन शेकडो प्रकल्प आणून हजारो नवीन घरांची निर्मिती आजदेखील चालू आहे. याशिवाय महानगरपालिकासुद्धा कोणतीही पाण्याचे नियोजन नसताना परीक्षेत्रांमध्ये बिल्डिंगला परवाने आहेत. या सर्व बाबींना कंटाळून सोमवारी जवळपास १०० सोसायटीच्या सदस्यांनी आणि पदाधिकाऱ्यांनी तळोजा फेडरेशनकडे आंदोलनाची मागणी केली. त्यानुसार एक आठवड्याच्या आत सिडको पाणीपुरवठा कार्यालय, रायगड भवन, बेलापूर येथे तीव्र आंदोलन करण्याचा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.


### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे कडाव, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आहे, या मिळकतींचे मालक रुपेश गोपाळ गव्हाणे यांचेकडुन आमचे अशिलांनी विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे नंबर | क्षेत्रफळ हे. आर. पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|
| १०३/३ | ००-१७-०० | ०.१९ |

सबब सदर मिळकतींच्या व्यवहाराबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून ०८ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकती ह्या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतींचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : २३ एप्रिल २०२४

**ॲड. शरद आर. सावंत**
बी. कॉम. एल.एल.बी.
पत्ता - सदनिका नंबर ०२, तळमजला, बी विंग,
विहंग को. ऑ. हौ. सो. लि. कोतवालनगर कर्जत
ता. कर्जत, जि. रायगड - ४१०२०१
मो. नं. ९५२७२८२५२५

## निवडक

### वार्षिक अंकाचे अनावरण

**पेण :** पेण एज्युकेशन संस्थेच्या भाऊसाहेब नेने महाविद्यालयात शुक्रवारी (दि.१९) महाविद्यालयाचा वार्षिक अंक 'प्रतिबिंब'चा अनावरण सोहळा मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडला. यावेळी ॲड. बापुसाहेब नेने यांच्या हस्ते तसेच मान्यवरांच्या उपस्थितीत प्रतिबिंब या वार्षिक अंकाचे अनावरण करण्यात आले. याप्रसंगी ॲड. बापुसाहेब नेने, ॲड. मंगेश नेने, डॉ. नीता कदम, बापुराव आठवले, वसंतराव आठवले, डॉ. सदानंद धारप, डॉ. यु.ए.खाडिलकर आदि. मान्यवर उपस्थित होते.

### माजी विद्यार्थी मेळावा

**कर्जत :** अभिनव ज्ञान मंदिर संस्थेच्या माजी विद्यार्थ्यांचे स्नेह संमेलन संपन्न झाले. याप्रसंगी राज्यभरातून माजी विद्यार्थ्यांनी हजेरी लावली होती. दिवसभर आयोजित केलेल्या कार्यक्रमाचा सर्वांनीच आस्वाद घेतला. संस्था कधीही अडचणीत आली तर आम्हाला हाक मारा, असा शब्द माजी विद्यार्थ्यांनी दिला. यावेळी महेश शहा यांच्या हस्ते मेळाव्याचे उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी गणेश वैद्य, श्रीराम पुरोहित, नंदकुमार मणेर, पद्माकर गांगल, रणजीत जैन, विजय मोरे, संजय खडे व्यासपीठावर उपस्थित होते.

### सत्संग मेळावा संपन्न

**तळा :** तळा तालुक्यातील गिरणे येथे भक्तिपूर्ण वातावरणात श्री स्वामी समर्थ मानव विकास अध्यात्मिक उपकेंद्राच्या माध्यमातून रविवारी (दि.२१) सत्संग मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यानिमित्ताने भूपाळी आरती, नैवेद्य आरती, स्वामीयाग, प्रश्नोत्तरे, प्रफुल्ला म्हस्के यांचे स्वामी गीत गायन आदी कार्यक्रम पार पडले. या सत्संग मेळाव्याचा तालुक्यातील बहुतांश भाविकांनी उपस्थित राहून लाभ घेतला. याप्रसंगी स्वामी सेवेकरी, गिरणे ग्रामस्थ व महिला उपस्थित होत्या.

### निरंकारी भक्तांचे रक्तदान

**उरण :** संत निरंकारी मिशनची सामाजिक शाखा संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशनच्यावतीने रविवारी (दि.२१) नवीन शेवा येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात सुमारे १०० निरंकारी भक्तांनी रक्तदान केले. संत निरंकारी रक्तपेढी विले पार्ले मार्फत रक्त संकलन करण्यात आले. याप्रसंगी दत्ताराम पाटील तसेच मुखी, सेवादल, संचालक व अधिकारी उपस्थित होते. मनोहर भोईर तसेच सोनल घरत आदि मान्यवरांनी शिबिराला सदिच्छा भेट दिली.

### रानमेव्याची भुरळ

**पाताळगंगा :** दिवसेंदिवस उन्हाचा पारा वाढत असल्यामुळे नागरिकांच्या अंगाची लाही-लाही होत आहे. या उन्हाच्या चटक्यांपासून थकवा कमी व्हावा यासाठी निसर्गाने या ऋतूमध्ये रानमेवा निर्माण केला असावा. उन्हाळ्याचे आगमन होताच हा रानमेवा बाजारात आल्याने यामध्ये करवंदे, कैरी, अंजीर, काजू, चिंच अदि खरेदी करण्याचा नागरिकांचा कल मोठ्या प्रमाणात दिसून येत आहे. रुचकर, स्वस्त आणि औषधी असे बहुउपयोगी असलेल्या या रानमेव्याची अनेकांना भुरळ पडत आहे.

# पाणीटंचाईची समस्या बिकट

## शासनाच्या दोन टँकर मधून पाणीपुरवठा

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

**उन्हाचे चटके वाढले असून तालुक्यात मोठ्या प्रमाणात पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाली आहे. त्यासाठी खासगी संस्थेच्या माध्यमातून किमान २० गावे आणि वाड्यांना पिण्याचे पाणी पुरवले जात आहे. तर, पाच गावे आणि चार वाड्यांना शासकीय टँकर मधून पाणी पुरवठा सुरु आहे. दरम्यान, तालुक्यातील चार ठिकाणी येत्या काही दिवसांत शासनाच्या टँकरमधून पाणी पुरवठा करण्याचे नियोजन पंचायत समितीकडून सुरु आहे. त्यात तीन आदिवासी वाड्या आणि एका गावाचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आला आहे, अशी माहिती पंचायत समितीकडून देण्यात आली आहे.**

पाणीटंचाई दूर करण्यासाठी शासनाच्यावतीने पाणीटंचाई कृती आराखडा तयार केला जातो. यावर्षी तालुक्यातील १८ गावे आणि ६० आदिवासी वाड्यांना पाणीटंचाई ग्रस्त गावे-वाड्या म्हणून शासनाने जाहीर केले आहे. यावर्षी तालुक्यात अनेक वर्षातील तीव्र पाणीटंचाई दिसून येत आहे. त्यामुळे १ एप्रिल रोजी शासनाचा पहिला टँकर सुरु करण्यात आला. आतापर्यंत तालुक्यात १२ हजार लिटर क्षमता असलेल्या शासनाच्या दोन टँकरमधून पाच गावे आणि चार आदिवासी वाड्यांमध्ये पाणी पुरवठा केला जात आहे.

आतापर्यंत आषाणे, पिंगळस, मोग्रज, किरवली आणि खानंद या पाच गावात पिण्याचे पाणी टँकरमधून पुरविले जात आहे. तर, जांभूळवाडी, मेचकरवाडी, फणसवाडी आणि भक्ताची वाडीमध्ये शासनाच्या टँकरमधून पाणी पुरवठा सुरु केला आहे. मात्र, तरीदेखील कर्जत तालुक्यातील आणखी चार ठिकाणी शासनाने पिण्याचे पाणी टँकरमधून पुरविण्याचे प्रस्ताव कर्जत पंचायत समितीकडे पोहचले आहेत. किरवली वाडी, कोषाने आणि आषाणे वाडी तसेच वर्णे येथे पाणी पुरविण्याचे प्रस्ताव कर्जत पंचायत समितीकडे आले आहेत. त्या सर्व ठिकाणी उप विभागीय अधिकारी यांच्या मान्यतेने याच आठवड्यात पाण्याचे टँकर सुरु करण्यात येणार असल्याचे सांगण्यात येत आहे.

दुसरीकडे कर्जत तालुक्यात सुधाकर घारे फाउंडेशनकडून साधारण १२ टंचाईग्रस्त गावांना पिण्याच्या पाण्याची व्यवस्था टँकर पाठवून केली जात आहे. तर, आमदार महेंद्र थोरवे फाउंडेशनकडून ११ पाणीटंचाई असलेल्या गावे वाड्यांमध्ये टँकर पाठवून तहान भागविली जात आहे. त्यामुळे कर्जत पंचायत समितीवर टँकर ने पाणी पुरविण्याचा बोजा काहीसा कमी झाला आहे.






# महामार्गावर बर्निंग बसचा थरार

## ■ सुदैवाने प्रवासी बचावले

**। खोपोली । प्रतिनिधी ।**



मुंबई - पुणे महामार्गावर आकांक्षा ट्रॅव्हल (एमएच-०१-सीआर-८५८५) बसच्या इंजिनमध्ये अचानक शॉर्ट सर्किट होऊन आग लागल्याची घटना रविवारी (दि.२१) पहाटे २ वाजताच्या दरम्यान घडली. त्यावेळी समय सूचकता दाखवत बस चालक इरफान अहमद अली जहागीरदार आणि सह चालक रामेश्वर गवळी याने बसमधील प्रवाशांना सुखरूप बाहेर काढले. त्यामुळे सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही.

मुंबई-पुणे महामार्गावरून खासगी प्रवासी बस भरधाव वेगात प्रवास करीत असताना अचानक बस ने पेट घेतल्याची जाणीव चालकाला झाल्याने बस थांबवत लगबगीने बस मधील ३५ प्रवासी खाली उतरवले. बघता बघता बसच्या आगीचा भडका तीव्र झाल्याने आगीमध्ये बस तसेच प्रवाशांचे सामान पूर्णपणे जळून खाक झाले. ही आग देवदूत टीम, खोपोली नगरपालिका फायर ब्रिगेड, टाटा स्टील फायर ब्रिगेड यांच्या मदतीने विझविण्यात आली.

# भाजी विक्रेत्यांना छत्रीचा आधार

**। रेवदंडा । प्रतिनिधी ।**

रेवदंड्यात भाजी मार्केटचा प्रश्न ऐरणीवर असून संबंधित प्रशासन तो सोडविण्यास चक्क अपयशी ठरले आहे. गेले अनेक वर्ष भाजी विक्रेत्यांना ऐन उन्हाळयात सावलीसाठी तर पावसाळ्यात पावसापासून बचाव करण्यासाठी चक्क छत्रीचा आधार घ्यावा लागत आहे.



रेवदंडा शहर मध्यवर्ती ठिकाण असल्याने आजूबाजूच्या पंचक्रोशीतील भाजी विक्रेते व्यवसायासाठी ताजी भाजी उपलब्ध करीत असतात. ताजी भाजीसह कडधान्ये, चिंच, आंबे, सफेद कांदे, कलिंगडे, आजूबाजूच्या बागायतीमधील विविध फळे पारनाका येथील भाजी विक्रेत्यांकडे उपलब्ध असतात. सकाळचे कोवळे उन सरताच उन्हाळ्यातील कडक सुर्य किरणे डोक्यावर पडताच असह्य होते. अश्या परिस्थितीत भाजीचा व्यवसाय साधणे फार जिकीरीचे बनते. पंचक्रोशीतून भाजी खरेदीसाठी ग्राहक येत असतात. त्यांना सुध्दा उन्हाचा त्रास सहन करत भाजी खरेदी करावी लागते.

रेवदंडा शहरात अनेक वर्ष भाजी मार्केट सुविधा नाही, त्यामुळे भाजी विक्रेत्यासह खरेदीदारांना सुध्दा उन्हाळयात व पावसाळयात त्रास सहन करावा लागत आहे. भाजी मार्केटप्रमाणे मच्छी मार्केटचा सुध्दा प्रश्न निर्माण झाला आहे. रेवदंडा हायस्कुलच्या बाजूच्या गल्लीत रस्त्यावर तसेच आत गल्लीत मच्छी विक्री व्यवसाय केला जात आहे. या ठिकाणी नित्याने बाहेरील वाहनांची कोंडी होते. तर, रेवदंडा समुद्रकिनारी ये-जा करताना पर्यटकांना सुध्दा अडथळा निर्माण होतो. रेवदंड्यातील भाजी व मच्छी मार्केट हे जिव्हाळ्याचे प्रश्न केव्हा सुटणार, असा प्रश्न ग्रामस्थ करत आहेत.

## दिव्यांगांना मदतीचा हात

**उरण :** सारडे येथील राजेश ठाकूर या गरीब दिव्यांग बांधवाला कॅन्सर या आजारांनी ग्रासले असता त्याला आधार व आर्थिक मदत देण्यासाठी उरण तालुक्यातील अनेक दिव्यांग बांधवांनी आपले मदतीचे हात पुढे करून आर्थिक मदत त्याच्या कुटुंबाकडे सुपुर्द केली आहे. राजेश ठाकूर हा गरीब कुटुंबातला मुक-बधिर मुलगा काही दिवसांपूर्वी आजारी पडला. तपासणी केली असता त्याला हाडाचा कॅंसर झाल्याचे निदान झाले. आताच्या घडीला दोन दिवसांनी त्याला डायलिसिस करण्यासाठी खारघर येथे जावे लागते.

# महामार्गावर वेगमर्यादेत बदल

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

मुंबई - पुणे महामार्गावर वेगमर्यादेत बदल करण्यात आला आहे. प्रवास करताना वाहनचालकांना आता घाट माथ्यावर व उर्वरित मार्गावर वेगळ्या वेगाने वाहन चालवावे लागणार आहे. तशा प्रकारची अधिसूचना अपर पोलीस महासंचालक वाहतूक महाराष्ट्र राज्य सुखविंदर सिंह यांनी १९ एप्रिल रोजी प्रसिद्ध केली आहे.

महामार्गावर वेगमर्यादा असतानाही वाहन चालक वेगमर्यादा पाळत नसल्याने मोठ्या प्रमाणात अपघात होऊन जिवित हानी होते. याच पार्श्वभूमीवर ही अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आली असल्याचे सांगण्यात आले आहे. वाहन चालकांनी वाहतूक वेगमर्यादेचे पालन करणे अनिवार्य आहे. अन्यथा त्यांच्यावर दंडात्मक कारवाई ही सीसीटीव्ही कॅमेरे यांच्या माध्यमातून होणार आहे. ९४ किमी अंतरावर सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात आले आहेत.

### वाहनांची अशी वेगमर्यादा

**ज्या वाहनांमधून चालकासह आठ प्रवासी वाहतूक करतात अशा वाहनांसाठी समतल भागामध्ये तासी वेग मर्यादा १०० किमी आणि घाट क्षेत्रामध्ये ६० किमी अशी करण्यात आली आहे. ज्यांचा उपयोग माल वाहतुकीसाठी केला जातो यांच्यासाठी देखील समतल भागामध्ये वेग-मर्यादा ताशी ८० किलोमीटर तर घाट क्षेत्रामध्ये ४० किलोमीटर निश्चित करण्यात आली आहे. सद्यस्थितीत मुंबई-पुणे महामार्गावर समतल भागासाठी असलेली वेगमर्यादा १०० किमी प्रति तास असून घाट भागामध्ये आल्यानंतर वेगमर्यादा ५० किमी प्रति तास आहे.**




# सनातन गौरव दिंडी

**। पुणे । प्रतिनिधी ।**

सनातन संस्थेच्या रौप्य महोत्सवाच्यानिमित्ताने सनातन धर्मावर होत असलेल्या टीकेला उत्तर देण्यासाठी, तसेच सनातन धर्माचा गौरव वाढवण्यासाठी रविवारी (दि.२१) सायंकाळी पुणे येथे ९ हजारांहून अधिक हिंदूंनी एकत्र येत सनातन गौरव दिंडी काढली. यात वीसहून अधिक विविध संप्रदाय-संघटना सहभागी झाल्या होत्या. पुणे शहरात ठिकठिकाणी रांगोळी काढून व दिंडीवर पुष्पवृष्टी करून मान्यवरांच्या हस्ते दिंडीचा सन्मान करण्यात आला. या दिंडीमध्ये स्वाती खाड्ये, गजानन साठे, संगिता पाटील आणि मनीषा पाठक आदी संतांची वंदनीय उपसथिती लाभली. तसेच, विद्याधर नारगोलकर, शेखर मुंदडा, सुरेखा गायकवाड, स्वप्नील नाईक, सुर्यकांत पाठक, चेतन राजहंस आणि सुनील घनवट हे उपस्थित होते. स्वातंत्र्यवीर सावरकर स्मारकासमोरील विमलाबाई गरवारे प्रशाळेच्या मैदानात दिंडीची सांगता झाली.

# म्हसळा तालुक्यात ई-पॉस मशीनचे वाटप

**। म्हसळा । वार्ताहर ।**

रेशन दुकानदारांना जुन्या टूजी ई-पॉस मशिनमधील तांत्रिक त्रुटींमुळे धान्य वितरण करण्यात अडचणी येत होत्या. याबाबत रेशन दुकानदार संघटनांनी फोरजी ई-पॉस मशीन देण्याची मागणी केली होती. त्यावर म्हसळा तालुक्यात पुरवठा विभागाकडून तहसीलदार समीर घारे यांच्या हस्ते म्हसळा तालुक्यातील ४५ रेशन दुकानदारांना फोर जी ई-पॉस मशीन देण्यात आले.



अनेक ई-पॉस मशीनमधील सीमकार्ड निरुपयोगी झाले असताना रेशन दुकानदार आपल्या मोबाईलद्वारे हॉटस्पॉट वापरून धान्य वितरण करीत होते. गर्दीच्या वेळी मशीनमधील तांत्रिक बिघाडामुळे रेशन दुकानदारांना शिधावाटप करताना बऱ्याच अडचणी आल्या. या कारणावरून ग्राहक आणि रेशन दुकानदार यांच्यात वादही होत आहेत. त्यामुळे रेशन दुकानदार फोर जी ई-पॉस मशीन उपलब्ध करून देण्याबाबत आग्रही होते. या ई-पॉस मशिनसोबत आयरिस स्कॅनरही दिले जाणार आहे. ज्या वयोवृद्ध लाभार्थ्यांच्या अंगठ्याचे ठसे ई-पॉस मशीनवर उमटत नाहीत त्यांच्यासाठी आयरिस स्कॅनर वापरता येणार आहे. आधार कार्डप्रमाणे यामध्ये स्कॅनिंग होणार आहे.

अत्याधुनिक व्हर्जनच्या पॉस मशीनमध्ये मोठा डिस्प्ले, उत्तम बॅटरी क्षमता, दोन सीमकार्ड वापरता येण्याची सुविधा, पावतीची प्रिंट काढण्याची सोय, ठसे जुळत नसलेल्यांसाठी आयरिस स्कॅनची सुविधा, दैनंदिन वाटप आकडेवारी साठवण्याची सुविधामुळे वितरण प्रणाली अधिकाधिक पारदर्शक व सुलभ होणार असल्याचे तहसीलदार समीर घारे यांनी रेशन दुकानदार यांना मार्गदर्शन करताना सांगितले.

# शिंग्रोबा देवाच्या उत्सवाचे आयोजन

**। खोपोली । प्रतिनिधी ।**



खंडाळा घाटाचे जनक म्हणून ओळखले जाणाऱ्या वीर हुतात्मा शिंग्रोबा देवाचा उत्सव बुधवार दि.१ मे रोजी आयोजित करण्यात आला आहे. या उत्सवात समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थितीत राहावे, असे आवाहन बबन शेडगे यांनी केले आहे.

खोपोली शहराच्या घाट माथ्यावर खंडाळा घाटातील वीर शिंग्रोबा देवाचे मंदिर आहे. हे अखंड धनगर समाजाचे दैवत आहे. तसेच, खंडाळा घाटाचे जनक म्हणून ओळखले जाणारे वीर हुतात्मा शिंग्रोबा देवाचा उत्सव दरवर्षी १ मे रोजी मोठ्या उत्साहात पार पडतो. यामध्ये सकाळी महाअभिषेक, होमहवन, पूजा, भव्य पालखी मिरवणूक, मच्छिंद्र कुंभार यांचे कीर्तन, दुपारी हळदीकुंकू-सत्कार, महाप्रसाद, गजनृत्य, सायंकाळी आरतीने कार्यक्रमाची सांगता होणार आहे.

# सुधागडातील मृगगड झाला सुरक्षित

***। पाली/गोमाशी । वार्ताहर ।***

***सुधागड तालुक्यातील भेलिव येथील मृगगड हा किल्ला ऐतिहासिक व महत्वपूर्ण किल्ला आहे. मृगगड किल्ल्यावर ट्रेकर आणि पर्यटकांचा येण्याच्या ओघ वाढला आहे. मात्र, मागील काही वर्षांत पावसाळ्यात केल्या जाणाऱ्या ट्रेकिंगमुळे आणि निष्काळजीपणामूळे काही अपघात झाले आहेत. तसेच, किल्ल्यावरून पडून काही लोकांना गंभीर दुखापत झाली आहे. या सर्व बाबी लक्षात घेता दुर्गवीर प्रतिष्ठानातर्फे नुकतेच मृगगडावर धातूचे सुरक्षा रोप लावून किल्ला सुरक्षित करण्यात आला आहे. त्यामुळे दुर्गप्रेमी, ट्रेकर व ग्रामस्थ सुखावले आहेत.***

*दुर्गवीर प्रतिष्ठान संस्थेच्या माध्यमातून गेली १३ वर्षे किल्ल्यावर संवर्धनाचे काम सुरू आहे. किल्ल्यावरील पाण्याचे टाके, वास्तू आणि माहिती फलक अशी अनेक कामे केली गेली. त्यामुळे किल्ला आज सुस्थितीत बघायला मिळत आहे.*

*किल्ल्यावरील कातळ कोरीव पायऱ्या पावसाळ्यात शेवाळामुळे निसरड्या होतात. गवत वाढल्यामुळे आणि वरून माती वाहून आल्यामुळे त्यावर पाय नीट ठेवता येत नाही. चढाई-उतराई करताना खूप सावधपणे वावर करायला लागतो नाहीतर अपघात होतात. ही गंभीर समस्या लक्षात आल्यावर आणि भविष्यात किल्ल्यावर येणाऱ्या लोकांचा ओघ बघता येथील मार्ग सुरक्षित करणे गरजेचे होते. कारण कोणताही अपघात झाल्यावर लोकं किल्ल्याला नावं ठेवतात. येथे येणाऱ्या पर्यटकांची काही चूक आहे का, ते बघितले जात नाही. त्यामुळे दुर्गवीर प्रतिष्ठानातर्फे रेकी केली आणि मार्ग सुरक्षित करण्याचे नियोजन करण्यात आले व मृगगडावर धातूचे सुरक्षा रोप लावल्याने किल्ला सुरक्षित झाला आहे.*

*या मोहिमेत दुर्गवीर प्रतिष्ठानचे अर्जुन दळवी, प्रशांत डिंगणकर, विठ्ठल केंबळे, प्रमोद डोंगरे, कृपेश बेलकर, रुपेश लाखाडे, अजय शिंदे, अमोल सुर्वे, प्रतीक सुर्वे, सिद्धांत शिंदे, राज मेस्त्री, महेश सावंत, प्रतीक पाटेकर, प्रतीक इंदुलकर, प्रतीक भोंनकर, स्वप्नील भगत आणि ऋषिकेश मसने हे दुर्गवीर सहभागी झाले होते.*





### ..आणि मृगगडाला लागले रोप

*कामासाठी लागणारे सगळे सामान वायर रोप, बोल्ट, फिशर प्लेट, यु क्लॅम्प आदी सर्व साहित्य खरेदी केले. ठरल्याप्रमाणे सगळ्या टीम मुंबईतून किल्ल्याच्या पायथ्याच्या भेलिव गावासाठी रवाना झाल्या. त्यांनतर टीम किल्ल्यावर पोहचली आणि लगेच कामाला सुरुवात झाली. कुठे बोल्टिंग करायची आहे याची मार्किंग करण्यात आली आणि ड्रिल मशीनने बोल्टिंगला सुरुवात झाली. खिंडीमध्ये आणि पायरी मार्गावर एकूण १८ बोल्ट मारण्यात आले आणि फिशर प्लेट लावण्यात आली. दोन बोल्टमधील मार्किंग केल्याप्रमाणे वायर रोप कापण्यात आला आणि माप घेतल्याप्रमाणे रोप लावण्यास सुरुवात झाली. यु क्लॅम्प लावून सगळे रोप लावण्यात आले आणि मृगगड सुरक्षित झाला.*

### गडावर आजवर झालेली कामे

*१. गडावरील महत्त्वाची पाण्याची टाके स्वच्छता मोहिमा.*
*२. गडावर इतिहास माहिती फलक लावले.*
*३. गडपायथा ते गडापर्यंत दिशादर्शक फलक लावले.*
*४. गड पायथ्याशी असलेल्या जिल्हा परिषदेच्या शाळेचा एक वर्ग पुनः बांधणी करण्यात आला.*

### अनेकांची मदत

*या सर्व मोहिमेत दुर्गवीरांसोबत टेक्निकल टीम म्हणून ॲडव्हेंचर इंडीया टीम मधून प्रशांत खैरनार, अमित खरात, मनोज भालेघरे आणि मंगेश बाळू कोयंडे यांची खरी मदत झाली. तसेच, लोणावळ्यातील शिवदुर्ग संस्थेने बॅटरीवर चालणारी ड्रिल मशीन दिली.*

## क्लासिफाईड

*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- **अलिबाग येथे मोठा फ्लॅट (2BHK) विकणे आहे. किंमत रूपये ७४ लाख** (Negotiable) ८२७५११९८८३
- **शिवानी पेटशॉप अलिबाग येथे कामाकरीता कमीत कमी १२ वी पास मुलगी पाहिजे. ९२७२३८३४७६**
- **विद्यानगर चेंढरे येथे** 3BHK Semi-Furnished **फ्लॅट विकणे आहे. क्षेत्र :- १५६० चौ.फूट बिल्टअप संपर्क :** PRO-LOAN SOLUTION ९२२१६८०२८४/९७६४१४९१४३
- **'इंद्रप्रस्थ' गोंधळपाडा येथे सफाईकामगार त्वरित पाहिजेत. कामाची वेळ सकाळी ९.३० ते सायं.६ भेटण्याची वेळ-सकाळी ११ ते सायं.५ ठिकाण- इंद्रप्रस्थ, गावदेवी मंदिराजवळ, गोंधळपाडा माहितीकरीता संपर्क : ८१८०८६१२३४, ८१८०८५१२३४.**
- 250 Sq/ft Gala for sale, shivaneri Appt. Near Vardhaman sale's- Alibag Revas - Road. East & Road facing. Mo. 9423377572 / 9028493434.

**जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१**

# रुग्णालयाच्या कारभाराचा दिव्यांगांना भुर्दंड

## प्रमाणपत्र मिळविण्याच्या नोंदणीसाठी दोनशे रुपये खर्च

**। पनवेल । वार्ताहर ।**

अलिबाग जिल्हा शासकीय रुग्णालय येथे दिव्यांग व्यक्तींना दिव्यांग प्रमाणपत्र मिळण्यासाठी ऑनलाईन नोंदणी करावी लागते. ही प्रक्रिया रुग्णालयामार्फतच राबविली जाणे अपेक्षित आहे. परंतु, तसे न करता रुग्णालय त्या दिव्यांग व्यक्तींना बाहेरून ऑनलाइन फॉर्म भरून घेण्याचा अजब सल्ला देत आहे. सायबर कॅफेत फॉर्म भरण्यासाठी दोनशे रुपये खर्च येत असून, त्याचा नाहक भुर्दंड सोसावा लागत आहे. ही बाब रायगड शिव आरोग्य सेनेच्या निदर्शनास येताच त्यांनी जिल्हा रुग्णालय प्रशासनाला याबाबत जाब विचारत जनआंदोलनाचा इशारा दिला. त्यानंतर रुग्णालय प्रशासनाने सध्या तात्पुरती व्यवस्था करुन हा प्रश्न कायमस्वरुपी सोडविण्याचे आश्वासन दिले.




महाराष्ट्र शासन दिव्यांग मंत्रालयाच्या निर्देशानुसार दिव्यांग व्यक्तींना सर्वतोपरी सहकार्य करून शासकीय रुग्णालयाने तेथेच रुग्णालयातच ऑनलाईन फॉर्म भरून ते दिव्यांग प्रमाणपत्र हातात मिळेपर्यंतची संपूर्ण प्रक्रिया मोफत राबविणे गरजेचे आहे. परंतु, रुग्णालय आपली जबाबदारी टाळत असल्याचे दिसून येत आहे. रुग्णालयाच्या असहकार्याच्या भूमिकेमुळे संबंधित दिव्यांग व्यक्तींना दोनशे रुपये नाहक भुर्दंड सोसून बाहेरून ऑनलाइन फॉर्म भरावे लागत आहे. त्याविरोधात आवाज उठवण्यासाठी शिव आरोग्य सेनेचे कार्याध्यक्ष डॉ. किशोर ठाणेकर, उपाध्यक्ष डॉ. जयवंत गाडे, महाराष्ट्र राज्य समन्वयक जितेंद्र सकपाळ यांच्या सूचनेनुसार शिव आरोग्य सेनेचे रायगड जिल्हाध्यक्ष डॉ. परेश देशमुख यांच्या नेतृत्वाखाली शिव आरोग्य सेनेच्या पदाधिकाऱ्यांनी अलिबाग शासकीय रुग्णालयाला या प्रकाराबद्दल जाब विचारण्यासाठी धडक दिली. यावेळी शिव आरोग्य सेनेचे अलिबाग तालुका संघटक साक्षात म्हात्रे, खारघर शहर संपर्क समन्वयक सचिन सावंत, करंजाडे शहर संघटक सुनील पवार, खारघर सहविभाग संघटक रोशन शिंदे, चौलमळा येथील अनिकेत नाईक, सार्थक घरत, ओमकार पाटील व अन्य शिवसैनिक उपस्थित होते.

### शिवआरोग्य सेनेने विचारला प्रशासनाला जाब

यावेळी रुग्णालयातील सर्व ओपीडी आणि इतर विभाग देत असलेल्या सुविधांबद्दल पाहणी करण्यात आली. दरम्यान, जीवनावश्यक औषधांचा तुटवडा, स्वच्छतागृहांची अस्वच्छता, स्वच्छतागृहांमध्ये पाण्याचा अभाव आदी बाबी निदर्शनास आल्या. त्याचप्रमाणे डॉक्टरही वेळेवर येत नसल्याचे तेथील रुग्णांनी सांगितले. ऑन ड्युटी त्यांच्या जागेवर नसल्याचे आढळून आले, असे विविध समस्या रुग्णालयात असल्याचे लक्षात आले.

दरम्यान, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. शीतल जोशी यांची भेट घेत या सर्व प्रकाराबद्दल त्यांना निवेदन देण्यात आले. यावेळी त्यांनी पुरेसे मनुष्यबळ नाही, कॉम्प्युटर नाही, त्यामुळे रुग्णालयातच नोंदणी करता येत नाही, असे न पटणारे, बेजबाबदारपणाचे उत्तर दिल्याचे आरोग्य संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले. जर या समस्या तात्काळ सोडविण्यात आल्या नाहीत, तर जनआंदोलन करण्यात येईल, असा इशारा शिव आरोग्य सेनेच्या वतीने देण्यात आला. वरील सर्व बाबी गंभीर असून, खास करून दिव्यांगाचा विषय याबाबत आपले वरिष्ठ आरोग्य अधिकारी ठाणे जिल्हा यांना लवकरच शिव आरोग्य सेनेचे पदाधिकारी भेटून या प्रकाराबाबत जाब विचारला जाईल, असे सांगण्यात आले. दरम्यान, आम्ही तात्पुरतं आमच्या पद्धतीने मार्ग काढत दिव्यांग व्यक्तींना रुग्णालयातच फॉर्म भरण्याची प्रक्रिया राबवण्यासाठी सुरुवात करू आणि त्यासाठी प्रयत्नशील राहू, असे आश्वासन डॉ. शीतल जोशी यांनी शिव आरोग्य सेनेला दिले.


## जाहीर सूचना

तमाम जनतेला याद्वारे सूचना देण्यात येते की, आम्ही याखालील लिखित अनुसूचीमध्ये अधिक स्वरूपात वर्णन केलेल्या मालमत्तेच्या (यापुढे 'मालमत्ता' असे उल्लेखित) संदर्भामध्ये रंजित प्रभाकर राणे ('मालक') यांचे मालकी हक्क तपासत आहोत, जसे आमचे अशील हे मालकांकडून सदर मालमत्ता खरेदीसाठी इच्छुक आहेत.

सर्व किंवा कोणत्याही व्यक्तीला सदर मालमत्ता किंवा त्यावरील कोणत्याही भागाच्या संदर्भामध्ये/विरुद्ध कोणताही हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेप जसे की, विक्री, अदलाबदल, भाडेपट्टा, कुळवहिवाट, परवाना, विश्वस्त, धारणाधिकार, निर्वाह, सुविधाधिकार, वारसाहक्क, ताबा, जप्ती, गहाण, प्रभार, बक्षीस, प्रलंबित वाद, एफएसआय वापर किंवा अन्यकाही दावे असल्यास त्यांनी तसे सदरच्या लिखित सुचनेसह झुंजारराव आणि कं., वकील आणि सॉलिसिटर्स, ४ था मजला, जलाराम ज्योत, जन्मभुमी मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१ येथे तसे हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेपाच्या कागदपत्रांच्या प्रमाणित सत्य प्रतींसह या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत कळविणे आवश्यक आहे, कसूर केल्यास, तसा दावा, मागणी किंवा आक्षेप अस्तित्वात नसल्याचे मानण्यात येईल आणि जरी तसा दावा, मागणी किंवा आक्षेप कायद्यात किंवा अन्यथा अस्तित्वात असल्यास, दावेदारांनी तसा दावा, मागणी किंवा आक्षेप रद्द केल्याचे मानण्यात येईल आणि/किंवा तसा दावा, मागणी किंवा आक्षेपाचा कोणताही हक्क त्याग केला असे समजण्यात येईल आणि कोणताही असा दावा, मागणी किंवा आक्षेप आमचे अशिलांवर बंधनकारक असणार नाही आणि आमचे अशील वर नमूद केल्याप्रमाणे सदर मालमत्ते संदर्भात खरेदीव्यवहार करू शकतात.

**अनुसूची (मालमत्तेचे वर्णन)**

नोंदणीकृत जिल्हा व उप-जिल्हा रायगड यांचे कार्यक्षेत्र मधील गाव-टेकाळी, तालुका - अलिबाग, जिल्हा - रायगड येथे स्थित

भूमापन क्रमांक व उपविभाग १०३, एकूण क्षेत्र ०-०७-५० ( हे.आर.चौ.मी.) आकार ० रु.१२ पै., भूमापन क्रमांक व उपविभाग १०४, एकूण क्षेत्र ०-०५-५० ( हे.आर.चौ.मी.) आकार ० रु.०९ पै., भूमापन क्रमांक व उपविभाग १०६, एकूण क्षेत्र ०-०५-३० ( हे.आर.चौ.मी.) आकार ० रु.०९ पै., भूमापन क्रमांक व उपविभाग १०८, एकूण क्षेत्र ०- ५४-१० ( हे.आर.चौ.मी.) आकार १ रु.८८ पै., भूमापन क्रमांक व उपविभाग १३२, एकूण क्षेत्र ०-२९-९० (हे.आर.चौ.मी.) आकार १ रु.०९ पै.

**ठिकाण : अलिबाग**
दिनांक : २३/०४/२०२४

**झुंजारराव आणि कं. करीता**
**सही/-**
**विक्रांत झुंजारराव**


## कोटेश्वरी मातेच्या यात्रेला प्रारंभ

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

मुरुडच्या प्रवेशव्दाराजवळ कोटेश्वरी मातेच्या यात्रेला प्रारंभ झाला असून, महिलांनी सकाळपासून देवीच्या दर्शनासाठी गर्दी केली होती. देवस्थान ट्रस्टच्या वतीने चैत्र शुद्ध चतुर्दशीला ग्रामदैवत कोटेश्वरी देवीच्या यात्रेचे आयोजन केले जाते. या यात्रेला मुंबई, पुणे व शहरांसह पंचक्रोशी भागातील शेकडो भाविक या यात्रेला येत असतात. देवीची देवीची खणा-नारळानी ओटी भरून मनोभावे पूजा केली जाते. यात्रेत मिठाई, खेळणी, भज्जीची, हार-फुलांची आदींची दुकाने थाटली होती.

## वाढत्या उकाड्याने विद्यार्थी असह्य

**। कर्जत । प्रतिनिधी ।**

एसबीएससी व सीबीएससी बोर्डाच्या परीक्षा मार्चमध्ये झाल्या. त्यानंतर त्या परीक्षांचे निकाल लागून एप्रिल महिन्यात शाळा सुरू झाल्या. यंदा एप्रिल महिन्यात तापमान ४०/४१/४२ डिग्री सेल्सिअस तापमान आहे. त्यामुळे लहान मुलांना शाळेत जाताना असह्य होत आहे. हा धोका टाळण्यासाठी जिल्हा प्रशासनाने शाळा ऑनलाईन कराव्यात, अशी मागणी रायगड जिल्हा परिषदेचे माजी बांधकाम सभापती पुंडलिक पाटील यांनी केली आहे.

एसबीएससी व सीबीएससी बोर्डाच्या परीक्षा मार्चमध्ये असतात आणि त्या परीक्षांचा निकाल मार्चअखेरीस असतो. परीक्षा व निकाल या कालावधीत विद्यार्थ्यांना सुट्टी असते. त्यानंतर एप्रिल महिन्याच्या पहिल्या आठवड्यात पुढील वर्षांची शाळा होते. आणि मे महिन्यात पुन्हा सुट्टी लागेल. यंदा उष्णतेची लाट असल्याने विद्यार्थ्यांना शाळेत जाणे असह्य होते.

त्यामुळे जिल्हा प्रशासनाने शाळा व्यवस्थापन समितीला निर्देश देऊन काही दिवसांकरिता शाळा ऑनलाईन करायला सांगावे. त्यामुळे लहान मुलांना उष्णतेचा त्रास कमी होईल. याबाबत जिल्हा प्रशासनाने लवकरात लवकर लक्ष द्यावे, अशी मागणी पाटील यांनी केली आहे.

## खारघरमधून १२ परदेशी नागरिकांची धरपकड

**। पनवेल । वार्ताहर ।**

खारघर पोलिसांनी आपल्या हद्दीत केलेल्या कोम्बिंग ऑपरेशन दरम्यान खारघर परिसरात बेकायदेशीररित्या वास्तव्यास असलेल्या १२ परदेशी नागरिकांची धरपकड केली. यात दहा आफ्रिकन महिला तसेच दोन बांगलादेशी नागरिकांचा समावेश आहे. हे सर्व परदेशी नागरिक काही वर्षांपासून या ठिकाणी बेकायदेशीररित्या वास्तव्यास असल्याचे त्यांच्या चौकशीत आढळून आले आहे. पोलिसांनी या सर्व परदेशी नागरिकांना अटक करून त्यांना त्यांच्या मूळ देशात पाठविण्याची कार्यवाही सुरू केली आहे.

नवी मुंबई पोलिसांनी वेगवेगळ्या भागांमध्ये कोम्बिंग ऑपरेशन राबवून गुन्हेगार व बेकायदेशीर कृत्य करणाऱ्यांची धरपकड सुरू केली आहे. त्यानुसार खारघर पोलीस ठाण्याच्या हद्दीत कोम्बिंग ऑपरेशन राबविण्यात आले होते. या कोम्बिंग ऑपरेशनदरम्यान खारघर सेक्टर-२७ मधील रांजणपाडा भागातील मेट्रो रेसीडेन्सी या इमारतीत काही नायजेरियन नागरिक बेकायदेशीररीत्या राहत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी मेट्रो रेसीडेन्सी इमारतीतील एका फ्लॅटवर छापा मारला असता, सदर फ्लॅटमध्ये १० आफ्रिकन महिला राहात असल्याचे आढळून आले. तसेच सेक्टर १८ मध्ये गस्त घालत असताना बालाजी स्वीटसमोर काजल मुख्तार शेख (३६) व नुर इस्लाम लतीफ शेख (४२) हे दोन व्यक्ती संशयास्पदरित्या आढळून आले. त्यामुळे पोलिसांनी त्यांच्याकडे चौकशी केली असता, त्यांच्याकडे भारतातील वास्तव्याबाबतचे तसेच पासपोर्ट व व्हिसा आदी कागदपत्रे नसल्याचे आढळून आले. त्यामुळे पोलिसांनी त्यांच्याकडे अधिक चौकशी बांग्लादेशी नागरिक असल्याची कबुली दिली. त्यानुसार पोलिसांनी दोघांना अटक केली आहे.


## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे हालिवली, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत त्या मिळकतीचे मालक १) श्री. भगवान मारूती भोईर, २) श्री. सचिन जनार्दन चंदने, ३) श्री. सुहास मनोहर नाईक व ४) श्री. विकास रघुनाथ बडेकर यांचेकडून विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्रफळ हे.आर. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| २५ | ८ | ०-२३-० | ०-२८ |
| ३२ | ११ | ०-४१-० | ०-३४ |
| ३२ | ३३ | ०-३८-० | ०-२५ |
| ४० | ४ | ०-०७-०० | ०-०९ |
| ४३ | ७ | ०-१८-०० | ०-१९ |

सबब सदरबाबत कोणाचीही दान, गहाण, फरोक्त, लिज, लिन, बक्षीस, करार, ताबेकब्जा, वहिवाट अथवा अन्य कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतेही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दि. २३/०४/२०२४

**ॲड. सतीश धर्मा डायरे**
पत्ता- ००२, शिवतीर्थ, सहयोग
को.ऑ.हौ.सो. ब्राह्मण आळी,
नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड
मो. ९८५०४०२६५७


# प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेचे काम निकृष्ट

**। पाली । वार्ताहर ।**

सुधागड तालुक्यातील भेरव आवंढे खांडपोली कामथेकर वाडी रस्त्याच्या कामाला सुरुवात झाली असून, सुरुवातीलाच रस्त्याचे काम हे निकृष्ट दर्जाचे होत असल्याने स्थानिकांनी कामाबाबत नाराजी व्यक्त केली.



> दहा ते पंधरा वर्षांपासून या रस्त्याचे काम होत आहे. या मार्गाचे काम हे दर्जेदार व जलद गतीने झाले पाहिजे. टाकण्यात आलेल्या मोऱ्या पुन्हा काढून खाली काँक्रिट पीसीसी करुन त्या टाकण्यात याव्यात अन्यथा काम करू दिले जाणार नाही.
> – नरेश देशमुख, स्थानिक ग्रामस्थ, आवंढे

भेरव खांडपोली ते कामथेकरवाडी मार्गांचे काम हे महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था अलिबाग यांच्या अखत्यारित येत असून, प्रधानमंत्री ग्रामसड्क योजनेंतर्गत रस्त्याला मंजुरी मिळाली आहे. हा रस्ता हा ४.४५० कि.मी. लांबीचा असून, ३१८.२९ लक्ष इतका निधी या रस्त्याकरिता उपलब्ध करण्यात आला आहे. भेरव खांडपोली ते आवंढे या मार्गाचे काम सुरुवातीपासून निकृष्ट दर्जाचे होत असल्याचे स्थानिक नागरिकांमधून बोलले जात आहे. पाण्याचा निचरा होण्यासाठी रस्त्यात जुन्या मोऱ्या काढून त्याठिकाणी नवीन मोऱ्या टाकण्यात आल्या आहेत. मात्र इस्टिमेटमध्ये दिल्याप्रमाणे त्या मोऱ्यांखाली पीसीसी न करता तशाचा मातीत टाकण्यात आल्या आहेत. शिवाय खडीकरण झाल्यावर माती भराव करुन दबाई करण्यात आली आहे. मात्र, त्यावर पाणी मारणे बंधनकारक असूनदेखील महिन्या-पंधरा दिवसांतून एखाद्या टँकरद्वारे पाणी मारले जात आहे. या मार्गावरून अवजड व लहान वाहनांची सततची वाहतूक असल्याने रस्त्यावरील माती निघून गेली आहे. रस्त्याच्या कामातदेखील दिरंगाई होत आहे.

## कंटेनरमधून चोरी करणारे चोरटे ताब्यात

**। रसायनी । वार्ताहर ।**

स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे सतर्क पोलीस अधिकाऱ्यांनी संशयास्पद कंटेनरमधून माल काढताना दोन इसमास अटक केली आहे. सदरचा कपडे, चपला, बूट, टी-शर्ट काढताना चौकशी करण्यात आली. त्यावेळी आरोपी पळत जात असताना त्यांना पकडून कारवाई करण्यात आली. खालापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत पेट्रोलिंग करत असताना स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेकडील सपोनि संदिप पोमन व त्यांच्या पथकाला जुना मुंबई-पुणे महामार्गावरील रिंकी पॅलेस हॉटेलच्या बाजूला संशयास्पदरित्या एका कंटेनरमधून दोन इसम काही तरी माल काढत असल्याचे रस्त्यावरून जाताना दिसले. त्यावर संशय आल्याने कंटेनरजवळ जाऊन खात्री केली असताना दोन्ही इसम कंटेनर बंद करून पळून जात असल्याचे निदर्शनास आल्यावर पाठलाग करून त्यांना पकडून सर्व घटनेची खात्री केली.


## जाहीर नोटीस

श्री. हजरतअली लयेसमोहम्मद मन्सुरी यांच्या सोबत खालील वर्णन केलेले भूखंड खरेदीचा समझोता ०५ माहे एप्रिल सन २०२४ रोजी खालील मिळकत खरेदी करण्याच्या हेतुने केलेला आहे. तरी खालील मालमत्तेविषयी कोणत्याही व्यक्तींचे कुठल्याही प्रकारचे हितसंबंध असल्याचा व संबंधीत व्यक्तींनी सदरहू मिळकतीबाबत जर कोणत्याही प्रकारचा आर्थिक व्यवहार अथवा कोणत्याही प्रकारचे कायदेशीर हक्क प्रस्थापित करण्यासाठी लेखी करार केले असतील व कोणत्या प्रकारचे कायदेशीर हक्क प्रस्थापित करण्यासाठी लेखी करार केले असतील व कोणत्याही व्यक्तीचे कायदेशीर हक्क असतील तर सबंधीत व्यक्तींनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून २१ दिवसांच्या आत योग्य त्या लेखी पुराव्यासह त्यांच्या खालील मिळकतीसंबंधीत काही हरकती असल्यास खालील नमूद केलेले वकील श्री. अविनाश गायकवाड यांच्याकडे नोंदवाव्यात. जर २१ दिवसांच्या आत लेखी हरकती न आल्यास माझे पक्षकार हे संबंधीत मिळकतीचे पुढील व्यवहार श्री. शेरअली शौकत शेख, श्री. हजरतअली लयेसमोहम्मद मन्सुरी यांच्यासोबत करतील व त्यानंतर कोणतेही कायदेशीर हक्क किंवा आर्थिक व्यवहार माझ्या पक्षकारावर बांधील राहणार नाही याची नोंद घ्यावी.

मौजे - आकुर्ले, ता. कर्जत, जि. रायगड. येथील खालील वर्णणाचे जमिन आहे.

| जमिन मालकाचे नांव | गावाचे नांव | सर्वे नंबर | क्षेत्रफळ |
|---|---|---|---|
| श्री, शेरअली शौकत शेख, श्री.हजरतअली लयेसमोहम्मद मन्सुरी | आकुर्ले | ८४/२ | २.८०.३० |

तारीख :
ठिकाण :

संपर्क
**ॲड. श्री. अविनाश गायकवाड**
पत्ता-ऑफिस नंबर ०३, सिध्देशवर टॉवर, प्लॉट नंबर ८२, सेक्टर-१९, कामोठे, नवी मुंबई - ४१०२०९.
मोबाइल नंबर: ९३५६१८५२६७
ई-मेल आयडी:avinashgaikwad230@gmail.com



## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे आशाणे, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत तिचे मालक कुंती गौतम नागवेकर यांजकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविले आहे.

| सर्वे नं. | हिस्सा नं. | क्षेत्रफळ (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| ८ | ५ | ०-०५-८० | ०=९१ |

वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठेकरार, ताबा कब्जा, कुळवहिवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज, लिज, अटॅचमेंट वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्याची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही. असे समजण्यात येऊन आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक : २२/०४/२०२४

**ॲड. महेश मोतीराम घारे**
मु. सांगवी, ता. कर्जत, जि. रायगड
मो. ९८८१८५८६५४, ९२७१८६९२०२


## मुरुडमध्ये लांडोराला जीवदान

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**



मुरुड वावडुंगी ग्रामपंचायत हद्दीतील सायगावजवळील सकाळच्या दरम्यान लांडोर लंगडत रस्त्यावर जाताना तरुणाच्या निर्दशनास आले. त्याने तात्काळ शिघ्रे येथील माजी सरपंच संतोष पाटील यांना बोलावले. संतोष पाटील यांनी लांडोर पक्ष्याची अवस्था बघून ताबडतोब वनपाल संतोष रेवणे यांना कळविले. ताबडतोब शहरातील वनपाल विजय कोसंबे व सर्पमित्र संदिप घरत व वनमंजूर हेही घटनास्थळी पोहोचले. लांडोर पक्ष्याला ताब्यात घेऊन वनविभाग गेस्ट हाऊसमध्ये आणले. जखमी लांडोरावर पक्षुवैद्यकीय डॉक्टर विनायक पवार यांनी उपचार सुरू केले आहे.

मुरुड शहरासह पंचक्रोशीभागात अनेक ठिकाणी वणवे लागत असल्याने त्यात उन्हाचा तडाखा तेवढाच वाढत असल्याने जंगलातील नैसर्गिक जलसाठे रिकामे झाल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे हा अपघात झाल्याचा अंदाज वर्तविण्यात येत आहे. आज एक पक्षी रस्त्यावर आला, उद्या हिंस्त्र प्राणी येऊ शकतो, तरी जंगलात लागणारे वणवे थांबविणे जरुरी आहे, अशी प्रतिक्रिया सर्पमित्र संदीप घरत यांनी दिली.


## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की खाली वर्णन केलेली मिळकत आमचे अशिल यांनी त्या मिळकतीचे मालक श्री. रफीक अहमद पटेल यांचे कडून खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मौजे माले, ता. कर्जत, जि. रायगड**

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर /चौ.मिटर्स | आकार रू. पै |
|---|---|---|---|
| १९ | ६ | ०.१९.२० | २.१९ |

तदंगभुत: सर्व हक्क हितसंबंध यासुद्धा

तरी वरील मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा, कोणताही व कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, ताबा-कबजा, कुळ वहिवाट, बोजा, चार्ज, पोटगी-हक्क, मृत्यूपत्रांकितदान, गहाण, बक्षीस, फरोक्त लिएन वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आत सकृत दर्शनी पुराव्यासह लेखी हरकत खालील सही करणार यांजकडे कळविणेची विनंती आहे. वरील मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील, मागाहून येणाऱ्या तकारी/हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. कळावे.

तारीख : -०४-२०२४

**ॲड.दिपाली राहूल शिंदे,**
बी.एल.एस, एल.एल.बी,
ॲडव्होकेट व नोटरी,
मो.नं-९५६१७१९४९४/९०११७१६००१


## कोर्लई येथील चौघांना अटक

**। रेवदंडा । वार्ताहर ।**

कोर्लई येथे रात्रीच्या सुमारास उधारीने सामानाची मागणी केली असता, सामान देण्यास नकार दिल्याचा राग मनात धरून चौघांनी दुकानात शिरून दुकानदारास मारहाण केली व त्याच्या पत्नीस शिवीगाळ केल्याची घटना घडली आहे. दुकानदार लियाकत फिरफीरे (४०) यांना फारूख बेबल (२०), विजेंद्र चोरडेकर (२४), आर्यन कोटकर (२२) व आक्षी साखर येथील यश घाडगे (२४) यांनी उधारीने सामान न दिल्याचा राग मनात धरुन मारहाण केली.


MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

## E –TENDER NOTICE

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender** specification. **Tender fees Rs.500/- + GST**

| Sr. No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFxNo :- 7000031089** **Tender No. : EE/EHV (O&M)/DN/PNL/e-Tender-13/ 2024 - 2025** RFx E-tender for Hiring of MMV vehicle at EHV Lines Maint S/sdn Panvel-I under EHV (O&M) Division Panvel for period 01.04.2024 to 31.03.2025….**2nd call** **Tender amount Limited to Rs. 5,99,904/-, EMD amount Rs. 5,999/-** |
| 2 | Online Downloading the RFx | **23.04.2024, 18:00 Hrs to 01.05.2024, 23:59 Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 01.05.2024 up to 23:59 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **02.05.2024 at 11:00 hrs.(if Possible)** |

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The ADDL. Executive Engineer, (O) : Phone No. 022- 2746 5410.
**Note :** All eligible Supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**SD/-**
**EXECUTIVE ENGINEER EHV(O&M) DN PANVEL**



## पेण प्राथमिक शिक्षक सहकारी पतपेढी,लि.पेण जि.रायगड
### सिलबंद कोटेशन मागवीत आहे

पेण प्राथमिक शिक्षक सहकारी पतपेढी लि.पेण रायगड या संस्थेच्या पनवेल, माणगांव, महाड कार्यालयात संस्थेच्या नावाचे एक्रलिक बोर्ड तयार करणे तसेच संस्थेच्या महाड कार्यालयात २ टन ए.सी खरेदी करण्यासाठी कोटेशन मागवीत आहे.

१) संस्थेच्या नावाचे बोर्ड साईज संस्थेच्या पेण कार्यालयात पाहावयास मिळेल.
२) महाड कार्यालयात बसविण्यात येणारी ए.सी ही अधिकृत कंपनीची असावी.
३) कोटेशन मजूर धारकांना संचालक मंडळाच्या परवानगी शिवाय कोणत्याही प्रकारचे ॲडव्हास दिले जाणार नाही.
४) कोटेशन मंजूर नामंजूर करण्याचा अधिकार संचालक मंडळाने राखून ठेवला आहे.
५) निविदा नामंजूर धारकांना कोणत्याही प्रकारे कळविले जाणार नाही.
६) बोर्ड तयार करणे व ए.सी खरेदी करणे निवीदा दिनांक २/५/२०२४ रोजी संस्थेच्या पेण कार्यालयात सायंकाळी ५:०० वाजेपर्यत पोहचतील अशा बेताने पाठवावीत.
७) कोटेशन मंजूर धारकांनी २० मे २०२४ पर्यत बोर्ड व ए.सी. बसविणे गरजेचे आहे.
८) बोर्ड व ए.सी. बसविण्याचे काम मंजूर धारकांना त्या त्या शाखेत जाऊन करावे लागतील.

ठिकाण : पेण
दिनांक : २३/४/२०२४

**श्री. नितिन वसंत वर्तक** — सेक्रेटरी
**श्री.सोपान रामचंद्र चांदे** — मानद सचिव
**श्री.अरविंद बाळकृष्ण मोरे** — व्हा.चेअरमन
**श्री.रविंद्र विनायक पाटील** — चेअरमन

**पेण प्राथमिक शिक्षक सहकारी पतपेढी,लि.पेण जि.रायगड**

सही
सेक्रेटरी
पेण प्राथमिक शिक्षक सह. पतपेढी,लि.



## जाहीर सुचना

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की आमचे अशिल यांनी खालील वर्णनाची मिळकत तिचे मालक श्री. मोहन रघुनाथ वडे याच्याकडुन कायमचे खरेदीकरण्याचे ठरविले आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे गणेगाव चिंचवली, ता. कर्जत जि. रायगड येथील मिळकत**

वरील जमीन मिळकत सर्व्हे नं ३४/२/अ एकुण २.०५.०० गुंठे पैकी त्याचे हिश्याचे क्षेत्र ०.२०.०० जागा विकत घेणार आहेत. तरी जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा ताबा बयाणा पावती, साठेकरार, गहाणखत, दान, भाडेपट्टा, लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसाच्या आत लेखी पुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मिळकतीशी कोणतीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसलेही प्रकारचा हक्क हितसंबंध त्यानी आमचे अशीलाच्या लाभात सोडुन दिलेला असून त्यांनी आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशील खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही. येणेप्रमाणे जाहीर सुचना आहे.

दिनांक : २३/०४/२०२४

**ॲड. देविदास यशवंत देवघरे**
पत्ता. मु.पो कडाव ता. कर्जत रायगड
भ्रमणध्वनी ९०२८५९२७९८


## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

**निवडक**

## चहलने रचला इतिहास

**मुंबई :** आयपीएल २०२४ चा ३८ वा सामना राजस्थान रॉयल्स आणि मुंबई इंडियन्स यांच्यात जयपूरच्या सवाई मानसिंग स्टेडियमवर खेळवला गेला. या सामन्यात राजस्थान रॉयल्सचा अनुभवी फिरकीपटू युजवेंद्र चहलने ऐतिहासिक कामगिरी केली. त्याने ८ व्या षटकात मोहम्मद नबीला आपल्याच चेंडूवर झेल घेत बाद केले. ही त्याची आयपीएलमधील २०० वी विकेट ठरली. त्यामुळे तो आयपीएलमध्ये २०० विकेट्स घेणारा पहिलाच गोलंदाज ठरला आहे.

## कोहली नॉट आऊट

**कोलकाता :** कोलकाता सोबतच्या सामन्यात कोहलीच्या विकेटवरून बराच गदारोळ झाला. खुद्द कोहलीही त्याच्या विकेटवर चिडलेला दिसत होता. पॅव्हेलियनमध्ये परतताना विराट चांगलाच संतापलेला दिसत होता. पण, कोहली आऊट होऊन पॅव्हेलियनमध्ये परतत असताना कॉमेंट्री करत असलेल्या नवज्योतसिंग सिद्धूने पंचांच्या निर्णयावर प्रश्न उपस्थित केले. तो स्पष्ट शब्दात म्हणाला, मी छाती ठोकून सांगतो की कोहली नॉट आऊट आहे. एवढ्या मोठ्या सामन्यात तुम्ही कोहलीला असे कसे आऊट देऊ शकता.

## सलग चौथा पराभव

**चंदीगड :** गुजरातने ३६ व्या सामन्यात पंजाबचा ३ गडी राखून पराभव केला. पंजाबचा संघ या मोसमातील सलग चौथा सामना हरला आहे. पंजाब २० षटकांत १४२ धावा करून संघ सर्वबाद झाला. गुजरातने १४३ धावांचे लक्ष्य १९.१ षटकांत ७ गडी गमावून पूर्ण केले. जीटीचा कर्णधार गिलने ३५ आणि सुदर्शनने ३१ धावा केल्या. पंजाबच्या हर्षलने तीन, तर लव्हिंगस्टनने दोन गडी बाद केले. पंजाबकडून प्रभसिमरनने ३५ धावा केल्या. गुजरातच्या साई किशोरने ४, मोहित आणि नूर यांनीही २-२ विकेट घेतल्या.

## कोहलीने सलामी करावी

**नवी दिल्ली :** सौरव गांगुलीचे मत आहे की, कोहलीने जूनमध्ये होणाऱ्या विश्वचषकात रोहितसोबत सलामी दिली पाहिजे. गांगुली यांनी सोमवारी एका मीडिया इव्हेंटमध्ये सांगितले की, विराट कोहली आणि रोहित शर्मा यांनी यंदाच्या टी-२० विश्वचषकात भारतासाठी सलामी दिली पाहिजे, विराट ४० चेंडूत १०० धावा करू शकतो. रोहित शर्मा आणि विराट कोहली टी-२० विश्वचषकात ओपनिंग करणार असल्याचा दावा नुकताच मीडिया रिपोर्टमध्ये करण्यात आला होता.

## पांड्याची मानसिकता बिघडतेय

**मुंबई :** पांड्या हा विश्वचषकापर्यंत कोट्यवधी भारतीयांसाठी हिरो होता पण यंदाच्या आयपीएलची घोषणा होताच हार्दिकला अक्षरशः दूषणं देऊन खलनायक बनवणाऱ्यांची संख्या वाढू लागली. प्रचंड फॅन फॉलोईंग असलेल्या मुंबई संघाचं कर्णधारपद रोहितकडून काढून घेत हार्दिकच्या हाती सोपवण्यात आलं. तेव्हापासूनच रोहितच्या चाहत्यांनी हार्दिकला प्रचंड ट्रोल करायला सुरुवात केली. यासगळ्यानंतर आता हार्दिकवर मानसिक ताण वाढत आहे, अशी माहिती रॉबिन उथप्पा यांनी दिली.

### आव्हानवीरांची बुद्धीबळ स्पर्धा

# डी. गुकेशने रचला इतिहास

**। टोरंटा । वृत्तसंस्था ।**

**भारताचा १७ वर्षीय डी. गुकेशने सोमवारी कॅनडातील टोरंटो येथे खेळल्या जाणाऱ्या आव्हानवीरांची बुद्धीबळ स्पर्धा २०२४ मध्ये इतिहास रचला आहे. ही स्पर्धा जिंकणारा तो जगातील सर्वात तरुण खेळाडू ठरला आहे. विजेतेपदाबरोबरच डी. गुकेश हा ४० वर्षांपूर्वी गॅरी कास्पारोव्ह यांनी रचलेला विक्रम मोडत जागतिक विजेतेपदाच्या शर्यतीमधील सर्वात कमी वयाचा आव्हानवीर ठरला आहे. विश्वनाथन आनंद नंतर स्पर्धा जिंकणारा तो पहिला भारतीय आहे.**

## ■ स्पर्धा जिंकणारा सर्वात तरुण खेळाडू



स्पर्धेतील १४ व्या आणि शेवटच्या फेरीत गुकेशने अमेकिरेच्या हिकारू नाकामुराविरोधातील डाव बरोबरीत सोडवला. तसेच, स्पर्धेत १४ पैकी ९ गुण मिळवले. आव्हानवीरांची बुद्धीबळ स्पर्धा ही विश्वविजेत्या बुद्धिबळपटूला आव्हान देणारा बुद्धिबळपटू निवडण्यासाठी आयोजित केली जाते. दरम्यान, आव्हानवीरांची बुद्धीबळ स्पर्धा जिंकल्यानंतर आता यावर्षाच्या अखेरीस होणाऱ्या लढतीमध्ये डी. गुकेशची गाठ चीनचा विश्वविजेता बुद्धिबळपटू डिंग लिरेन याच्याशी पडणार आहे.

डी. गुकेश हा या लढतीसाठी पात्र ठरलेला सर्वात कमी वयाचा बुद्धिबळपटू ठरला आहे. याआधी महान बुद्धिबळपटू गॅरी कास्पारोव्ह यांनी १८८४ मध्ये २२ वर्षांचे असताना अनातोली कारपोव्ह यांच्याविरुद्ध होणाऱ्या लढतीसाठी क्वालिफाय केलं होतं. टूर्नामेंट जिंकण्याबरोबरच गुकेशने ८८,५०० युरो (अंदाजे ७८.५ लाख रुपये) रोख बक्षीसही जिंकले. उमेदवारांसाठी एकूण बक्षीस रक्कम ५,००,००० युरो होती. ही प्रतिष्ठित स्पर्धा जिंकणारा ग्रेट विश्वनाथन आनंदनंतर गुकेश दुसरा भारतीय ठरला. पाच वेळा विश्वविजेता आनंदचा विजय २०१४ मध्ये आला होता.

> या विजयामुळे मला खूप आनंद झाला आहे. मी फॅबियो कारुआना आणि इयान नेपोमनियाची यांच्या खेळाला अनुसरण करत होतो. त्यानंतर मी आणखी एक बुद्धिबळपटू ग्रेगोरज गाजेव्स्की यांच्याशीही चर्चा केली. मला वाटतं ती चर्चा खूप उपयुक्त ठरली.
>
> –आव्हानवीर डी. गुकेश

> सर्वात तरुण चॅलेंजर बनल्याबद्दल डी. गुकेशचे अभिनंदन. वाका चेस कुटुंबाला तुम्ही जे काही साध्य केले त्याचा अभिमान वाटतो. तुम्ही ज्या प्रकारे खेळलात आणि कठीण प्रसंग हाताळलेत त्याबद्दल मला वैयक्तिकरित्या खूप अभिमान वाटतो. या क्षणाचा आनंद घ्या.
>
> – विश्वविजेता विश्वनाथन आनंद

## सामना हरलेल्या कर्णधारांना दंड

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

रविवारचा दिवस हा आयपीएलसाठी डबल हेडर सामन्यांचा दिवस होता. रविवारी दुपारच्या सामन्यात कोलकाताने बंगळुरूचा एका धावेने पराभव केला. तर, रात्रीच्या सामन्यात गुजरातने पंजाबचा तीन गडी राखून पराभव केला. यात महत्त्वाचा भाग म्हणजे बंगळुरू आणि पंजाब दोन्ही संघांना पराभवाचा सामना तर करावा लागलाच, पण त्यांच्या कर्णधारांना मोठा दंडही ठोठवण्यात आला. बंगळुरूचा कर्णधार फाफ डुप्लेसिस याच्यावर१२ लाख रुपयांचा दंड ठोठवण्यात आला. प्रेस नोटनुसार हा दंड षटकांची कमी गती राखल्यामुळे ठोठवण्यात आलेला आहे. तर, पंजाबचा कर्णधार सॅम करन याच्यावरही दंड भरण्याची नामुष्की ओढवली. त्याच्यावरील दंड हा त्याने लेव्हल १ चा गुन्हा केला असल्याचे सिद्ध झाले आहे.

# कायरा घरतची उत्कृष्ट कामगिरी

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**



गोशीन न्यू करार्टे असोसिशनच्यावतीने सोके कप कराटे चॅम्पीयनशीप स्पर्धेचे आयोजन रविवारी (दि.२१) मोहपाडा-रसायनी येथे करण्यात आले होते. या स्पर्धेत अलिबाग तालुक्यातील चौलमधील कायरा अक्षय घरत हीने उत्कृष्ट कामगिरी करीत रौप्य पदक मिळविले. तिच्या या कामगिरीचे सर्व स्तरातून कौतूक करण्यात येत आहे.

कायरा ही मुळची चौलमधील रहिवासी असून सध्या अलिबागमध्ये राहत आहे. कायराला स्वरक्षणाचे धडे मिळाले पाहिजे या भूमिकेतून तिची आई अनन्या घरत यांनी तिला प्रोत्साहन देत कराटे प्रशिक्षण केंद्रात दाखल केले. प्रशिक्षक राहूल तावडे यांच्याकडून मिळालेल्या प्रशिक्षणाचा तिला चांगला फायदा झाला. वेगवेगळ्या कराटे स्पर्धेत कायराने यश संपादन करीत अलिबागचे नाव लौकीक केले. मोहपाडा-रसायनी येथील श्रीसाईबाबा केंद्र संस्थान सभागृहात कराटे स्पर्धेचे आयोजन केले होते. या स्पर्धेत कायराने वेगवेगळ्या कराटेच्या क्रिडा प्रकारात यश संपादन केले. त्यामध्ये तिने रौप्य व सुवर्ण पदक मिळवून अलिबागचे नाव उंचावले.

# काउंटीमध्ये नाबाद द्विशतक

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**



भारतीय क्रिकेटपटू करुण नायरला भलेही आयपीएलमध्ये संधी मिळाली नसेल, मात्र तो इंग्लडच्या कौंटी क्रिकेटमध्ये आपली छाप सोडत आहे. काउंटी चॅम्पियनशिप डिव्हिजन २ मध्ये नॉर्थम्प्टनशायरकडून खेळताना नायरनं नाबाद २०२ धावा केल्या. केरळच्या करुण नायरने २५३ चेंडूत २१ चौकार आणि २ षटकारांच्या मदतीने नाबाद २०२ धावा करत ग्लॅम ऑर्गनच्या गोलंदाजांची तारांबळ उडवून दिली. नॉर्थम्प्टनशायरकडून रिकार्डो वास्कोसेलास (१८२) आणि सैफ जायब (१००) यांनीही शतकी खेळी खेळल्या.

व्हिटॅलिटी काउंटी चॅम्पियनशिपनं करुण नायरच्या द्विशतकाचा व्हिडिओ शेअर केला आहे. हा व्हिडिओ सोशल मीडियावर लगेच व्हायरल झाला. दोन मिनिटं आणि एक सेकंदाच्या या व्हिडिओमध्ये करुण नायर अनेक आकर्षक फटके खेळताना आणि आपलं पहिलं द्विशतक पूर्ण करताना दिसत आहे.

कौंटी क्रिकेटमध्ये द्विशतक करणारा करुण नायर हा तिसरा भारतीय क्रिकेटपटू आहे. याआधी भारताचा माजी कर्णधार मोहम्मद अझरुद्दीन आणि अनुभवी फलंदाज चेतेश्वर पुजारा यांनी हा पराक्रम केला होता. अझहरनं काउंटी क्रिकेटमध्ये दोनदा द्विशतक झळकावले आहे. डर्बीशायरकडून खेळताना त्यानं लीसेस्टरशायरविरुद्ध आणि नंतर डरहमविरुद्ध १९९४ मध्ये द्विशतक झळकावले होते. त्याच वेळी, चेतेश्वर पुजारा हा काउंटी क्रिकेटमध्ये सर्वाधिक द्विशतक झळकावणारा भारतीय फलंदाज आहे. पुजारानं काउंटी क्रिकेटमध्ये तीन द्विशतके झळकावली आहेत.

## कॅपिटल्सला धक्का

**नवी दिल्ली :** आयपीएलच्या प्ले ऑफच्या शर्यतीत राहण्यासाठी धडपडणाऱ्या दिल्ली कॅपिटल्सला सोमवारी मोठा धक्का बसला आहे. दिल्लीला ८ सामन्यांत फक्त ३ विजय मिळवता आले आहेत आणि ६ गुणांसह हा संघ आठव्या क्रमांकावर आहे. प्ले ऑफसाठी त्यांना उर्वरित ६ सामन्यांत किमान पाच विजय मिळवावे लागणार आहेत. दरम्यान, दिल्ली संघातील स्टार खेळाडूने आयपीएलच्या उर्वरित सामन्यांतून माघार घेण्याचा निर्णय घेतला आहे. हॅमस्ट्रींग दुखापतीच्या उपचारासाठी दिल्लीचा अष्टपैलू खेळाडू मिचेल मार्श हा मायदेशात म्हणजेच ऑस्ट्रेलियात गेला होता. पण, आता त्याने भारतात न परतण्याचा निर्णय घेतला आहे आणि तो उर्वरित आयपीएलला मुकणार आहे.

# न्यूझीलंडचे नवखे खेळाडू वरचढ

**। लाहोर । वृत्तसंस्था ।**

## ■ यजमान पाकिस्तानचा केला पराभव



सध्या न्यूझीलंडचा संघ पाकिस्तान दौऱ्यावर असून तिथे पाच सामन्यांची टी-२० मालिका खेळत आहेत. आगामी टी-२० विश्वचषकाच्या दृष्टीने दोन्हीही संघांसाठी ही मालिका अत्यंत महत्त्वाची आहे. येत्या जूनमध्ये वेस्ट इंडिज आणि अमेरिकेच्या धरतीवर क्रिकेटच्या सर्वात लहान फॉरमॅटचा विश्वचषक खेळवला जाणार आहे. वरिष्ठ खेळाडूंच्या अनुपस्थितीत असलेल्या किवी संघाने मालिकेतील तिसऱ्या सामन्यात विजय साकारला.

बाबर आझमच्या नेतृत्वातील तगड्या पाकिस्तानी संघाची घरच्या मैदानावर पुन्हा एकदा फजिती झाल्याचे दिसले. तिसऱ्या सामन्यात पाहुण्या न्यूझीलंडने ७ गडी आणि १० चेंडू राखून विजय मिळवला. नाणेफेक गमावल्यानंतर यजमान पाकिस्तानने प्रथम फलंदाजी केली. बाबरच्या संघाने निर्धारित २० षटकांत ४ बाद १७८ धावा केल्या. यजमानांकडून शादाब खानने सर्वाधिक धावा केल्या, तर सैय अयुब (३२), बाबर आझम (३७), मोहम्मद रिझवान (२२), उस्मान खान (५), इरफान खान (नाबाद ३० धावा), इफ्तिखार अहमद (२) आणि शादाबने २० चेंडूत ४१ धावा कुटल्या. धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना किवी संघाने चमकदार कामगिरी केली.

मार्क चॅपमनची स्फोटक खेळी न्यूझीलंडला विजय देऊन गेली. त्याने ४ षटकार आणि ९ चौकारांच्या मदतीने ४२ चेंडूत ८७ धावांची नाबाद खेळी केली. त्याला डीन फॉक्सक्रॉफ्टने चांगली साथ दिली. न्यूझीलंडने १८.२ षटकांत १७९ धावा करून मालिकेत १-१ अशी बरोबरी साधली. न्यूझीलंडचे वरिष्ठ खेळाडू आयपीएलमध्ये व्यग्र असल्याने ते पाकिस्तान दौऱ्यावर गेले नाहीत. नवख्या खेळाडूंसह किवी संघ मैदानात आहे. दुसरीकडे पाकिस्तानने आपला विश्वचषकाचा संघ उतरवला असून मोहम्मद आमिर आणि इमाद वसीम या निवृत्त झालेल्या खेळाडूंची पुन्हा एकदा आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये एन्ट्री झाली आहे.

## हार्दिक, राहुलचा पत्ता कट?

**नवी दिल्ली :** टी-२० विश्वचषक स्पर्धेसाठी संघ घोषित करण्यासाठी १ मे ही तारीख ठेवली आहे. या तारखेपर्यंत सर्व २० देशांना आपापले संघाची घोषणा करायची आहेत. म्हणजेच भारतीय संघाचीही लवकरच घोषणा होणार आहे. यावेळी आयपीएल मधील भारतीय खेळाडूंचीकामगिरीहीपाहिलीजाईल. हार्दिक पांड्या आणि केएल राहुल देखील टी-२० विश्वचषकासाठी निवडीच्या शर्यतीत आहेत. मात्र, सध्याच्या आयपीएल हंगामातील या दोन खेळाडूंची कामगिरी तेवढी समाधानकारक म्हणता येणार नाही. अशा परिस्थितीत या दोघांना संघातून वगळले जाऊ शकते.

# कोहलीवर बीसीसीआयची कारवाई

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**



इंडियन प्रीमिअर लीग २०२४ मध्ये रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूला ८ पैकी ७ सामन्यांत पराभव पत्करावा लागला आणि २ गुणांसह ते तालिकेत सर्वात शेवटच्या क्रमांकावर आहेत. आता स्पर्धेत कायम राहण्यासाठी त्यांनी उर्वरित सहा सामने जिंकण्यासोबतच इतरांच्या निकालांवर अवलंबून रहावे लागणार आहे. रविवारी कोलकाता नाईट रायडर्सने १ धावेने त्यांचा पराभव केल्याने मार्गातील अडचणी आणखी वाढवल्या आहेत. त्यात अधिक भर म्हणजे स्टार फलंदाज विराट कोहलीवर बीसीसीआयने कारवाई केली आहे. २२३ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना बंगळुरूने २२१ धावांपर्यंत मजल मारली. हा सामना विराट कोहलीच्या विकेटवरून गाजला. हर्षित राणाच्या स्लोव्हर फुलटॉसवर विराट झेलबाद झाला, परंतु विराटच्या मते तो नो बॉल होता. त्यावरून किंग कोहलीने जाहीर नाराजी व्यक्त केली आणि अम्पायरसोबत राडाही घातला. पण, नियमानुसार विराट बाद राहिला. इतकेच नाही, पॅव्हेलियनच्या दिशेने जाताना त्याने डस्टबिनवर जोरात बॅट आदळली. त्याच्या या वागण्याची बीसीसीआयने गंभीर दखल घेतली आणि त्याच्याकडून दंड म्हणून मॅच फीमधील ५० टक्के रक्कम वसूल केली.

## कोलकाताचे २४ कोटी पाण्यात

**नवी दिल्ली :** मिचेल स्टार्कला आयपीएलच्या लिलावात कोलकाताने मोठ्या रकमेत विकत घेतले. २४.७५ कोटी रुपयांना विकला गेला तेव्हा स्टार्क आयपीएलच्या इतिहासातील सर्वात महागडा खेळाडू ठरला. मात्र, आतापर्यंतच्या मोसमात त्याची कामगिरी अपेक्षेप्रमाणे झालेली नाही. लखनौविरुद्धचा सामना वगळता स्टार्कला काही विशेष करता आलेले नाही. आयपीएलच्या एकाच सामन्यात सर्वाधिक षटकार मारणाऱ्या गोलंदाजांच्या यादीत स्टार्क आता दुसऱ्या क्रमांकावर आला आहे.

# जय हनुमान मांडवखार विजेता

**दिलखुश आवास उपविजेता**

**। खारेपाट । प्रतिनिधी ।**



अलिबाग तालुक्यातील टाकादेवी स्पोर्ट क्लब व ग्रामस्थ मंडळ मांडवा आयोजित अलिबाग रेवस पंचक्रोशीतील पुरुषांच्या भव्य कबड्डी स्पर्धेत जय हनुमान मांडवखार संघ विजेता ठरला. तर, उपविजेता दिलखुश आवास, तृतीय क्रमांक नवयुवक क्रिडा मंडळ चोंढी व चतुर्थ क्रमांक जय हनुमान मिळकतखार संघ विजेते ठरले. विजेत्या संघांना रोख रक्कम व स्वर्गीय रुची राजेंद्र पाटील हिच्या स्मरणार्थ भव्य ट्रॉफी देण्यात आल्या.

या स्पर्धेत उत्कृष्ट चढाई दिलखुश आवास संघाचा कुणाल, उत्कृष्ट पकड नवयुवक चोंढी संघाचा केतन आमले, पब्लिक हिरो प्रथमेश ठोंबरे मिळकतकर तसेच स्पर्धेत सर्वोत्कृष्ट खेळाडू तेजस माने मांडवकर या खेळाडूंनी स्पर्धेत उल्लेखनीय कार्य केले त्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक देण्यात आले. तसेच प्रेक्षकांमधून लकी ड्रॉ मधून मांडवखार संघाच्या सुहास पाटील याला सायकल भेट देण्यात आली.

या कबड्डी स्पर्धेचे उद्घाटन टाकादेवी मंडळाचे संस्थापक मोहन नाखवा तसेच मंडळाचे अध्यक्ष केशव पाटील, सल्लागार गजानन पाटील, सुनील म्हात्रे, योगेश गावंड, राज पाटील, अभिराज माळवी, राजन पाटील, प्रदीप म्हात्रे, शरद गावंड, जयवंत म्हात्रे, रमेश पोटे आदि मंडळी उपस्थित होते. या स्पर्धेत रायगड जिल्ह्यातील ३२ संघांनी सहभाग घेतला होता.

# युएई आशिया कपसाठी पात्र

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

पुढील वर्षी टी-२० आशिया कप २०२५ स्पर्धा खेळवली जाणार आहे. या स्पर्धेसाठी संयुक्त अरब अमिराती संघाने पात्रता मिळवली आहे. त्यामुळे पुढीलवर्षी होणाऱ्या आशिया कप स्पर्धेत युएईचा संघही खेळताना दिसणार आहे.

आशिया कप २०२५ स्पर्धेसाठी एकच जागा रिकामी होती, ज्यासाठी ओमानमध्ये एसीसी प्रीमियर कप ही स्पर्धा नुकतीच खेळवण्यात आली. एकूण १० संघात झालेल्या या स्पर्धेत युएईने रविवारी (दि.२१) झालेल्या अंतिम सामन्यात ओमानला ५५ धावांनी पराभूत केले. त्यामुळे युएईने आशिया कप २०२५ साठी हक्क सांगितला आहे. या स्पर्धेत भारत, पाकिस्तान, श्रीलंका, बांगलादेश आणि अफगाणिस्तानही खेळणार आहेत.

युएईकडून कर्णधार मुहम्मद वसीमने शानदार शतक केले. त्याने ५६ चेंडूत ६ चौकार आणि ७ षटकारांसह १०० धावांची खेळी केली. शराफु ३४ धावा, विष्णू सुकुमारन १८ धावा, त्यानंतर शतक करून वसीमनेही विकेट गमावली. पण अखेरीस असीफ खानने १६ चेंडूत ३८ धावांची नाबाद खेळी करत संघाला २०० पार नेले. त्यानंतर २०५ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना ओमानला २० षटकात ९ बाद १४९ धावाच करता आल्या. ओमानची सुरुवात खराब झाली होती. त्यांनी ११ धावांतच ३ विकेट्स गमावल्या होत्या.

# भारतीय कुस्तीपटूंकडून निराशा

**। बिशकेक । वृत्तसंस्था ।**

**भारताच्या कुस्तीगिरांनी ग्रीको रोमन प्रकारात निराशाजनक कामगिरी केली. येथे सुरू असलेल्या आशियाई पात्रता फेरीत भारताच्या एकाही कुस्तीपटूला पॅरिस ऑलिंपिकची पात्रता मिळवता आली नाही.**




ग्रीको रोमन प्रकारात सुनील वगळता एकाही भारतीय कुस्तीपटूला पहिल्या फेरीचा अडथळा ओलांडता आला नाही. सुनीलने ८७ किलो वजनी गटात जपानच्या सोह साकाबे याच्यावर ५-१ असा विजय मिळवला; पण उपांत्यपूर्व फेरीत त्याला उझबेकिस्तानच्या जालगासबे बर्डिमुरातोव याच्याकडून ४-२ असा पराभव पत्करावा लागला. त्यामुळे पात्रता मिळवण्याच्या त्याच्या आशांना सुरुंग लागला.

उझबेकिस्तानच्या अबरोर अताबायेव याच्याकडून आशू याला ६७ किलो वजनी गटात पराभव पत्करावा लागला. तसेच सुमीत (६० किलो वजनी गट), विकास (७७ किलो वजनी गट), नीतेश (९७ किलो वजनी गट) व नवीन (१३० किलो वजनी गट) या भारतीय कुस्तीपटूंना पहिल्या फेरीतच पराभवाला सामोरे जावे लागले.

### जागतिक स्पर्धेसाठी निवड चाचणी

आशियाई पात्रता फेरीतील सुमार कामगिरीमुळे भारतीय कुस्ती संघटनेकडून जागतिक ऑलिंपिक पात्रता फेरीसाठी निवड चाचणीचे आयोजन करण्यात येणार आहे. तुर्की येथे नऊ मेपासून पॅरिस ऑलिंपिकसाठीच्या अखेरच्या पात्रता फेरीला सुरुवात होणार आहे. त्याआधी एप्रिलअखेरच्या आठवड्यात किंवा मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यात निवड चाचणीचे आयोजन करण्यात येण्याची शक्यता आहे. महिला विभागात ६२ व ६८ किलो वजनी गटांत निवड चाचणी होणार असून फ्रीस्टाईल व ग्रीको रोमन या दोन प्रकारांत प्रत्येकी सहा गटांत निवड चाचणी घेण्यात येणार आहे.

### फक्त चार महिला पात्र

पॅरिस ऑलिंपिकसाठी भारताकडून फक्त चारच कुस्तीपटूंनी कोटा मिळवला आहे. या चारही खेळाडू महिला आहेत, हे विशेष. विनेश फोगाट, अंतिम पंघाल, अंशू मलिक व रितिका ही त्यांची नावे. १४ विविध वजनी गटांसाठी भारतीयांकडून आता प्रयत्न करण्यात येणार आहेत.

> वजनी गट बदलण्याचा निर्णय माझ्यासाठी आनंददायी नव्हता. पॅरिस ऑलिंपिकमध्ये देशाचे प्रतिनिधीत्व करण्यासाठी प्रयत्नांची शिकस्त करावी लागली. आता पॅरिस ऑलिंपिक सुरू होईपर्यंत मला वजनावर नियंत्रण राखायचे आहे. मी ५० किंवा ५३ कोणत्या वजनी गटात सहभागी होईन हे आगामी निवड चाचणीमध्ये ठरेल. मात्र, मी ५० किलो वजनी गटात देशाला ऑलिंपिक कोटा मिळवून दिला, याचा अभिमान आहे.
>
> – विनेश फोगाट, भारतीय महिला कुस्तीपटू

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ I MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)